CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ६१

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य
खंड ५ वा

4763

श. १८६५] किंमत १॥ रुपया [इ. १९४४

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

विक्रयालय--शाखा

दुर्मिळ

राजवाडे खंड

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ ला		किं. रु. १०-०-०
२ ,, ,, ,, ,,	५ वा	,, रु. १५-०-०
३ ,, ,, ,, ,,	८ वा	,, रु. १५-०-०
४ ,, ,, ,, ,,	१५ वा	,, रु. १५-०-०
५ ,, ,, ,, ,,	१६ वा	,, रु. १५-०-०
६ मोडक जंत्री शक १६५१-१८१५		किं. रु. ५०
७ खरे जंत्री शक १५५०-१६५०		किं. रु. ५-१०-०

याशिवाय मंडळाकडे मूळ किंमतीस मिळणारे राजवाडे खंड--

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ४ था		किं. रु. १-४-०
२ ,, ,, ,,	खंड १० वा	,, रु. २-८-०
३ ,, ,, ,,	खंड १२ वा	,, रु. १-८-०
४ ,, ,, ,,	खंड १३ व १४ वा	,, रु. २-०-०
५ ,, ,, ,,	खंड २० वा	,, रु. ३-०-०

कै. दत्तात्रय विष्णु आपटे यांचीं पुस्तकें

१ दोस्तांची श्रीरंगपट्टणावरील मोहीम	किं. रु. २-८-०
२ इतिहास-मंजरी	किं. रु. २-०-०
३ चंद्रचूड दप्तर कला १ ली	किं. रु. ३-०-०
४ छोटी जंत्री (जुन्या कागदपत्रांतील मिती, वार व तारखा काढण्यास उपयुक्त)	किं. रु. ०-४-०

Printed by Mr. Vithal Hari Barve at the Aryabhushan Press, House No. 915/1 Shivaji-Nagar, Poona City and published by Sardar Gangadharrao Narayanrao Mujumdar, C.I.E., Mr. C. G. Karve, and Prof. C. B. Joshi, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विषय-सूची

अधिकारी बदल व वर्षासन नेमणूक ४९, ५०
अभय-कौल-पत्र २३, २५, ३६, ३७, ३८, ३९
अव्वल इंग्रजी अंमल २१-२२
इनाम कदीम ४३
उदमीजाती ३८
कमाविस ६५,६७
कमाविसदार ७,९
कर, हक-सेला ६७,६८, ६९
कर्जफेड ४५,४६
कर्ज ८०
कुरणें १८
खून ८०
खंड ८०
खिंड १८
गवळी १२,१३
गुमास्ता ६३
गोतपत्र, गोताई १६-१७, गोतगंगा ६५
घाट २-५,१८
चोरीचा बंदोबस्त १७,४२-४३
चौगुला ४०,४१,६८,७२
चौधरी ६३
जप्ती ७३-७४
जमीन लागण ३५,३८,६०
जमीन लागवड व वसाहत ७
जवाहीर खरेदी ५३
जहागीर ७३,७४
जिल्हे बाब ६८,६९
जंगल खातें ४१
झेंडा १२
टोकरा = नाव ६९
ताम्रपत्रें १९ ताम्रपात्र ७०
तीर्थोपाध्येपण ५,६
दत्तक २५,५७
दागिने ४२,५३
दिव्य २०, रवा दिव्य ६६
दुतर्फा ६९,७०
देव ७३
देवालयें १-३,६
देवालय व्यवस्था चौकशी ४८
देवालय व तीर्थ प्रवेश इ. ४६-४८
देशपांडे ८०
देशमूख-सर० ७३, २३,३१,४० जमीदार-३५; ३७ देसक ३९ देसाई जमेदा ८०
धडवाईपण ६३
धर्मशाळा ३,५
धर्मादाय ३३,३४
नाइकिणीस इनाम ३३
नाणीं ५१
नाव ६९
निशाणी १६,१७
पागा हुजरात खर्च ६०, ६१

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पानसरा ६३
पूल बांधणें १४ (वर्गणीनें)
पेठ–पुरा ३५, वतनदार १२–१४
–वसाहत १३, १४
फौजदार ४१–४२
बटा ५१
बलुते ४०
बाग ७,९
बाजार भाव ५३
ब्राह्मण वस्ती नवी ६–८
भिक्षुक मंडळी ५९
मसाला २७
माप ३३
माफी ३८
मुकासा ६७
मुद्रा–निळो सोनदेव ३७
–शिवाजी राजाराम ३९
–निळो मोरेश्वर ३९
–परशराम त्र्यंबक ३९
–माधवराव बलाळ ४५, ४६
–बाळाजी बाजीराव ४६
–माधवराव नारायण ४९
–बाळाजी विश्वनाथ
–श्रीनिवास परशराम प्रतिनिधी
–प्रतिनिधी राजेबहादर ३४
–परशराम खंडेराव सुभेदार=वसई ३५
मोकदम १६
मोकीम ६३–६४
राजीनामा ४०
राबते महार ७१
रामदासी ८,११
रोगराई–पिकावरील ६७
रामोशी मंडळीचें कर्तव्य व आपआपसांत करार १६,–मोकासा इ. १७
लांच २८
वडीलपणासाठीं भांडण ६७
वतनदार १०,१२,१३
वतनपत्र ८०
वरात २९,४६
वर्गणी–वरगत १४
वस्त्र देणें ५५,५६,५७
वाटणी ७१,७२
वायदे रोखा ४१
वंशावळ–ठकार जोशी १०, भिडे, खरे ११, उमाजी नाईक १५, १९,–त्रिपुरारी ६२;शिंदे–सासवड ७७, सोनवणी ६७
शपथक्रिया प्रमाण १६
शब्द विशेष १४
शिलालेख १,२,३
शेरणी २५,३२
शेरी जमीन ७,९
सचीव ३२
सती जाणें ६७
सबनीस ८०
सावकार ४५,४६
साक्ष, गोही १६,१७,२१,४०,७२
हरकी ६६
हस्ताक्षर १६, १७ (बिकलम)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

4763

त्रै. वर्ष २४] # अनुक्रमणिका [अंक ३

लेख	लेखक	पृष्ठ
१ शिलालेख ताम्रपट		
१ प्रकाशें येथील केदारेश्वराचा शिलालेख	पां. मा. चांदोरकर टीप–डॉ. मो. गं. दीक्षित	१
२ टोकें येथील घाटावरील शिलालेख	कै. का. ना. साने टीप–डॉ. मो. गं. दीक्षित	२
३ अमृतराव रघुनाथ यांनीं तीर्थोपाध्येपणा दिल्याबद्दलचा ताम्रपट	रा. ब. का. ना. दीक्षित टीप–डॉ. मो. गं. दीक्षित	५
१ गांवपेठ वसाहती—		
४ केळवड्यांची ब्राह्मण–वस्ती	स. दा. मिडे	६
५ पेशवे व सातारा येथील सोमवार पेठ	कै. वा. वि. जोशी	१२
६ सातारा येथील प्रतापगंज पेठ	"	१३
३ व्यक्ति व घराणीं—		
७ उमाजी नाइकाचीं कांहीं पत्रें	कै. पां. न. पटवर्धन	१५
८ खुश्रुशेट मोदी यांचें चित्र व माहिती.	"	२१
इंग्रजी अमलाच्या प्रारंभींची पद्धत		"
४ वतनें, वतनदार–करिने इ.—		
९ शिर्के सरदेशमूख यांस अभयपत्र	कै. द. वि. आपटे	२२
१० पिसाळ घराण्यासंबंधीं कांहीं माहिती	"	२३
५ देणग्या—		
११ कऱ्हाडकर मुंज्येमणी यांस धर्मादाय	कै.श्री.सर.मेहेंदळे व प्रा.पोतदार	३२
१२ शाहू म. ची नाटक शाळेला देणगी	कै. द. वि. आपटे	३३
१३ खटावकर पाठक यांस राजेबहादर यांची देणगी	द. वा. पोतदार	३४
६ जमीन लावणी व आकारणी––		
१४ जमीन लागण व जमाबंदी	कै. स. मा. दिवेकर	३५

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लेख	लेखक	पृष्ठ
१५ संभाजीनंतरची देशस्थिति	वा. दा. मुंडले	३७
७ वनचराई, चोरी व इतर राज्यकारभार—		
१६ शक १६१० तील मुसलमानी जंगलखातें	पां. मा. चांदोरकर	४०
१७ शाहूमहाराजांच्या दरबारांतील पत्र	कै. द. वि. आपटे	४२
१८ फत्तेसिंग भोसल्याचें चित्राव–इनामाबद्दल पत्र	,,	४३
१९ माधवराव बल्लाळ पेशवे यांची दमाजी व गोविंदराव गायकवाड यांस पत्रें	कै. रु. वि. आचार्य, कालगांवकर	४४
८ धार्मिक—		
२० श्रीत्र्यंबकेश्वर संस्थानचे वर्तणुकीची माहिती	कै. का. ना. साने	४६
९ राजकीय—		
२१ रघूजी भोसले यांची जवाहीर खरेदी	द. वा. पोतदार	५३
२२ पेशव्यांच्या स्वारीची सरबराई	कै. सर. ना. य. मिरीकर	५३
२३ राव प्रधान यांस पत्र	कै. वा. वि. जोशी	५५
२४ सांप्रदायाचा पेच	रु. वा. पुरंदरे	५५
२५ चिमाजी आप्पा पेशवे	कै. द. वि. आपटे	५६
२६ तोतया प्रकरणी पत्र	कै. गो. वि. आपटे	५८
२७ परशरामभाऊंचें एक पत्र	पै. शि. ला. आतार	५९
२८ पेशवे सरकारच्या हुजूरपागेकडील घोड्यांच्या नेमणुकी	पां. मा. चांदोरकर	६०
२९ मा. ताराबाईसाहेब व रामभट शेषाद्रिभट त्रिपुरारी	,,	६१
३० नाईक पोतदार यास ताराबाईचें वतन पत्र	कै. वा. वि. जोशी	६३
३१ विरमाडेकर सोनावणे यांची तकरीर	शं. ना. जोशी	६४
३२ सरकार व इनामदार यांमधील तहनामा	कै. रु. वि. आचार्य	६८
३३ पूर्णपात्रें	रु. वा. पुरंदरे	७०
३४ खटावकर यांचा गृहकलह	कै. रु. वि. आचार्य	७१
३५ महादजी शिंदे यांचीं पांच पत्रें	रा. वि. ओतुरकर	७३
३६ कोंडे देशमुखांचा करिना	पां. मा. चांदोरकर	७४
३७ सासवडकर शिंदे सरदार	रु. वा. पुरंदरे	७६
३८ जव्हेकर देशकुलकर्णी		७८
सूची		८१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड ५ वा

१ शिलालेख ताम्रपट—

१ प्रकाशें येथील केदारेश्वराचा शिलालेख

(श्री. पां. मा. चांदोरकर)

ले. १ } { श. १६६४ इ. १७४२

(१) *पश्चिम खानदेशांत, शहादें तालुक्यांत, शहाद्यापासून ५ कोसांवर तापी–गोमई संगमावर, प्रकाशें म्हणून कसब्याचा गांव आहे. गांव जुना आहे. संगमावर व नदीकांठीं महादेवाचीं व इतर अनेक देवळें आहेत. त्यांतील कांहीं देवळांवर शिलालेख आहेत. हे खानदेश ग्याझेटियरकारानें प्रसिद्ध केलेले नाहींत, पैकीं येथें केदारेश्वराचा तेवढा शिलालेख देतों—

[१] श्री ....

[२] क्रमवासी...कमले

[३] मद् नाम्नी...सी सूनु यशवंतराव सुगति...

[४] व स्थापनं चक्रे...सिंह समीत...

[५] ... ॥ श्री शके १६६४ दुंदुभिनाम संवत्सरे माहे...

[६] १० मंगलवारि भीमातीरवडगाववासी कमलोजी कदम सु

[७] त कंठसिंहसवाईंची स्त्री रुक्माबाई इनें पुत्र यशवंतराव यासी

[८] सुगतीकारणें शिवस्थापन केले शिवप्रासाद उत्तम केला

[९] ब्राह्मणद्वारा उत्तम प्रकारे स्थापन केलें या पुण्ये प...

(२) याप्रमाणें शिलालेखाच्या एकंदर ओळी ९ असून पहिल्या ४॥ ओळी संस्कृत व पुढील ४॥ ओळी मराठी आहेत. संस्कृत मजकुराचीं अक्षरें खरून गेलीं

* पा. स. २१४५.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत. त्यामुळें वर दिलीं एवढींच शाबूत राहिलीं आहेत. शिला १॥ फूट × २॥ फूट असून दगड पक्का नाहीं. अक्षर-उंची साधारणतः पाऊण इंच आहे. एका ओळींत साधारण २५ ते २८ अक्षरें आहेत. शिला, बाहेरील सभामंडपांत भिंतींत बसविलेली आहे व तिचे खालीं दगडी ओटा, व्यासपीठाप्रमाणें उपयोगी पडणारा, बांधलेला आहे. हल्लीं त्यावर बसून पुराणीक पुराण सांगतो. सभामंडपास रंग देत असतां लेख-शिलेसहि पिवडीचा रंग फासला गेला आहे. रंगाचीं पुटें बसून गेल्यानें अक्षरें सुवाच्य नाहींत. या गांवांतील सर्व देवळांत हेंच देऊळ मोठें व उत्तम बांधणीचें आहे. समोर दीपमाळ असून त्यावरहि एक शिलालेख आहे.

(३) शिलालेखावरून समजेल कीं, सदर महादेवाचें देऊळ, शक १६६४ दुंदुभीनाम संवत्सरीं, भीमाकांठच्या वडगांवचा रहिवासी जो कमळोजी कदम, त्याचा पुत्र जो सवाई कंठोजी कदम, त्याची स्त्री रुक्मिणीबाई इनें आपला मुलगा यशवंतराव कदम याला सुगति प्राप्त व्हावी म्हणून (हें शिवालय) बांधलें.[१]

---

२ टोकें येथील घाटांवरील शिलालेख

(कै.-रा. ब. का. ना. साने)

१ टोकें येथील पांच शिलालेख बालबोध लिपींत उतरून घेतलेले, रा. ब. बापू पुरुषोत्तम जोशी यांजकडे बरींच वर्षें पडून राहिले होते. ते त्यांनीं थोडे दिवसांपूर्वी मजकडे दिले. उतरून कोणीं घेतले तें कळत नाहीं. मात्र ते नकल करणारानें अगदीं शुद्ध असे उतरून घेतलेले नाहींत असें म्हणावें लागतें. लेख संस्कृत भाषेंत खोदिले आहेत ते चार घाटांवरील ४ व एका धर्मशाळेवरील १ मिळून ५ आहेत.

२ टोकें येथें गोदावरी पूर्ववाहिनी आहे. तिच्या काठीं पश्चिमेकडून पूर्वेकडे अशा स्थानानुक्रमानें पाहिलें तर प्रथम नाना फडणीस यांचा घाट, दुसरा बाळाजी-

---

१ प्रकाशें येथील काशी-विश्वेश्वराच्या व संगमेश्वराच्या देवळांतील शिलालेख शिरपूरचे श्री. भा. रं. कुलकर्णी ह्यांनीं संशोधक वर्ष ७ अं. १-२ ह्यांत पूर्वी प्रसिद्ध केले आहेत तेथें केदारेश्वराच्या वरील शिलालेखाचा ओझरता उल्लेख आढळतो त्यावरून वरील लेख आतां बहुधा अवाच्य झालेला दिसतो. काशी-विश्वेश्वराचें देऊळ देखील वरच्या शिलालेखांत आलेल्या यशवंतराव कदमाच्या सुगतीसाठीं बांधविण्यांत आलें होतें. तेथील शिलालेखांत सवाई कंठसिंहाच्या स्त्रीचें नांव 'तुळसाबाई' असें आढळतें. दोन्ही शिलालेखांतील नांवांची ग्राह्याग्राह्यता मूळ लेख पाहिल्याशिवाय ठरवितां येणार नाहीं; अन्यत्रही पुरावा शोधला पाहिजे. —डॉ. मो. गं. दीक्षित

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राव पेशवे यांचा, तिसरा बाबूजी नाईक बारामतकर यांचा व चौथा पुण्यांतील सावकार विष्णु महादेव गद्रे यांचा, असे आहेत. कालानुक्रम घेतला तर बारामतकर यांचा प्रथम (शक १६६४), गद्रे यांचा दुसरा (शक १६८०), व नंतर एकावर्षींच (शक १६८३ मध्यें) बांधिलेले पेशवे व फडनसि यांचे दोन, अशा क्रमानें हे घाट येतात. धर्मशाळा सूर्यवंशोद्भव कोंडाजी या पुरुषानें बांधिली. ती ह्या सर्व घाटांच्या पूर्वी शक १६४४ मध्यें बांधिली. तिच्या पुढेंच बारामतकर यांचा घाट मागाहून तयार झाला. हा कोंडाजी कोण तें सांगतां येत नाहीं.

३ वरच्या घाटांशिवाय एक सुंदर घाट, बुरूज असलेला, गोदाप्रवरासंगमावरच बांधला आहे; तो दुसरे बाजीराव यांनीं बांधिला म्हणून बापूसाहेब सांगतात; पण त्यावर लेख खोदलेला नाहीं. आणखीहि दोन तीन घाट टोक्यास आहेत, पण ते मोडकळीस आलेले आहेत.

४ टोकें येथील मुख्य दैवत श्रीसिद्धेश्वर. ह्या श्रीसिद्धेश्वराना हे चारही घाट व धर्मशाळा हीं अर्पण केलीं आहेत.

५ शिलालेख* येणेंप्रमाणें:— (कंसांतील आंकडे ओळी दर्शविणारे आहेत.)

---

* टोकें येथील शिलालेख जरी येथें प्रथम प्रसिद्धिले असले तरी मंडळांत ह्या लेखांविषयीं एक दोन वेळां टिपणें वाचलीं गेलीं आहेत. (उदा० श्री. वा. रु. भावे–पा. स. ११।१८५९). मूळ लेख पाहिले असल्यानें व त्यांचे ठसे संग्रहीं असल्यामुळें कै. साने ह्यांच्या लेखांत अवश्य तो फेरबदल मीं केला आहे. टोक्याच्या घाटावरील आणखी एका लेखाचा उल्लेख वरील निबंधांत करावयाचा राहून गेला आहे. तो म्हणजे बारामतीकरांचा घाट व हत्तीघाट ह्या दोहोंमध्यें असलेल्या नाव–घाटावरच्या शिलालेखाचा. हा घाट टोक्यास असलेल्या सर्व घाटांपेक्षां जुना आहे, असें त्याची बांधणी, झडून गेलेल्या पायऱ्या, वगैरे अवशेषांवरून वाटतें. दुर्दैवानें नाव बांधण्याची सांखळी शिलालेखास सारखी घासत असल्यामुळें तो बहुतेक सर्व पुसून गेला आहे. परंतु अवशिष्ट भागांतील " शके १६ + १ संगमनेरकर + बाजी " अशीं अक्षरें कशींबशीं लावतां येतात.

ह्याशिवाय आणखी एक शिलालेख, टोक्यास घाटावरून सिद्धेश्वराच्या देवळास जातांना वाटेवर देवळास लागून असलेल्या वाड्याच्या चौथऱ्यावर आहे. अज्ञानामुळें लेखाजवळच बांधलेल्या पायऱ्यांमुळें तो पूर्णपणें वाचतां येत नाहीं. त्याच्या पहिल्या ओळींतील ' श्रीगणेशायनमः ॥ ' येवढींच अक्षरें सांप्रत उघडीं आहेत. शिलालेख पेशवेकालीन आहे.

सिद्धेश्वराचें देऊळ गद्रे सावकार ह्यांनीं बांधलेलें त्यांतील खोदकाम व चित्रें ह्यांसाठीं विशेष प्रेक्षणीय आहे; त्यांतील गद्रादेवीच्या तारकाकृती रचनेचें देऊळ

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. २ } १ { श. १६६४ इ. १७४२

॥ श्रीगणेशायनमः ॥

(१) स्वस्तिश्रीनृपशालिवाह (२) न शके वेदांगषट्भूमिते (३) १६६४ याते दुंदुभि वत्सरे (४) भगवतो हस्तान् परमो* (५) सि हि सिद्धेशस्यमुदेक (६) रोन्मुनिधुना तीरे कपाटा (७) भि ॥ च सत्सोपानतति सदा (८) शिवसुतो बाबु[बू]जिनामा प्रभुः ॥

ले. ३ } २ { श. १६८० इ. १७५८

(१) श्रीगणेशायनमः ॥ स्वस्तिश्रीनृप (२) शालिवाहन शके स्वाष्टांगभूसंमिते ॥ (३) श्री सिद्धेश्वरतुष्ट्ये कुशिकेतो[2] घ (४) ट्टं मनःपावनः[नम्] ॥ श्रीमद्विष्णुरिति (५) प्रथामनुगतो विप्रो महादेव भू ग (६) द्रे इत्युपनामको व्यरचयच्छू[च्छू]पार ॥ (७) कक्षेत्रगः[3] ॥ शके १६८० बहुधान्याब्दे ॥

महाराष्ट्रांत क्वचितच आढळतें. (पहा, ॲन्युअल रिपोर्ट, ऑर्कीऑलोजिकल डिपार्टमेंट सन १९२६–२७; पृष्ट २३६–२३७).

टोक्याच्या घाटापलीकडे प्रवरेच्या पूर्वतटावर जो घाट आहे त्यावर खालील प्रमाणें शिलालेख आढळतो.

ले. ४ } { श. १७५९ कार्तिक शु. १३ इ. १८३७ नोवें. १०

श्री अंबा प्रसन्न

(१) श्रीगणेशायनमः । शांडील्य गोत्र सजातो + ध (२) र्मांधिकारिणा अंबादासात्मज श्री जीवाजीपंत श (३) र्मणा ॥ अंके + + घटायुक्त शके हेमलंबिनी ॥ सु (४) धानद्या कृतो घट्टस्तेनो मही प्रसीदतु । शके १७५९ (५) हेमलंबी नाम संवत्सरे दक्षिणायने शरदृतौ कार्त्ति (६) कमास शुक्लपक्षे तिथौ त्रयोदश्यां भृगुवासरे रे (७) वती नक्षत्र सिद्धियोगे प्रवरातटाके श्री महाकालि (८) कातीर्थे धर्माधिकारी उपनामक जयरामात्मज अं (९) बादाससुत जिवाजीपंत शर्मेण कृतो घट्टः । श्रीरस्तु शुभं भवतु

—डॉ. मो. गं. दीक्षित

* ह्याचा अर्थ कळत नाहीं. १ कपाट म्हणतां येईल असा कोनाडा व त्यास दार असल्याची खूण म्हणजे खोवण ह्या लेखाखालींच आहे. २ कुशिकतो ? ' कुशिकजो ' असें तर नव्हे ? गद्रे कौशिक गोत्रोत्पन्न आहेत. ३ शूर्पारकक्षेत्रगः । शूर्पारकक्षेत्र म्हणजे वसईजवळचें सोपारें गांव. येथील राहणारे हे विष्णु महादेव होते असें दिसतें. सोपाऱ्यानजिक आगाशी गांवीं गद्र्यांचें एक संपन्न घराणें नांदत आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ले. ५ } ३ { श. १६८३ इ. १७६१

(१) स्वस्ति श्रीनृपशालिवाहन श (२) के ग्न्यष्टांगभूसंमिते सद्दृशे[४] वृ (३) ष नाम्नि घट्टममलं गोदावरी (४) तीरगं ॥ सत्क्षेत्रे रचयत्परोप (५) कृतये सिद्धेशसंतुष्टये बाळा (६) जीत्यभिधां गतः प्रभुवरो मु (७) ख्यः प्रधानः कृतः][ती] शके १६८३ वृषाब्दे ॥

ले. ६ } ४ { श. १६८३ इ. १७६१

(१) स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके (२) ग्न्यष्टांगभूसंमिते सद्दक्षे वृष (३) नाम्नि भानुकुलजो बल्लाळ श-(४) र्मां कृती ॥ यं प्रासूत जनार्दनोथ ज (५) ननी श्री-रुक्मिणी सं[ज्ञि]ता सोयं (६) घट्टममुं शुभं व्यरचय(त्)श्री सिद्ध (७) नाथार्पणं ॥ १६८३ वृष संवत्सरे

ले. ७ } ॥ श्री ॥ { श. १६४४ इ. १७२२

श्री सांबो विजयतेतरां ॥ तयः[स्य] सिद्धेश्वरस्छे[स्ये]यं धर्मशाला विराजि[ज]ते ॥ सूर्यवंशज कोंडाजी यदीय चरणे रतः ॥१॥ शके १६४४ शुभकृतनामाब्दे ॥*

---

३ अमृतराव रघुनाथ यांनीं तीर्थोपाध्येपण दिल्याबद्दलचा ताम्रपट

(ले.–रावबहादूर **का. ना. दीक्षित**)

कांहीं वर्षांपूर्वी 'बिहार आणि ओरिसा रिसर्च सोसायटीच्या[१] वार्षिक समारंभाचे दिवशीं त्या प्रांताचे ले. गव्हर्नर ना. सर एडवर्ड गेट यांनीं पुरी येथील एका पंड्यानें त्यांना दिलेला एक ताम्रपट प्रदर्शित केला होता. नंतर महामहोपाध्याय हर-प्रसाद शास्त्री यांजकडे तो वाचण्यास दिला होता. त्यांनीं तो मजकडे दिला. पेशव्यांचे घराण्यांतील अमृतराव रघुनाथ यांनीं एका पंड्याला आपलें तीर्थोपाध्येपण लिहून

---

४ सद्दक्षे ऐथें छंदोभंग होतो. सद्दक्षे = चांगल्या नक्षत्रीं. ५ सत्क्षेत्रे.

* पा. स. १३।३९. १ प्रस्तुत ताम्रपटावरील इंग्रजी टिपणासाठीं बिहार आणि ओरिसा रिसर्च सोसायटीचे जर्नल भाग ५ पृष्ठ २१६–१७ वरील 'मराठी कॉपर प्लेट ऑफ पुरी' हा ४ था लेख पहा.—डॉ. मो. गं. दीक्षित

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दिल्याचा त्यांत उल्लेख आहे. ताम्रपट ९ इंच ×६$\frac{3}{4}$ इंच या परिमाणाचा असून त्यावरील अक्षरें मोडी आहेत.

ले. ८ } श्री { श. १७२१ फाल्गून शु. ३
इ. १८०० फेब्रु. २६

श्रीमंत अमृतराव रघुनाथ

१ वो राजश्री गौरंग पांडे वास्त
२ व्य क्षेत्र पुरुषोत्तम जगन्नाथ गो
३ सेवक अमृतराव रघुनाथ नमस्कार सुा
४ मया तैन व अलफ जगनाथ हरिहर गुमास्ता तु
५ म्हाकडील याणी क्षेत्र मजकूरचे तीर्थ उपाध्येप
६ णाविशी हुजूर श्रीचे मुकामी येऊन विनंती
७ केली त्याजवरून क्षेत्र मजकूरचे तीर्थ उपाध्ये
८ पण तुम्हास लेहून दिल्हे असे तरी क्षेत्र मज
९ कुरी आमचे वंशीचे येतील ते तुम्हाकडे
१० तीर्थ उपाध्येपण चालवितील यापूर्वी दु
११ सरे कोण्हाकडे वडिलाचा लेख निघाल्यास हे पत्र
१२ रद् असे जाणिजे छ १ शवाल समज्ञार्थ जाण* (श्री लेखन मर्यादा)

---

२ गांव पेठ वसाहती—

४ केळवड्याची ब्राह्मणवस्ती

(श्री. सदाशिव दामोदर भिडे)

†श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब ऊर्फ ताराबाईसाहेब यांनीं खेडेबारे तर्फींतील मौजे केळवडे येथें ब्राह्मणवस्ती करविली. दंतकथा असें सांगते कीं, थोरले महाराज सिंहगडाहून पुरंधरास अगर तोरण्यास जातांना आज सचीवपंतांच्या हद्दींत असलेल्या बनेश्वर महादेवाच्या दर्शनास जात असत. कदाचित् तीच परंपरा पुढील छत्रपतींनींहि राखिली असावी. बनेश्वर हें स्थान केळवड्यापासून अर्ध मैलावर आहे. श्रीमंत आईसाहेब सदर इनामपत्रांत "मौजे केळवडे तर्फ खेडेबारे येथें सरकारचे सेरीपैकीं नूतन इनाम वहीत जमीन नेमून दिल्ही" असें म्हणत आहेत. यावरून असें

---

* पा. स. ११।४१ † पा. स. २।४३

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वाटतें कीं, छत्रपतींची खाजगी जमीन या गांवीं होती. याच शेरीपैकीं सवा एकोणीस बिघे दोन पांड जमीन सात ब्राह्मणांमध्यें वंशपरंपरा वाटून दिली आहे.

या सात ब्राह्मणांपैकीं, तीन घराणीं तेथें नवीं येऊन वसलीं आहेत. यांपैकीं ठकार, भिडे व खरे यांचा वंश सध्यां तेथें नांदत आहे.

त्यावेळीं खेडशिवापूरचा कमाविसदार आबाजी रघुनाथ (उपनाम बुरशे माळशिरसकर हे शिवापुराजवळ बांडेवाडी गांवीं मुजुमदार या नांवानें ओळखले जातात) हा असून सरकार शेरीचा शेरकर रतोजी पवार होता. लेखांक २ मध्यें ब्रह्मे घराण्याचें नांव जास्त येत आहे. त्यामुळें त्याला दिलेल्या जमिनीसह एकंदर जमीन २५॥ बिघे २॥ पांड झाली. हे ब्रह्मे अग्निहोत्री होते. यांना सवासहा बिघे अर्धा पांड जमीन (सरकारी शेरीपैकीं) निराळी दिली असल्याचेंहि लेखांक २ वरून समजतें. ले. ३ वरून असें समजतें कीं, ही सरकार शेरी शक १६९९ मध्यें 'शहाबाग' या नांवानें प्रसिद्ध होती. तिच्यापैकीं बरीच जमिन शेपन्नास वर्षें पडीत असल्यामुळें सरकार ती लावणी करण्यास लोकांना देई. त्याप्रमाणें त्यापैकीं दोन बिघे कृष्णाजी विश्वनाथ कमाविसदार कसबे शिवापूर यानें रामचंद्र हरी वैशंपायन याला बागाईत करावयास शक १६९९ च्या श्रावणांत दिली आहे. हल्लीं वैशंपायनाचा वंश परागंदा झाला आहे. लेखांक ४ मध्यें ज्या ब्राह्मणास आईसाहेबांनीं जमिनी इनाम दिल्या त्यांच्या शक १७४४ माघ पर्यंतच्या वंशावळी दिल्या आहेत.

मौजे कामथडी येथील जगनाथ रंगो कुलकर्णी याचें खरे व भिडे यांना त्यांनीं कुंपणी सरकारास दिलेल्या कैफियतींतील मजकुराची पुरवणी करून देण्याबद्दलचें कबुलीपत्र आहे तें व

मोरभट बिन अनंतभट भिडे यांची आजतागायतची वंशावळ दर्शवीत आहे. ती येथें घेतली नाहीं. फक्त हें येथें सूचित करून ठेवलें आहे.

ले. ९ }

श्री { शक १६७२ आषाढ वद्य १४
इ. १७५० जुलै २१ शनिवार

Inam

A

(गोल शिक्का) Commission 10687

(१) श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याणी वेदमूर्ती राजश्री समस्त ब्राह्मण वस्ती मौजे केळवडे यासि आज्ञा केली येसी जे तुम्ही साहेबासनिध पुणाचे मुकामी येऊन विनंति केली कीं, आपण कुटुंबवछल ब्राह्मण आहों आपला योगक्षेम चालिला पाहिजे याजकरितां कांहीं जमीन इनाम करून द्यावा म्हणोन अर्ज केला त्याजवरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

साहेबानी मनास आणून तुम्ही भले सत्पात्र ब्राह्मण तुमचे चालविलीयाने राज्यास श्रेयस्कर जाणून मौजे केळवडे ताा खेडेबारें येथें सरकारचे सेरी पैकीं नूतन इनाम वहीत जमीन नेमून दिल्ही बिताा ब्राह्मण वगैरे आसामी

वतनदार जोशी उपनाम

ठकार गोत्र काशपशाखा

आस्वलायेनी

०१॥१ हरभट बिन मल्हारभट ०२।२ खंडभट बिन रामभट

०२०२ सीवरामभट बिन लक्ष्मणभट ०३०४॥ बापूभट बिन अनंतभट

०९०४॥

आपाजी ठाकूर निाा सोन ठाकूर जमीन बिघे ०२०४

आगंतुक ब्राह्मण

०२॥३॥ मोरभट भिडे बिन आनंतभट गोत्र निंत्युजन शाखा तैत्री

०३।१ भास्करभट खरे बिन गणेशभट गोत्र कौसीक शाखा तैत्री

०१॥४ आपाजी गोसावी गंगापुरी रामदासी गोत्र अत्री

०७॥३॥

येकूण तेरीज बिघे ०१९।२ सवा येकोणसि बिघे दोन पांड जमीन आवल दूम-सीम तीन प्रतीची नेमून दिल्ही आहे तरी तुम्ही पुत्रपौत्रादी वौंशपरंपरेने अनुभव करून साहेबांचे राज्यास कल्याण चिंतून सुखरूप राहाणें जाणीजे छ २७ शाबान सुहुर सन इहिदे खमसेन मया अलफ बहुत काय लिहिणें (लेखन शूध)

10687 रुजू सुध

बार†

ले. १० } श्री { शक १६७२ आषाढ वद्य १४
इ. १७५० जुलै २१

नकल

(२) श्रीमंत महाराज मातोश्री आईसाहेब याणी वेदमूर्ती राजश्री धोंडभट बिन दामोदरभट उपनाम ब्रह्मे गोत्र काश्यप शाखा आश्वलायेन वस्ती मौजे केळावडे यास आज्ञा केली ऐसी जे तुम्ही साहेबासंनिध्ध पुण्याचे मुकामी येऊन विनंति केली की आपण कुटुंबवछल आमहोत्री ब्राह्मण आपला योगक्षेम चालिला पाहिजे याज-

† जोडावर लेखन शूध व इनाम कमिशन यांचे शिक्के आहेत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करितां कांहीं जमीन इनाम करून द्यावा म्हणोन अर्ज केला त्याजवरून साहेबानी मनास आणून तुम्ही भले आग्नेहोत्री सत्पात्र ब्राह्मण तुमचे चालविलीयाणे राज्यास श्रेयस्कर जाणून मौजे केळवडे ता। खेडेबारे येथील सरकारचे शेरी पौ नूतन इनाम वहित जमीन बिघे ०६।-॥ सवासहा अर्धा पांड अवल दूम सीम तीन प्रतीची नेमून दिल्ही आहे तरी तुम्ही पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने आनभव करून साहेबाचे राज्यास कल्याण चिंतून सुखरूप रहाणें जाणिजे छ २७ साबान सु॥ इहिदे खमसेन मया अलफ बहुत काय लिहिणे मोर्तब असे

(मागील बाजूस)
(मोर्तबा जवळ) रुजू
बार

ले. ११ } श्री { श: १६९९ श्रावण वद्य ९
{ इ. १७७७ आगष्ट २७

(३) राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र हरी वैशंपायन स्वामी गोसावी यासी

सेवक कृष्णाजी विश्वनाथ कमावीसदार कसबे सिवापूर नमस्कार विनंति उपरी मौजे केळवडे ता। खेडेबारे येथें शेरी शहाबाग पौ जमीन गावाचे लगती सेपनास वर्षे पड पडलेली होती आजमासे बिघे ०२ दोन ती तुम्ही बागाईत करावयाबदल व झाड-झूड लावावयाकरिता मागीतली त्याजवरून तुम्हास जमीन दिली असे तरी जमीन चांगली करून वसाहात करणें कोणेविसी उपसर्ग लागणार नाहीं जाणीजे छ २३ रजब सु॥ समान सबइन मया व अलफ मोर्तब सुद बहुत काय लिहिणें हे विनंति (शिक्का)

ले. १२ } श्री { श. १७४४ माघ वा॥ १०
{ इ. १८२३ फेब्रु. ७

(४) यादी मौजे केळवडे ता। खेडेबारे येथील सेरी पौ श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब याणी ब्राह्मणास इनाम जमीन करून दिल्ही त्याची वंशावळ संपादन पुरुषापासून आजपर्यंत सु॥ सलास अशेर मया तैन व अलफ शके १७४४ चित्र-भानुनाम संवत्सरे सन १२३२ फसली मि॥ माघ वा॥ १० सौम्यवासर

०२८॥३॥ प्रा सनदा २ छ २७ साबान सु॥[1] ईहिदे खमसैन मया व अलफ ऊर्फ
आषाढ वा॥ १४ मंदवासर प्रमोद संवसर येक बिघे ०२५॥२॥ व दुसरी छ २५

---

१ श. १६७२ आषाढ व. १४ = इ. १७५० जुलै २१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मोहरम सुा[२] तिसा खमसेन मया व अलफ बहुधान्य नाम संवत्सरे येक बिघे
८३८१ ऐकूण बिघे

९८४॥ वतनदार जोशी उपनाम ठकार गोत्र काश्यप शाखा आस्वलायन

८१॥१ हरभट बिन मल्हारभट संपादन पुरुष याची वंशावळ याचे पुत्र गणेशभट
येकच याचे पुत्र रामभट १ आा विठलभट आा १
त्रिंबकभट १
पुत्र ३ याचे पुत्र हली आहेत

रामभट याचा वंश हली उपभोग करितात

१ विष्णुभट उमर ३५	१ वामनभट उमर ३२
१ श्रीधरभट उमर २८	१ कृष्णंभट उमर २२
	४

त्रिंबकभट याचा पुत्र बापूभट उमर वर्षे ७ उपभोग करितात आा १
विठलभट याचा वंश नाहीं हली तेच आहेत उमर ५० आा १

८२८२ सीवरामभट बिन लक्ष्मणभट संपादन पुरुष याचे पुत्र दादंभट याचे पुत्र मल्हारभट हली उपभोग करितात उमर वर्षे ४०

८२।२ खंडभट बिन रामभट संपादन पुरुष याचे पुत्र मल्हारभट येकच त्याचे पुत्र पांडुरंगभट हली उपभोग करितात उमर वर्षे ३०

८३८४॥ बापूभट बिन अनंतभट संपादन पुरुष याचे पुत्र विठलभट येकच त्याचे पुत्र सदासीवभट हली उपभोग करितात उमर वर्षे ३६

८९८४॥

८१७। अगांतुक ब्राह्मण

८६।०॥ धोंडभट बिन दामोदरभट संपादन पुरुष .

धोंडभट याचा वंश यांचे पुत्र	आनाभट धोंडभट याचे बन्धु त्याचे पुत्र
१ चिमणभट	१ बापूभट उमर ४५
१ महिपतभट	१ भाउभट उमर ३५
२	१ मोरभट उमर ३०
याचे संताण नाही १	३

२ श. १६८० भाद्र. व. १३ = इ. १७५८ आक्टो. २९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तीन असामी उपभोग हली करितात

८२॥३॥ मोरभट बिन अनंतभट भिडे संपादन पुरुष याचे पुत्र

सदाशिवभट याचे पुत्र १
१ रामभट उ. ६०
१ रघुनाथभट उ. ४५
१ बज्यंभट उमर ३८
३. हाली उपभोग करितात

गोपालभट याचे पुत्र १
चिंतामणभटजी याचे पुत्र जनार्दन भट हाली उपभोग करितात उमर वर्षे ३५ आा १

८६८२ भास्करभट बिन गणेशभट खरे संपादन पुरुष याचे पुत्र नारायणभट याचे पुत्र गोविंदभट खरे उ. ३५ हाली उपभोग करितात आा १

निलकंठ याचे पुत्र विनायेकभट उमर २८ हाली उपभोग करितात आा१

दोन आसामी उपभोग करितात

८३।१ ग्रा सनद येकंदर बिघे ८२५॥३॥ पौ

८३८१ ग्रा सनद १ सनद गाहालली तिची नकल दिल्ही आहे दिल्यापासून जमिनीची वहिवाट आजपावेतों करीत आहेत ८६॥२

८१॥४ आपाजी गोसावी गंगापूर संपादन पुरुष याचे शिष्य रामदासीबावा उमर वर्षे ६५ ८११।

८२८४ आपाजी बिन सोन ठाकूर संपादन पुरुष याचे पुत्र ठाकूरदास उमर ३०

८२८॥३॥

८५ रघुनाथभट बिन जनार्दनभट गोडसे संपादन पुरुष यासी सनद भटजीचे नावे छ* २ जिल्हेज सुा तिसा खमसेन मया व अलफ बहुधान्यनाम संवत्सरे याचे पुत्र भिकंभट उ. ५० कोंडभट उ. ४५

उभयता बंधु दोघेजण उपभोग करितात.

८३३॥३॥

सदरहू लिहिल्याप्रमाणें आजपावेतों सुरळीतपणें चालत आहे सदरहुप्रमाणे कैफत वंशावल लेहून दिल्ही खरी आहे हस्ताक्षर गोविंदभट खरे

---

* श. १६८० श्रावण शु. ३ = इ. १७५८ आगस्ट ७

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५ पेशवे व सातारा येथील सोमवार पेठ

(कै. वा. वि. जोशी, सातारा)

[१]सातारा शहरांत पूर्वी पेशवे राहात असलेला वाडा+ आहे. हा वाडा किल्ल्याचे पायथ्यास असून त्याचे पुढील भागाचा सोमवार पेठेंत समावेश होतो. मागील कालांत प्रत्येक गांवांत व शहरांतून प्रत्येक पेठेंत शेटे, मुश्रीफ, महाजन, आवटे व चवधरी या नांवाचे वतनदार असत व त्यांच्या उत्पन्नाच्या बाबी निरनिराळ्या असत. सातारा शहरांतील मंगळवार पेठेचे पंतप्रतिनिधि मुख्य वतनदार असत. व त्यांचा या पेठेंत सर सुभेदार जोशी यांचे वाड्याजवळ झेंडा असून पेठेचे संरक्षणाकरितां झेंड्याजवळ हत्यारबंद चौकी* असे. पंतप्रतिनिधि जसे मंगळवार पेठेचे तसे पेशवे सोमवार पेठेचे मुख्य वतनदार असावेत, असा खालीं नमूद केलेल्या 'अर्जदास्त' वरून तर्क करितां येतो. सातारा येथील एका वाण्याचे दुकानांतील रद्दी कागद चाळून पहात असतां ही अर्जदास्त मिळाली ती पुढीलप्रमाणें आहे.

ले. १३ } श्री { श. १७२९
{ इ. १८०७

श्रीमंत राजश्री——पंतप्रधान साहेबांचे सेवेशी

अर्जदास्त सुभ्या वलद नायेकू महार ढाले पेठ सोमवार शाहूनगर सुाा समान मयातैंन व अलफ कारणे कागद लेहून दिल्हा ऐसाजे आपली पड सरकारबाब ही शनवारकर ढाले व गुरुवारकर ढाले यास वाटणी दिल्ही नाही मलकण्णा गौळी याचे घरी पुणेकर गौळी आला होता त्याची म्हैस मेली ती शनवार पेठेत पडली ती शनवारकर ढाले घेऊन गेले त्यास सदाशिवपंत फडणिसांचे कारकीर्दीस सरकारातून ताकीद करून हे (म्है)स आमचे आम्हास देविले त्याचे अलीकडे शनवारकर यांचे व आमचे खटले पडले नाहीं

---

१ पा. स. ११३९

+ या वाड्यास 'अदालत वाडा' (न्यायमंदिर) असें म्हणतात व सांप्रत तो सातारा येथील छत्रपति घराण्याचे मालकीचा आहे. छत्रपति प्रतापसिंह व आपासाहेब महाराज यांचे कारकीर्दींत तेथें न्यायमंदिर असें.

* सर सुभेदार जोशी यांचे वाड्याजवळ व त्यांचेच मालकीचे जागेंत हल्ली पोलीस गेट आहे. गेटापुढें गेटाचे नांवाची जी पाटी आहे त्यावर 'झेंडागेट' अशीं अक्षरें आहेत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हा अर्ज दुसरे बाजीराव यांचे नांवें केला असून अर्जांत 'पड' असा शब्द आला आहे. गाय, बैल, म्हैस, रेडा वगैरे जनावर मेलें म्हणजे त्यास महार लोक 'पड' किंवा 'पडें' म्हणतात. सुभ्या हा सोमवार पेठेचा ढाल्या‡ असल्यामुळे त्यानें सोमवार पेठेंतील पड्यावर हक्क बजवावयाचा, परंतु पुणेकर गौळ्याची म्हैस शनवार पेठेंत मेली त्याचें पडें त्यानें सरकारदरबारांतून मिळविलें आहे व त्यास तो 'सरकारबाब' म्हणतो. व असें म्हणण्यास म्हैस पुणेकराची होती असा तो आधार देतो. सुभ्या अर्जांत 'आपली पड सरकारबाब' असें पंतप्रधानास म्हणतो. म्हणजे शाहुनगरांत कोणाही रयतेचें जनावर मेलें तर त्यास जे नियम लागू आहेत ते नियम मरून पडलेल्या पेशव्यांचे जनावरास लागू नसून तें पडें सोमवारपेठेच्या ढाल्यानेंच द्यावयाचें असें म्हणण्याचा सुभ्याचा रोख आहे. सोमवार पेठेच्या ढाल्यास हा जो विशेष हक्क मिळाला आहे तो सोमवार पेठेचे पेशवे मुख्य वतनदार म्हणून मिळाला असला पाहिजे. पेशव्यांचें मुख्य ठिकाण पुणें; परंतु ते सोमवारपेठेचे वतनदार म्हणून वतनदाराच्या गांवचा म्हणजे पुण्याचा कोणीही इसम शाहुनगरांत आला असतां त्याचें जनावर तेथें मेलें तर तें वतनदाराच्या पेठेच्या ढाल्यानेंच द्यावयाचें असा 'सरकारातून' (छत्रपती) नियम ठरलेला दिसतो. सुभ्या अर्जांत 'सदाशिवपंत फडणिसांचे कारकीर्दीस सरकारांतून ताकीद करून है (म्है)स आमचे आम्हास देविले' असें म्हणतो. ज्या रद्दी कागदांत सुभ्याचा अर्ज मिळाला त्यांतच शक १७०३ सालचा एक जमाखर्ची बंद मला मिळाला आहे त्यावरून सदाशिवपंत हे शक १७०३ साली फडणिशीवर होते. यावरून मागील हकीगत सुभ्यानें दाखल्याकरितां लिहिली आहे हें स्पष्ट होतें. सुभ्याचे अर्जावरून पेशवे सोमवार पेठेचे वतनदार असावेत येवढा तर्क करितां येतो.

---

६ सातारा येथील प्रतापगंज पेठ

(कै. वा. वि. जोशी, सातारा)

पेशवाई काल समाप्त झाल्यावर ईस्टइंडिया कंपनीचे छत्रा खालीं सातारा येथें प्रतापसिंह महाराजांचा अम्मल चालू झाला. या नव्या मन्वंतरासोबत सातारा शहराचे रचनेंतहि बदल होण्यास सुरुवात होऊन महाराजांनीं शहराच्या उत्तर भागांत असलेलें स्मशान उठवून तेथें इ. स. १८२४ सालीं नवा राजवाडा (आतां दोहोंपैकीं जुना)

‡ त्रै. वर्ष २२ ऐ. सं. सा. खं. ४ ले. १२ पृ. ३३–३४ पेठेचें ढालेपणाचें वतन पहा. —शं. ना. जोशी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बांधिला. या वाड्या बरोबर वाड्यापुढें 'भवानी' या नांवाची पूर्वपश्चिम लांबीची पेठ वसविली. ही पेठ वसविल्यावर याच पेठेस लागून दक्षिणोत्तर लांबीची महाराजांच्या-नांवाची 'प्रतापगंज' पेठ वसविण्यांत आली. या पेठेच्या वसाहत कालाची माहिती देणारें एक पत्र मला आमच्या सातारा येथील थोरले वाड्यांतील रुमालांत मिळालें.—

ले. १४ श्री श. १७५६ श्रावण वद्य ३० इ. १८३४ सप्टं. २

राजश्री महादाजी रामचंद्र जोशी आवटी गोसावी यास

स्नो हिराचंद बिन दलिचंद मारवाडी शेटे व कृष्णराव मोहिते माहाजन पेठ प्रतापगंज शेहर सातारा सुा खमस सलाशीन मयातैन व आलफ शहर मजकूर येथे प्रतापगंज पेठ नवी वसवावयाची सरकारची आज्ञा जाहली त्या नजीक पूल बांधावा लागतो तो पेठ वसविणारानी बांधावयाचा ठरला त्याचे खर्चास आजमासे पंधराशे रुा लागतात हे रुा ज्यास पेठेंतील वतनें नवीन करून द्यावयाची त्याजपासून वरगत करून घ्यावे आसे ठराऊन तुम्हास आवटीपणा आढासुधा भुसार देखील किराणा आसे वतन द्यावयाचे करार करून तुम्हापासून पुलाचे खा बदल रुा १०० शेंभर घ्यावयाचे ठरविल्या प्रो तुम्हीं दिल्हे तें रोख पावले आसेत पेठेस सरकारांतून कौल होईल त्यातून कांहीं सालें माफीची ठरऊन बाकी सालांत फाळापटी वगैरें चालू करून त्याचें उत्पन्न कौल भरे तोपर्यंत जमा येईल त्याज पो वरगतीनें जितके रुपये सदरहू रुपयावर बसतील ते तेंव्हा पावतील छ २८ रविलाखर मुा ताा २ सप्टंबर सन १८३४ इसवी

(सही मारवाडी) हिराचंद बिन दलीचंद मारवाडी

हस्ताक्षर पांडुरंग मोरेश्वर कारकून निाा गणेश नरहर पराडकर मुश्रीफ पेठ माा

वरील पत्रांत ज्या पुलाचा उल्लेख आहे तो रा. गणेश गोपाळ कुबेर वकील यांचे घराजवळील पूल होय. या पत्रलेखनकाळीं महादाजी रामचंद्र जोशी आवटी यांचें वय केवळ सोळा वर्षांचें असून त्यांचे वडील रामचंद्र गंगाधर ऊर्फ दाजीबा दादा जोशी सरसुभेदार यानीं महाराजांचे कृपेनें हें आवटीपणाचें वतन त्यांचे नावें मिळविलें होतें.*

---

* पा. स. ६।३९

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

३ व्यक्ति व घराणीं--

७ उमाजी नाइकाचीं कांहीं पत्रें

(कै. पां. न. पटवर्धन)

ले. १५

†मालुमत पादशाहा व सलतनत—येसाजी नाईक कोळी चिव्हे कुलमुखत्यार अमदार धनी सरकार नायकवाडी महिपतजी नाईक रामोसी खोमणे नाईक वडील बहिरनाक परिवारी नायकवाडी किले पुरंधर हासल की सिकंदर पादशाहा सुा समान इसने+ मया व अलफ घेरा एकूण एकवीस चाहूर साठ बिघे एकूण ×× चौसष्ट बिघे व वजीरगडी बिघा एकसोद्स एकूण पडझड बारा बिघे रुसूमदार काल घरी दराडी ××× पाऊणसे एकूण पडझड सोळा गावडदरा बंदररुसुम आडच चाहूर तीस बिघे एकूण पडझड पंधरा बिघे एकूण जमा चाहूर एकवीस एकूण तीस मालुमात वगैरे किले का घेरा बकशीस पेठ व माची एकसोतीस एक व पूर दसएक एकूण एकसोचाळीस एक पडझड एकूण वीस एक एकूण एकंदर एकसोसाठ एक बकशीस ×× भर लगाई तुज गाईची शफत

ले. १६

श्री

यादी संपादन करणार मूळ पुरुष वर्धई खोमणी व धुलई भांडवलकर

वर्धई खोमणे यास पुत्र	भांडवलकर यास पुत्र
१ खंडोजी नाईक यास पुत्र	१ सुभानजी यास पुत्र
१ तुकजी नाा यास पुत्र	१ अंबाजी नाईक
१ दादजी नाा यास पुत्र हाली	३ राघोजी नाईक
उमाजी नाईक	राघोजीचा पुत्र भुजाजी

भुजाजी—जुंजाजी—सखाराम—राघु (साकुर्डी येथें राहतो).

ले. १७

श्री

शा. १७५१ चैत्र शु. १३
इ. १८२९ एप्रील १७

राजश्री बहिरजी बिन मालजी धावडे हुजरे मौजे कोढवे कोपरे ताा कर्यात मावळ सुभा पुणे व माहातारजी बिन तुकोजी पाा बाट मौजे कुमोसी ताा खेडेबारे यासी

---

† पा. स. ८४१. + हा सन लिहिण्यांत कांहीं घोटाळा दिसतो; समान व इसने हे दोन्ही आंकडे (८,२) एकं चेच आले आहेत तें चूक आहे. सर्व पत्रच घोटाळ्याचें आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

स्नेहांकित सिवजी बिन येसाजी नाईक चिव्हे मोकदम किले पुरंधर व अंदोजी नाईक व आमृतजी नाईक व उमाजी नाईक व कृष्णाजी बिन दादजी नाईक खोमणे व जनकोजी नाईक व भुजाजी नाईक बिन राघोजी नाईक भांडवलकर व समस्त दाहीजण किले मजकूर रामराम विनंती ऐसी जे तुमचे आमचे इमान आजपासून ठरले की आपले वंशपरंपरेने व आमचे वंशपरंपरेने इमाने परस्परे चालावे याप्रमाणे आपले तर्फेचे राखण रान व गाव व घर मार्गानी दंगा धोपा दिवसा व रात्रीस हरएक नुकसानगिरी होऊ देणार नाहीं इत्यादिक आमचे वौशाचा जो असेल तो राखण करील तत्रापि हर कोठे हस्कीया पासोन जातीत आमचे जमाती खेरीज कोठे अंतर पडल्यास शोध पत्ता लावणे आणि आपले नुकसान न होऊ देणे हे आम्हाकडे याजविसी तुमची व आमची क्रिया दूधभातांची व श्री म्हाळसाकांत याचा बेलभंडार व श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपती स्वामींचे पायाची शफत करून करार इमानाचा लिहून दिल्हा असे त्यास तुम्हीं हि आमचे संरक्षणा विसी हर एक वखत आपलेकडून घडेल त्यात अंतर करू नये आम्हाकडून आमचे वंशात अंतर पडणार नाही हे इमानपत्र लिहून दिल्हे सई सुा तिसा आशेरीन मया तैन व आलफ शके १७५१ चैत्र शुध १३

हस्ताक्षर बापूजी
आनंदराव चिंटणिस

निशाणी तिरकमठा

साक्ष

१ चिमाजी बिंन विठोजी नाईक कोडे देशमुख ताा खेडेबारे
१ त्र्यंबक केशव कारकून वंदनकर

ले. १८ } श्री { श. १७५० फाल्गु. शु. २
इ. १८२९ मार्च ७

गोतगंगा देव कासी किले पुरंदर व समस्त ११ दाहीजण गोसावी यांसी स्नाो गोतपत्र गोताई केली सबब

१ राा उमाजी नाा किले पुरंधर	१ संभू जाधव सिवणेकर पौनमावळ
१ राा विठोजी नाा किले पुरंधर	१ नायकू चव्हाण सडवलीकर पौनमावळ
१ रामजी नाईक रोडे तलेगावकर	१ बहिरु चव्हाण पुसाणेकर पौनमावळ
१ संताजी नाा खिरसागर वडगावकर	१ बाळाजी—
१ लक्ष्मण नाा गावडे अलंदीकर	१ कुसाजी काथलकर चव्हाण
१ अंदोजी नाा धुलाटे नवलाख उंचरे	

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

समस्त देहे तुकोजी बिा अर्जुनजी चुकारे रामोसी मो टाकवे बुा ताो नाणेमावळ तू समस्त गोतगंगेत अर्ज केलास तेव्हा तुझा वाका सर्व मनास आणून तुजला सर्व गोतानी घेऊन जातीत पावन केला हे तुजला गोतपत्र करून दिले मिा फाल्गुन शुा २ शके १७५० सर्वधारी नाम संवत्सर

साक्ष निा तिरकमठा

१ रामराव ना कोळी यादव किले पुरंधर

२ बापूजी नाईक चिव्हे किले पुरंधर

१ माहादजी बिा रायाजी पा आसवले मो टाकवे

१ राघनाक वा धोडनाक मौजे टाकवे

बिा लक्ष्मण वासुदेव वैद्य निा रा उमाजी ना किले पुरंधर

ले. १९ श्री { श. १७५० माघ शु. १२ / इ. १८२९ फेब्रु. १५ }

ता मोकदम व (अ)डाणी गावगना तर्फानिहाय पा मावळ सुभा पुणे तिसा अशरीन मया तैन व अलफ उमाजी नाईक व भुजाजी नाईक किले पुरंदर याचे लोक चोरट्याचे बंदोबस्ताकरिता स्वारी गावगना फिरत आहे त्यास सरंजाम लागेल तो वाजवी निरखाप्रो पैदा करून देऊन वाजवी पैसा घेत जाणे त्याचे जिनसाविसी बोभाट पडू नये व तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८२९ इसवी

ले. २० श्री { श. १७५० आषाढ व. ५ / इ. १८२८ जुलै ३१ }

नकल

यादी उमाजी नाईक खोमणे व समस्त भाऊ नाईक भांडवलकर व समस्त भाऊ रामोशी किले पुरंदर आम्हास सरकारातून आज्ञा जाली की तुम्हाकडे जमिनी इनाम वगैरे परगणे पुरंधर महालात काय आहेत त्याजपैकीं चालू किती वगैरे ते लेहून देणें म्हणोन आज्ञा त्यास

१ मौजे साकुरडे ता करेपठार येथे मोकासा आहे तो आमचा आम्हाकडे आजपावेतो चालत आहे. सरकारातून अटकाव नाही आम्ही परागंदा होतो सबब साहाजीक गावाकडे आमचा ऐवज राहिला आहे.

१ इनाम जमिनी आजपावेतो आम्हाकडे चालत आहेत सरकारातून अटकाव नाही त्या जमिनीची × ×

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ मौजे साकुर्डे तर्फ करेपठार येथे चाहूर एक
१ मौजे भिवडी तर्फ मजकूर येथे जमीन चाहूर दीड पाो एक चाहूर चालू आहे तो
·॥· मौजे जोगवडी तर्फ मजकूर येथे चाहूर ·॥·
·॥· मौजे जवळार्जुन तर्फ मजकूर चाहूर ·॥·
·॥· मौजे आंबळे तर्फ मजकूर चाहूर ·॥·
·॥· मौजे वनपुरी तर्फ मजकूर येथें चाहूर ·॥·
—
४

सदरहू च्यार चाहूर आम्हांकडे आजपावेतो चालत आहेत

१ चालत नाहींत ते—

·॥· मौजे भिवडी तर्फ करेपठार येथे दीड चाहूर जमीन इनाम आहे त्यापैकी एक चाहूर जमीन चालत आहे ती सदरी लिाा आहे बाकी आर्धा चाहूर जमीन हली आम्हाकडे चालत नाही याची सबब अंदोजी बिन दादजी नाईक रामोशी हा मौजे मजकुरीहून परागंदा जाहला सबब सन १२३४ ताा १२३७ फसली एकूण च्यार साला सरकारात जप्ती केली आहे त्यात दोन साला सदरहू जमिनीची लावणी होती त्याचे उत्पन्न सरकारांत आले आहें व बाकी दोन साला सदरहू जमीन पड पडली आहे

१ कुरणे आमची आम्हाकडे पेशजीपासून चालत आली अलीकडे सन १२३३ फसली आम्ही व अंदोजी नाईक रामोसी परागंदा जालो सबब आम्हाकडे वहिवाट चालली नाही ती कुरणे

१ मौजे साकुर्डे ताा करेपठार येथें कुरण एक आहे ते

७ किले पुरंधरचे घेन्यापैकी ६ सायघाटापासून हद कासारखिंडी पावेतो या हद्दीत कुरणे आहेत ती

१ जाळ्याचे कुरण
१ कपिलधारेचे कुरण
१ रडतोंडीचे कुरण
१ जांबुळवाडी गायठाण सुाा कुरण
१ राळेरास दिवाण मोहला सुाा कुरण
१ कासारखिंडी कुरण
—
६

सदरहू सहा कुरणे लहाण दाडा आहेत यात आमच्या वसाहतीच्या वाड्या होत्या परंतु आम्ही परागंदा होतो सबब ही वसती नाही

१ ऐन घेन्यापैकी गाभडदरा कुरण एक
—
७
—
८

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येणेप्रमाणे आम्हाकडे चालत आहेत याचे दाखले पुरंदर मा(हा)लचे कागदोपत्री आहेत व पेशजी आम्हाजवळ इनाम वगैरे बाबत सरकारातून करून दिले ते ताम्रपत्रे होती ते साहेबानी घेतले आहेत ते साहेबाजवळ आहेत व आम्ही परागंदा होतो तेव्हा जव्हारसिंग जमादार याजकडे तपासनिसीचे काम होते तेव्हा जमादार यानी मौजे राककर यांत सासवड येथून आमचे सनदापत्रे व कागद जमादार याणे घेतले ते हुजूर फौजदारीकडे नेऊन दिले आहेत त्यास सदरहू कागद व सनदा व ताम्रपत्रे सरकारात आहेत ते आमचे आम्हास सरकारातून दिले पाहिजेत व त्याप्रमाणे इनामे व मोकासे वगैरे आम्हाकडे चालविले पाहिजे या खेरीज आमचे सनदापत्रे वगैरे कागद गैरविल्हेस पडले आहेत ते मागे पुढें निघाल्यास त्याप्रमाणे बंदोबस्त केला पाहिजे आणि जमादार याचा जकात आम्हाकडे नाहीत हा सिरस्ता मामूल आहे त्याप्रमाणे चालले पाहिजे आणि सात कलमाची अर्जी दिली त्याप्रमाणे बंदोबस्त साहेबी मेहेरबान होऊन जाहला पाहिजे मि॥ आषाढ वद्य ५ शके १७५० सर्वधारी नाम संवत्सरे

सदरहू लिहून दिले सही उमाजी नाईक व भुजाजी नाईक किले पुरंधर खुद्द

ले. २१

१ महिपतजी–कृष्णाजी–१ रामजी, २ रखमाजी
२ ।
२ रामजी–तुकाजी–वर्धोजी– राणोजी– बहिरजी–१ मल्हारजी–२ वर्धोजी (पुढें घेतला नाहीं)

–१ खंडोजी २ तुकाजी (घेतला नाहीं).

खंडोजी–तुळाजी–१ दादजी, २ रखमाजी (घेतला नाहीं)

दादाजी–१ सयाजी २ मालजी ३ बहिरजी ४ अंदोजी ५ अमृता ६ उमाजी ७ कृष्णाजी

पो सयाजी, मालजी व बहिरजी, हे तिघे सख्ये भाऊ व बाकी अंदोजी, २ अमृता, ३ उमाजी व ४ कृष्णाजी असे चार भाऊ

सयाजीचा वंश माहूर (किल्ल्याचे दक्षिणेस) मालजी, व बहिरजी नकल आहेत

अंदोजीची आतां नकल, अमृताची नकल. उमाजी–मंकाळा व तुका; मंकाळा–सखाराम–आण्णा व तात्या; तुका–राजाराम–नाना.

कृष्णाजी–रंभाजी व रावजी; रंभाजी–हरी–(पांच मुलें); रावजी–भाऊ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ले. २२ } श्रीपुरंधर { नकल

संभाजीराजे

यादी हाकीकत वतन किले पुरंधर जबानी वरधई बेरड खोमणा पानाचे भांडण याने आपली

राजश्री नीळकंठराऊ किलेदार याचे वेळेस धुलई बेरड भांडवलकर यास जावनाक व गवरनाक त्याचे मौजे सोमुर्डी याने धुलई बेरड यास किला आणून रा। रायास रायानी चाकरीस लईने ठेविला आपले बाप बहिरेहे खोमणा यासी कथला पानाचा मांडिला आहे बहिरई बेरड खोमणा दिल्ही धुलई मारीत नाही

किला किलेदार प्रधानजी मोगलाचे वेळेस कोळी व बेरड खलख आपलमटी(?) होते ते समई पेठ नारायणपूर येथे कलवंतीण राहात होती तिचे घरी चोरी जाली बेरीज रु च्यारसेच्या बदल किलेदार कोळ्याचे व बेरडाचे गळी पडला मग दिवाने मिळे ते समई नाईक

१ रामजी ना।
१ सावजी ना।
१ सांबजी नाईक सगार
१ लखमोजी नाईक मिसाळ
१ दादजी नाईक कालकूड
१ खोमणा
१ मलवरी भांडवलकर

श्रीचे देवळी दिव्य जाले साजण खरे जाले दिवाणातून सिरपाव दिला

आपले सेजारी राहात होता पळोन गेला खोटा जाला पानाचा कथला करितो कलम १

बहिरई खोमणा याचा लेक खोमणा याने मौजे कुंभारवळण येथील कोतवाल जिवे मारिला त्याची चाहाडी धुलई भांडवलकर याने केली रायाजवळ

× × ×

जखमी सेलियाचे वाडियात आहेत असी चाहाडी धुलई भांडवलकर याने सांगितली मग रा। रायानी किलातून लोक पाठवून सुपाची वाडी घोरवडीहून बहिरजी खोमणा बेरड आणला आबदखानी ठेविला गुरे कुल आणिली सारी गुरे सरकारात ठेविली मग पोट भरावयास चार बैल बहिरई बेरड यास दिल्हे रायानी त्यास सोडून दिल्हे धुलई बेरड यास रायानी विचारले कीं बहिरई बेरड हा काय होय त्याने सांगितले की आपला मेहुणा होय रा। राव बोलिले की त्याची चाहाडी कायेबदल केली मग रायानी आठ म्हसी दुभत्या गुन्हेगारीबदल नेल्या पानाचा कथला कलम १

किले रायगडी माहाराज राजश्री साहेबी बेरड नाईकास बोलाविले नाईक यांचे जण

१ खंडई पानवडीकर
१ खंडई बिन धुलई
१
१ वरधई खोमणा
१ येसई सुपेकर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पांचजण नाईक तह केला की
तुझी पाने खरी दिवाणाची आपली घेणे
या गोष्टीस गोही ऐसई सुपेकर बेरड
आहे कलम १*

---

८ खुश्रु शेट मोदी यांचें चित्र व माहिती

(कै. पां. न. पटवर्धन)

पेशवाईच्या अखेरीस कर्नाटकच्या सुभेदारीवर असणारा खुश्रुजी जमशेटजी मोदी याची कांहीं हकीकत 'मंडळा'च्या शके १८३७ च्या वार्षिक इतिवृत्तांत पृ. १४६ वर नमूद आहे. या शेटजींचें एक चित्र शा दिनशा एदलजी मोदी, प्रास्पेक्ट लॉज, ऑल्टमाऊंट रोड, मलबार हिल, मुंबई यांचे संग्रहीं असलेलें मला माझे स्नेही रा. रा. पांडुरंग गणेश सहस्रबुद्धे, दादर–मुंबई यांच्या कृपेनें मिळालें, मोदी शेट यांस तें पुण्यास मेनस्ट्रीटमध्यें एका पारसी ज्ञातींतील प्रोव्हिजनल सप्लायर दुकानदाराकडे इ. स. १९१४ सालीं मिळालें, अशी मोदी शेट माहिती सांगतात. खुश्रुजी शेट मोदी यांची मिठीबाई नांवाची ८७ वर्षांची पुतणी अद्याप[1] मुंबईस हयात आहे. तिच्या व खुश्रुजी शेटच्या चित्रांत बरेंच साम्य आहे. तिच्या जन्मापूर्वीं १५।२० वर्षें अगोदर खुश्रु शेट वारल्यामुळें व तिचे वडील ती सहा महिन्यांची असतांना निवर्तल्यामुळें, तिला फारशी माहिती सांगतां येत नाहीं, यांत नवल नाहीं. शेट दिनशा एदलजी मोदी, मुंबई यांजकडे, अगर खुश्रुजी शेट मोदी, मु. रालेज, ता. बोरसद, जि० खेडा यांजकडे प्रयत्न केल्यास खुश्रुजींच्या वेळचे कागदपत्र मिळण्याचा संभव आहे.

ले. २३ } { श. १७४१ मार्ग. शु. ५
{ इ. १८१९ नवं. २२

(पुरंधरे दप्तर) अस्सल–मोडी

रावसाहेब मेहरबां दोस्तां त्र्यंबकराव नाना पुरंदरे दांमोहबतहू

छ अजी सौब राबटसन साहेब कलकटर सुभा पुणें सलांम बाजद सलाम आंकी येथील खैरयत जाणोन आपली खैर आफियत हामेशा कलमे करीत जावे दिगर कुंपणी सरकारातून हाली येथे अजम उलिये चापलेन साहेब बहादूर कमिसनर

---

* पा. स. ८।४१

1 इ. स. १९१९

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मुखत्यारीचे कामावर आहेत त्याणी जाहीरनामा लिहिला आहे त्यांतील मजकूर कोणी शकस खुद बाजीरावसाहेब यांशी किंवा त्यांच्या आनुमत्तावरून दिगर कोणाशी तरी आपण खुद आथवा दुसरेयाचे मारफतीने जवाब सवाल किंवा कागदपत्र अगर कोणत्याही रीतीने काही इला × ठेविल्यास त्यास सरकारातून सिक्षा चांगली होईल आणि जाहागीरदार व संरंजामी व इनामदार व वतनदार वगैरे लोकास ज्यांस सरकारातून काही चालत आहे त्या लोकाकडून असे काही घडल्यास त्याच वेळेस त्यास जें काही चालत आहे त्याची जप्ती करून त्यासिवाय आणखी त्यास जी सिक्षा करणे सरकारास मुनासब आहे त्याप्रमाणे केली जाईल या करितां हुकुमनामा लोकानी नीट ध्यानास आणोन वर्तणूक करावी म्हणोन तारीख १२ नवंबरचा हुकूम जाहीरनाम्यात लिहिला आहे त्याजवरून हे पत्र आपल्यास लिहिले आहे तर सरकारचे जाहीरनाम्याप्रमाणे बाजीरावसाहेब याजकडे कागदपत्र किंवा हरएकविशीचा इतला न ठेविता कुंपणी सरकारचे हुकुमाप्रमाणे वर्तणूक करावी आगर बाजीरावसाहेब याजकडे इतला ठेवणे तर सरकार हुकुमानें या मुलकातून निघोन जावें आगर आपले मनात बाजीराव साहेब याजकडे हर एक-विशीचा शिलशिला ठेवीत नाही असे आहे तर खूब समजावे की आपला व त्यांचा कांहीं एक हरतरेचा शिलशिला आगर आणखी काही तरचा फितूर आहे असे सरकारात समजल्यास तेंच समई आपली जाहागिर व तैनात व इनामत व वतने वगैरे याची जफ्ती करून पारपत्य केले जाईल हे समजोन या दो गोष्टीतून कोणते येक पसंत करून मेहरबानी करून या पत्राचे उत्तर जलद पाठवावे म्हणजे आम्ही आपला इरादा काय आहे तो सरकारात जाहीर करू रा तारीख २२ माहे नवंबर सन १८१९ इसवी ज्यादा काय लिा प्यार मोहबत असो दिल्ही पाहिजे हे कितावत

हुकूम कुंपाणि इंग्रेज बाहादूर कलकटर पुणे (सही इंग्रजी) राबटसन

(अष्टकोणी लांबट शिक्का)

पो छ ११ रोंवल पौष मास (शु. १३) सन अशरीन मया तैन व अलफ शके १७४१

---

४ वतनें, वतनदार, करिने इ.—

९ शिर्के सरदेशमूख यांस अभयपत्र

(कै. द. वि. आपटे)

ले. २४ } श्री { श. १६४० कार्तिक व. १ / इ. १७१७ नोव्हेंबर ८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी नाम संवत्छरे कार्तीक बहुल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

˘ श्री ०	० श्री ˘
राजा शाहु न रपति हर्षनिधा न बाळाजी वि श्वनाथ प्र	श्री आई आदि पुरु प श्री राजा शाहु छत्रप ति स्वामि कृपानिधि त स्य श्रीनिवास परशु राम प्रतिनिधि
(तिकोनी शिक्का)	(अष्टकोनी शिक्का)

प्रतिपदा भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी याणिं राजश्री शामजी बलाल नामजाद व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रांत महिपतगड यासिं आज्ञा केली यैसी जे राजश्री पिलाजीराव बिन गणोजीराव व देवजीराव बिन पिलाजीरात सिर्के सरदेशमुख मामले राइरी यामधें देवजीराव सिर्के याणी किले साताराचे मुकामी स्वामी संनिध येऊन विनंति केली की रायेर मामला मावले ६ साह व कोकण माहल ६ साह येकूण बारा माहल याची सरदेशमुखी सिर्कीयाची पुरातन आपले वडिलीं वतनावरी मुतालिक दलपतराव पातेणे प्रभु ठेविले तेच बलाऊन सरदेशमुख म्हणो लागले भोगवटा त्यांचा होत चालिला त्यास कितेक मुदती होउनु गेली यावर चंजीस गणोजीराव सिर्के याणी कैलासवासी राजश्री स्वामी यापासीं वतनाचा प्रसंग केला त्या समयामधें अपाजी दलपतरावहि चंजीस आला त्यास करीना पुसोन इनसाफ करितां सिर्के सरदेशमुख खरे यैसें जाणोन कैलासवासी स्वामीनें मामले राहेन म्हणउनु अर्ज केला बराये मालुमाती खातिरेस आणुन तुम्हास कौल मराहमत केला असे कोणे बाबे शक अंदेश न करितां सुखे येउनु पा वारुणेमधे ज्या जागां येउनु राहाण्यास तुमचा मुदा असेली त्या जागा येउनु राहाणे दरबाब तुम्ही खातीरजमा आसो देणे येकनिस्टेने आम्हासीं असिलिया तुमचे बरे आहे कोणहि बाबे वहम न धरणे दरबाब साभाळु दरबाब कौल असे मोर्तब

तेरीख २५ सुद (अष्टकोनी)
मोहरम सुरु सुद*

---

१० पिसाळ घराण्यासंबंधीं कांहीं माहिती

(कै. द. वि. आपटे)

†पिसाळ घराण्यासंबंधीं आज रा. पटवर्धन यांचे संग्रहांतून आणलेलीं चार व रा. राजवाडे यांनीं तिसऱ्या खंडांत छापलेलीं नऊ (लेखांक ५६–६४) मिळून तेरा पत्रें प्रत्यक्ष माहिती देणारीं आहेत. त्यांपैकीं चार पत्रें (लेखांक ५७, ६०, ६१

* पा. स. ५।४१ † पा. स. ३१३९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व ६३) सोडलीं असतां बाकीचीं ९ पत्रें संभाजीच्या कारकीर्दीपासून शाहूच्या कारकीर्दीतील प्रारंभींच्या दोन तीन वर्षांत लिहिलेलीं आहेत. हा काल अत्यंत धामधुमीचा असून त्यासंबंधीची माहिती फारशी उपलब्ध नाहीं. तेव्हां या पत्रांत दिलेले कित्येक मुक्काम ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. शिवाय पिसाळ घराण्यांतील पुरुष अतिशय उलाढाली असल्यामुळें त्यांचा संबंध औरंगजेबाशीं व राजारामापासून शाहूपर्यंतच्या मराठे राजाशीं आला असल्यामुळें तत्कालीन लहान थोर पुरुषांची विचारसरणी, वतनाविषयींची आसक्ति, धर्मश्रद्धा, स्वामिभक्ति वगैरे अनेक बाबींचा विचार करण्यास या कालांतील पत्रें उपयोगी पडण्यासारखीं आहेत.

वांईचा देशमूख केशवजी पिसाळ मरण पावल्यावर त्याची बायको पिलाउइनें आपल्या दिराच्या मुलगा दत्ताजी यास दत्तक घेतलें. या दत्ताजीच्या कारकीर्दीत औरंगजेबाची स्वारी दक्षिणेंत आली व त्याच्या फौजदारानें वांई बळकाविली. एका फौजदारानें वाईस देशमूख नाहींत असें सांगून आपल्या नांवें देशमुखी बादशहाकडून करवून घेतली. तेव्हां दत्ताजीनें बादशहास भेटून खरा प्रकार सांगून आपली देशमुखी परत मिळविण्याचा योग आणला. इतक्यांत जुलफिकारखानानें रायगडास वेढा दिला. या वेळीं सूर्याजी पिसाळानें कांहीं मावळे नेऊन मोगलांना रायगड काबीज करण्याच्या कामीं मदत केली. त्यामुळें औरंगजेबापर्यंत सूर्याजीचें नांव पोंचलें. हा सूर्याजी ओझरड्याचा मोकदम असून पैशाच्या अफरातफरीबद्दल मराठी सरकारी अमलदारांच्या पेचांत सांपडला होता. त्याचा दत्ताजीच्या वतनाशीं कांहीं संबंध नव्हता. परंतु या वतनांत आपणांस निमी वाटणी मिळावी अशी त्याची इच्छा होती. यामुळें सूर्याजीनें एकवेळ मराठ्यांची बाजू तर एक वेळ मोंगलांची बाजू धरून लबाडी, साहस व शेवटीं धर्मांतर देखील करून आपला हेतु साधण्याचा प्रयत्न केला. पण अखेर त्याचा उपयोग झाला नाहीं.

हीं पत्रें वाचीत असतांना पुढील गोष्टी विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत असें मला वाटतें.

१ वृत्तीच्या बाबतींत औरंगजेबानें देखील पूर्वपरंपरेचा हक्क मान्य केला आहे. मुसलमानी फौजदारांना दूर करून पिसाळांना देशमुखी दिली.

२ सूर्याजीनें धर्मांतर केलें तरी मुसलमान म्हणून त्याला औरंगजेबानें जवळ केला नाहीं किंवा त्यास देशमुखी दिली नाहीं.

३ सूर्याजीनें धर्मांतर केल्याबद्दल कोणाही मराठ्यानें त्यास दोष दिला नाहीं. वृत्तीच्या हक्कास धर्मांतरानें बाध येत नाहीं अशी सर्वांची समजूत होती.

४ रायगड घेऊन संभाजीचीं बायकामुलें ताब्यांत घेण्यास मोगलास सूर्याजीनें मदत केली हें निर्विवाद असून या स्वामीद्रोहाबद्दल सूर्याजीस कोणी दोष दिला नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

५ या सूर्याजीवर राजारामाची विशेष मर्जी होती व त्याच्याशीं शरीरसंबंध देखील करण्याचा विचार होता हें आश्चर्यकारक आहे. हें कारस्थान नसेल तर संभाजी-बद्दल व त्याच्या बायकांपोरांबद्दल राजारामास फारसें प्रेम नसेल असें म्हणावें लागतें.

६ खुद्द शाहूनें देखील सूर्याजीस केव्हांहि दोष दिला नाहीं. यावरून सूर्याजीनें रायगडास जुलफिकारखानास दिलेली मदत येसूबाईला फारशी असंमत नव्हती असें म्हणावयाचें किंवा काय ?

७ राजाराम व धाकटा शिवाजी यांच्या कारकीर्दींत शकतपूर्वक वृत्तिपत्रें बरींच आहेत.

ले. २५ }

श्री {श. १६०३ चैत्र वद्य १३
{इ. १६८१ एप्रील ६

राजमुद्रा नकल

स्वस्ति श्री राज्याभिषक शके ७ दुर्मतिनाम संवछरे चैत्र वा त्रयोदसी [1]भोमवासर क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी दताजी केशवजी ना (मुा वा) ई यासि दिल्हे अभयपत्र ऐसी जे पिलाई

सिका प्रधान

कोम केशवजी नाईक याणी सिवाजी सुरो कारभारी व रामचंद्र दताजी मुतालीक हुजूर पाठविले त्याणी विनंति केली की केशवजी दताजीस देवआज्ञा जालिया उपरी पिलाईचा दीर गंगाजी हा त्याचा लेक दताजी ना अवघ्या बंदभावी मिळोन पिलाईच्या वोट्यात घातला पुत्र केला आहे तर साहेबी मेहेरबानगी करून देसगतीची मुकरार सनद दिल्ही पाहिजे पहिले पासून कैलासवासी स्वामीनी हे मिरास रक्षिली आणि चालविले असे तैसे च स्वामीनी चालविले पाहिजे म्हणोन विनंती केली व बदल मोकरीर दसगत [2]मसाग होन पा ५००० पाच हजार शेरणी कबूल केली व पेशजी केशवजी दताजी नाईक याला खंड बांधिला असे त्यापौ आला असेल तो वजा घेऊन बाकी राहिली असेल ती वसूल करावी म्हणोन कबूल केले म्हणोन त्यावरून तुम्हास पिलाईचे पुत्रपण देऊन देसगत पो मजकूर करार केला असे खातरजमा करून देसगत पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे हाकाची मोईन कैलासवासी स्वामीनी करून दिल्हीं असे त्याप्रो चालत असे तैसेच पेस्तर हवाला केले असे कमावसि [3]कस्त खाणे आणि स्वामीचे पायासी एकनिष्ट तत्पर असणे म्हणजे कुसूर व खलेल कांही होणार नाहीं शेरणी एकसाला होन ५००० पाच हजार मोकरार केले त्यापौ होन २००० दोन हजार पावले बाकी राहिले होन ३००० व पेशजी केशवजी दताजी यास खंड बांधिला आसे होन पाच हजार त्यापौ वसूल जाला असेल तो मजुरा देऊन बाकी राहिली असेल ती बाकी-

---

१ खरे जंत्रींत बुधवार आहे. २ मा = मजकूर ! ३ करून ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

च्या पैकीयाची व सदरहु तीन हजार होनाचा वसुलाच्या खिस्ती बांधून देऊन त्याप्रा॥ वसूल करून देणे सुखी असणे अभय असे लेखनालंकार मोर्तब

ले. २६ श्री {श. १६१७ ज्येष्ठ शु. ६ / इ. १६९५ मे ९}

राजाराम साहेब याचा रोखा

श्री नकल

स्वस्ति श्री राज्याभिषक शके २१ युवनाम संवछरे जेष्ठ शुध्ध शष्टी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणी पिलाई व दताजी केशवजी नाईक देशमूख प्रा॥ वाई यासि आज्ञा केली ऐसी जे सूर्याराउ पिसाळ देशमूख प्रा॥ मजकूर हे मोगलाईतून स्वामी संनिध येऊन आपल्या वतनाचे वर्तमान विदित केले तें मनास आणून याची निमें तकसीम देशमुखी वतन याचें यास

(सिका प्रधान) (सिका प्रतिनिधी)[१]

चालवावे निमें तकसीम वतन तुमचे तुम्हास चालवावे वडीलपण मानपान सिका नागर सूर्यारायाचें यास चालवावें ऐसा निर्वाह करून सुभ्यास सनद सादर केली व तुम्हासही आज्ञापत्र सादर केले ऐसे असतां स्वामीचे आज्ञे प्रा॥ सूर्याराउ पिसाळ याच्या देशमुखीचा अमल चालों देत नाही तुम्ही न्याहरखानासी व स्वामीकडील कारकुनासी अनुसंधान राखोन पा॥ मा॥रचे देशमुखीचें वतन अवघें च अनभवीत अहां सूर्याराउ पिसाळ यासी व याचे भाउबंदासी नसता कथला करितां म्हणून विदित जालें तरी पा॥ मा॥रचे देशमुखीचे वतन तुम्हापासून न्याहारखानानें घेतलें त्याउपरी सूर्याराउ पिसाळ याणी त्यासी शर्तीनसी वाद सांगोन सोडविलें व मोगलाईमध्ये मबलगा पैके खर्च करून दिवाणात सीरणी देऊन फर्मान करून घेंतले अलीकडे स्वामच्यिा पायापासीहि येकनिष्टा धरून संनिध येऊन सेवा करीत आहेत याकरितां स्वामीनें वतनाचा निर्वाह करून दिल्हा त्यास तुम्ही स्वामिची आज्ञा मान्य केली नाही सारें च वतन मूठमर्दीनें खांतां सूर्याराउ पिसाळ यांसी कथला करिता यावरून तुम्हास वतनासी समंध नाही ऐसे जाणून पूर्वी तुम्हास देशमुखीची निमे तकसीम दिल्ही होती ते अमानत केली असे अणी मा॥ सूर्याराउ पिसाळ यास च सारे देशमुखीचे वतन करार करून दिल्हे अहे तरी तुम्ही देशमुखीचें सारें वतन याचें स्वाधीन करणें तुम्हास दखलगिरी करावयास गरज नाही व काही कथलाही न करणे जरी तुम्हास हुजूर येऊन आपले वर्तमान विदित करून वतनाचा निर्वाह करून घेणे असेल तरी हुजूर येऊन आपले वर्तमान विदित करणे त्यावरून जो स्वामी निर्वाह करून द्यावयाचा तो देतील हाली पा॥ मजकुरी वतनावरी तुम्हास राहावयाची गरज नाही बिलाकुसूर देशमुखीचे वतन सूर्याराउ पिसाळ याचें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुमाला करणे इतकिया उपरि कथला केला म्हणजे तुमचा मुलाहिजा होणार नाही या कामाबदल जासूद दि॥ लचे सेवक राजमंडळ पाो असे यासी मसाला होन सिदोजी गोंदजी होन २० व येमांजी नरसोंजी होन रा॥ २५ येकूण होन पा॥ ४५ पंचेतालीस देविलें असें तरी तुम्ही खुद निसबती सदरहु पैके आदा करणें जाणिजे निदेश समक्ष (मुद्रा) मर्यादेयं विराजते

रुजु

बार सूद खुरु सूद बार

पाो छ ४ साहे सफर (भाद्रपद शु. ६ ता. ४।९।१६९५)

सदरहु असल पत्र नरसोंजी गंगाजी ना॥ पिसाळ देशमुख याजपासी आसेत

ले. २७   {श. १६२२ कार्तीक शु. ७
 इ. १७०० नोव्हें. ६}

श्री   असल बा॥ नकल

सिका राजमुद्रा

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके २७ विक्रम नाम संवछरे कार्तीक शु॥ ७ सौम्य-वासरे क्षेत्रिये कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपती यांणी राजश्री दताजी केशवजी नाईक पिसाल देशमूख परगणे वांई यास दिल्हे वृतिपत्र ऐसी जे तुंम्ही स्वामी-

सिका

सनिध विदित केले की प्रां मजकूर देशमुखीचे वतन पुरानन आपले वडीलवडिलापासून चालत आले आहे सिका नांगर मानपान वडीलपंण इनामती व इसाफती हक लाजीमा आपण आनभवीत आहे त्यास मधे सूर्याजी पिसाल याने चंजीच्या मुकामी राजश्री कैलासवासी श्वांमीसनिध जाऊन गैरवाका विदित केला की परंगणे मजकूरचे देशमुखीचे वतन निमे आपले आहे सिका नांगर मानपान वडील-पंण आपले आहे निंमे वतन दताजी केशवजी नाईक यांचे आहे त्याप्रंमाणे पत्रे दिल्ही पाहिजेत म्हणूंन त्यावरून राजश्री कैलासवासी स्वामीनी राजश्री रामचंद्र पंडित आमात्य व राजश्री शंकराजी पंडित सचीव यास पत्रे करून दिल्ही त्याप्रा॥ उभयेता सरकारकुनी आपली पत्रे करून दिल्ही त्या पत्रावरून च्यार पांच वर्षे पावेतो वतनास खलेल केले त्याउपरि राजश्री कैलासवासी स्वामींसी शरीर समंध करावा असे ठरून राजश्रि राजा कंर्ण† यांची बहींण आपल्या पुत्रास द्यावी औसा निश्चयें करून मागणी घातली ते गोष्टीवंरून राजश्री कैलासवासी स्वामीनी त्याचा अभिमान धरून आपले निमे वतन काढून सूर्याजी पिसाल यास दिल्हे यैसीयास सूर्याजी पिसाल

---

† छत्रपती राजारामाचा दासीपुत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यासि आपले वतनासी किमपि समंध नाही याच्या वडीलानी आगर यांने यापूर्वी औसा कथला केला नाही आवरंगजब पादशाहा तुलापुरास आले ते प्रसंगी आपण वतनाच्या फरमांना करिता लस्करास गेलो पातशाहापासून वतंन बाहाल करून घेतले कागदपत्र फरमान द्यावयांचा पादशाहाचा हुकूम जांला ते समई जुलपुकारखांन रायेगडची मसलत सुरु करून लस्करास आले त्याबाार सूर्याजी पिसालही आला येऊन आपली भेटी घेतली आणीं आपणांस बोलिला की आपण तुमचा आंहे तुमच्यां वतनाचे कागद पत्र फरमान करणे ते आपण करून घेतो तुम्ही वतंनावर जांणे म्हणोन विश्वास दाखविला त्यावरून आम्हीं +(आ(ई) दलशाही कदीम फरमांन आमच्या वडीलाचे नांवचे होते ते सूर्याजीचे स्वाधीन केले आणिं वतनावरी आलो त्यास सूर्याजीनी आंमचे फरमान होते ते ठेऊन क्रित्रीम इदलशाई सिक्याची डउले रुद्रो चिमणाजी कानगो विज्यापूरकर यास लांच रुा साडे बारासे देऊन त्या पासून घेतली आणि त्या डवलात निंमे देशमुखी आपली व निमे दताजी केशवजी नों याची ऐसे लेहोन ते फरमान मुछदीयास दाखऊन पादशाहाचे नावे फरमान करून घेतले आंणि जुलपुकारखांन चंजीस रवाना जाला त्या बाार चंजीप्रांते जाऊन राजश्रि कैलासवासी स्वामींचे दर्शन घेऊन सोइरीकीचा प्रसंग करून आपल्या निमे वतनाची पत्रे करून घेऊन कथला मांडिला आहे ऐसीयास स्वामी धर्मपरायेण प्रभु आहेत आपल्या वतनास कलंक लागला आहे तो दूर करून आपले वतन आपणास आजरामरामत केले पाा म्हणूंन विदित केले त्यावरून मनास आणिता राजश्री रामचंद्र पंडित आमात्य व शंकराजी पंडित सचिव यानी पूर्वी तुमच्या वतनाचे हमेशाई वतनदार व प्राां मजकूरचे वतंनदार आणून साक्ष मनास आणिली गोतमुखे तुंमचे वतन खरे सूर्याजी पिसाल लाइनी गला पडला हे खरे केले त्यानी ही श्वामीस विदित केले त्यावरून स्वामी तुम्हांवर कृपालु होऊन सूर्याजी पिसांल यास राजश्री कैलासवासी स्वांमीने निमे देशमुखीचे वतंन मानपान सिकानांगर वडीलपण करून दिल्हे होते ते दूर करून तुम्हास च बहाल करून दिल्हे आहे या वतनास तुमचे माथा शेरणी दिवाणात रुा ५००० पाच हजार रास ठेविले आहेत तरी तुम्ही प्राा मजकूरचे देशमुखीचे वतन आपले श्वाधीन करून घेऊन मांनपांन सिका नांगर वडीलपण तुंम्ही चालवीत जांणे या वतनास हक्क लाजीमा व इनामती गांव व जमीन व इसापती पहिल्यापासून चालिले आहे त्या प्राो तुम्ही आनभवीत जाणे आणि वतनावरी रांहोन आपले वौषपरंपरेने वतनाची सेवा करून सुखरूप रांहाणे तुमच्या वतनांस हिंदु होऊन इस्कील करील त्यास वाराणसी मंधे गोहत्या ब्रह्महत्या केल्याची पातके आसे मुसुलमान घे (हो ?)ऊन इस्कील करील त्यास

+ प्रथम 'आ' लिहून वर 'ईदल' असें केलें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मके मधे सोर मारिलंयाचे पातक आसे औसी पातके जाणून तुम्हास वतन सुरक्षित चालेल जाणिजे लेखन आंलकार राजमुद्रा

रुजु

तेरीख ५ जाफ़र सुा इहिदे व मया आलफ

बारसुद सुरु सुद बार

ले. २८ } {

(प्रारंभीचा कांहीं मजकूर गहाळ आहे.)

करून देणे त्यावरून वाईच्या काजीची व न्याहारखानाची कटकट जाली तेव्हा आपणास कृत्रिमसे दिसून आले मग आपण तेथून उपाये कडून पलोन पादशाही लस्करास तुळापूरचे मुकामास गेलो तमाम मोकदम व गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशकुलकर्णी व चाप शेटीया कसबे मजकूर येही लस्करास आणिले हजरती जवळ फिर्याद केली न्याहारखान तगैर केला वतन बाहाल करून घेतले सनद-असनाद घ्यावयाचा हुकूम जाला सनदा तयार व्हाव्या तो जुलफिकारखान रायगडची मसलत सुरु करून लस्करास आले त्याजपासी सूर्याजी पिसाळ बिरादर मोकदम मौजे वोझरडे हा पूर्वी गावी मोकदमी चालवीत असता रायगडीहून वजाईची वरात जाली वसूल द्यावयास मवसर नाहीं याकरितां गाव सोडून पलोन गेला तो खान मशारनिले जवळ राहिला तेथे रायगडचे मसलते मुळे मनसबा करून मावळ्याची सरदारी केली गडास मोरचे लाविले द्रामतीत पडोन खानास गड हस्तगत करून दिल्हा हे गोष्टीकरिता खान मारनिलेची कृपा त्यावरि विशेष जाली खान हजरतीचे दर्शनास आले तेव्हा सूर्याजीची स्तुत हजरतीपावेतों करून सीरनाहाणी करविली हा आस्करा लस्करात बहुत जाला त्यावरि आम्ही लस्करात होतो हे वर्तमान सूर्याजीस कळले सूर्याजी आमच्या भेटीस आला आपले येश सर्वस्वे सांगितले आणि आम्हास पुसो लागला की काय निमित्य आला त्यावरून आम्ही पूर्ववृत सांगितले त्यावरून आम्हास म्हणो लागला की बरे आवघे कार्य तुमचे होऊन चुकले आहे याउपरि सनद आसनाद होणे आहे त्यास आपली भीड विशेष आहे टका खर्च पडणे तोही आपले भिडेने थोडका पडेल तुम्ही बहुत श्रमी जाले आहा आपले स्वाधीन पूर्वील सनदा काय असतील त्या करणे तुमची सनद आसनाद जे तयार करणे ते करून देतो टका खर्च पडेल तो चौ वर्षात परगणियात उगऊन देणे म्हणून बहुत माया दाखविली विश्वास लाविला त्यास आम्हीही विच्यार केला की हा जातीचा पिसाळ आहे आणि वोझरडेकराची कदीम तकसीम देशमुखीत आटकाव आहेत त्याचे तक-सिमेतील हा भाउ आहे याचेही वाटणीस आठ गावापैकी निमे तडवले बुा समत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कोरेगाव येथील हाक येत आहे म्हणजे आठी गावां पौ सोळावें तकसिमेचा भाऊ आहे जरी इमाने वर्तेल आणि टका थोडका खर्च करील तरी हे कार्य याचे हवाले करावे आाण आपण परगणियात जावे ऐसा विचार करून सूर्याजीचे इमान घेतले आणि गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशपांडे व भुलाजी पाटील वाघोलकर व वाकोजी पाटील ढवले नांदवाहालकर व मानशेट शेटिया कसबे वांई हे त्यापासी ठेविले की जो टका खर्च करणे तो या पाचा जणाचे विद्यमाने करावा हे पाच जण आपणास सांगतील तो आपण टका चौवर्षात उगवून देऊ म्हणोन करार करून सूर्याजी जवळ आपले कदीम फर्मान होते ते नव्या सनदा तयार करायास दिल्हे आणि आम्ही खिजमत तलबखान फौजदार घेऊन परगणीयास कारभारास आलो मागून मानशेट शेटिया टक्क्याबदल आला त्याजबराबरी रुपये ३००० तीन हजार सनदेचे खर्चाबदल पाठविले तो सवेच सूर्याजीने आपला तह एकीकडे ठेऊन रुद्रो चिमणाजी कानगो सुभे विज्यापूर याजपासून आली इद्लशायाचे मोहरेनसी कोरी डवले खो करून घेतली त्यामधे केशवजी दताजी नाईक व फिरंगोजी सूर्याजी नाईक देशमूख म्हणून लिहून ते कृत्रिम फर्मान कचेरीत नेऊन रुजु केले आमचे कदीम फर्मान होते ते येकीकडे ठेविले आणि कृत्रिम सनदेप्रमाणें ताजी सनद पादशाही दो नावाची करून घेतली हे वर्तमान गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशपांडे याणी व मोकदमानी आपणास लेहून पाठविले की याने तो कृत्रिम वर्तणूक मांडिली आपण कटकट करावी. तरी तात्काल आमच्या नाशास प्रवर्तेल तुम्ही याची पैरवी करायाची ते करणे म्हणून त्यावरुन आपण फिरोन लस्करास जाउन आपली सनद दुरुस करावी तो वांईचे ठाणे पंत आमात्य व पंत सचींव व संताजी घोर्पडे व जाधवराउ याणी येऊन मारून काढिले खिजमत तलबखान दस्त केला त्याबराबर आपणही सापडलो सर्वस्वे हरास जाला या करिता लस्करात जावयाचा प्रसंग अगदी च राहिला उभयता पंतापासी वतनाचा कारभार करुन होतो त्यावर देशपांडे व मोकदम लस्करात होते ते, ही उठोन आमचे आम्हापासी आले त्याणी सूर्याजीचा करीना सांगितला तो आम्ही उभयता पंतास विदित केला आणि आपले वतनावर होतो त्याजवर जुलफिकारखान चंजीचे मसलतेस गेले त्याबराबरी सूर्याजी मांवलियाचा जमाव घेऊन गेला चंजीस गेलियावरि मोगलाकडून पारखा होऊन कैलासवासी राजश्री——काकासाहेबाकडे अनसुंधान लाऊन आपण वांईचा देशमुख आहे आपणापासी पादशाही सनद आहे त्याप्रमाणे माहाराज आपली सनद देतील तरी आपण येतो कितीक कार्यप्रयोजन करुन देतो म्हणून त्यावरून काकासाहेबी देशमुखीची पत्रे दिल्ही पादशाही सनदेत निमेचा दाखला नावामुळे होता त्यास सूर्याजी कितिक कार्यास अनकूल होऊन येतो ऐसे जाणून सारे च वतन मन्हामत करुन पत्रे दिल्ही ती घेतली आणि राजश्री काकासाहेबाची आज्ञा घेऊन या प्रांते आलां सरकारकुनास पत्रे दाखऊन त्याची पत्रे करुन घेऊन वतनास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खलेल केली मग आपण साताराचे मुकामी रामचंद्रपंत शंकराजीपंत यापासी जाऊन उभा राहिलो आणि आपले आद्यंत वर्तमान विदित केले त्याणी सूर्याजीस बोलाऊन आणिले आणि आपला व त्याचा करीना साबाजी घाटगे देशमुख को मलवडी व साबाजी गाढवे देशमुख सातारा व शाबाजी रामोजी बाहादुरजी सिंदे देशमुख ता कुडाल व पदाजी चिकणे देशमुख ता मेढे व सटवोजी जाधव मोकदम मौजे उंबरज प्रां कराड व गोत पा मार व गंगाजी शंकर गिरमाजी झुंगो देशपांडे व मोकदम गावगना व चापशेटी शेटिया वांईकर याचे विद्यमाने मनास आणितां गोतमुखे सूर्याजी खोटा जाला आपण खरा जालो तेंव्हा सूर्याजी वतनांस दूर करून आपलें वतन पूर्वापार प्रो आपले दुमाले केले आणि पत्रे करुन दिल्ही आपण वतन अनभउ लागलो तो राजश्रि काकासाहेब चंजी प्रांतीहून या प्रांतास आले तेव्हा सूर्याजी जाऊन सातारियाचे मुकामी उभा राहिला निमे वतनाची पत्रे करुन घेतली खटखट कराया लागला त्यास आपण राजश्रि पासी जावे तो राजश्रि स्वारीस गेले तिकडून येऊन सिंहगडास कैलासवास केला मग आपण विशालगडचे मुकामी राजश्रि शिवाजी राजे साहेबापासी जाऊन उभा राहिलों आपला करीना विदित केला तो मनास आणून उभयता पंतास विचारिले त्याणी गोतमुखे निवाडा जाला होता तो निवेदन केला आपले जुने कागद पत्र ही मनास आणिले मग +खोजेखानावरि करुन पा मारचे देशपांडे व मोकदम घेऊन बुधास गेलो तेंव्हा खान मारनिलेनी इजामशा मध्यस्त घालून आपली समजावसि करुन वाईस आणिले आणि कुल हाली मवाली जमा करून आम्हास व सूर्याजीस बोलाऊन सूर्याजीपासून यजितखत आपणास लेहून देविले की आपली पिढी दरपिढीची तकसीम वतनात जे असेल ती खाऊन आपण आसेन आपणास या उपरि तुमचे वतनासी समध नाही ऐसे लेहुन दिल्हे (खंड ३ ले. ५९) आणि आपले गावास गेला त्या उपरि थोराताचा आश्रय करुन मुलकात धामधूम मांडिली त्यावरि स्वामीचे आगमन या प्रांते जाले आपण स्वामीच्या पायापासी येऊन रुजु जालो सूर्याजी थोराता बराबरी होता आपण साताराच्या मुकामी राजश्री जयसिंग जाधवराउ याचे विद्यमाने वतनाचे पूर्वोतर वर्तमान विदित केले त्यावरून स्वामीनीं ही चर्चा मनास आणिता सूर्याजी म्हणजे लाइनी गला पडतो ऐसे जाले दुसरे दिवसी मनसुफी करुन आपला व सूर्याजीचा कथला तोडावा तो लस्करचा चलाव जाला स्वामीनी आपणास आज्ञा केली की तुम्ही समागमे येणे जेथे मुकाम होईल तेथे बरहाक निवाडा करून वतनाचा कलंक दूर करून तुमची स्थापना केली जाईल आज्ञे प्रो आपण चिकेवाडी पावेतो आलो मागती चिकेवाडीस स्वामीस अर्ज केला तेंव्हा स्वामीनी आज्ञा केली जे तूर्त पर्जन्यकाल आला लावणीसंचणीचा हंगाम आहे तुम्ही जिल्हेच्या खावंदाबराबरि

+ येथील कांहीं मजकूर, अंदाजे २०, २२ ओळी इतका, नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परगणियास जाणे पेस्तर हुजुर येणे तुमचा इनसाफ स्वामी करतील म्हणून त्यावरून आपण परगणियांत आलो मागें सूर्याजीने थोराताचे मालुमातीने गैरवाका अर्ज करुन इस्मालखान मका[†] याचे वेळेचा वाटणी जाविता होंता तो स्वामीसि विदित केला त्यावरून स्वामीनी निमे वतनाची पत्रे करून दिल्ही त्या लाजीमा मानपान वडीलपण सिका नांगर शेव धार इनामती गाव व इनाम जमीन बिघावणी व विश्वा जकात तुमचा सालाबाद चालिला आहे त्याप्रमाणे चालवावे ऐसे केले तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वतनाचा भोगवटा आनभऊन सुखरूप आसणे या वतनास तुमचे माता शेरणी रुपये ४००० च्यार हजार करार केले असेत याचा उसूल राजश्री नारो पंडित सचीव याकडे देणे आणि सुखरूप असणे याउपरि तुमच्या वतनासी अर्थाअर्थी सूर्याजीस समंध नाही पेस्तर सूर्याजी आला तरी वोझर्डेकराचे तकसिमेचे आठ गाव आहेत त्यापैकी जे तकसीम त्याचे वाटणीसि येईल ते भखून सुखरूप आसावे तुमच्या वतनात दाखल व्होवयास गरज नाही निंबालकर व थोरात याचे कर्ज सूर्याजीकडे आसेल तरी त्याणी सूर्याजीकडे समजोन घ्यावे तुम्हासी अथवा तुमच्या वतनासी किमपि कथला करावयास प्रयोजन नाही सूर्याजीने [१]इत्फदायपासून जे कागदपत्र घेतले असतील ते कुल रद असे तुमचे वतन तुमचे दुमाले केले असे अनभऊन सुखरूप असणे जाणिजे लेखनालंकार मुद्रा

रुजु

रा छ २१ मोहरम

बार सुरु सुद्द बार

सदरहु असल पत्र पिराजी यशवंतराव पिसाळ देशमुख याजपाखी असेत

---

५ देणग्या—

११ कऱ्हाडकर मुंज्येमणी यांस धर्मादाय

(कै. सर. खं. चिं. मेहेंदळे, प्रा. द. वा. पोतदार)

ले. २९ } श्रीशंकर { श. १६०६ फाल्गुन शु. ६ / इ. १६८५ मार्च १

श्रीसकलगुणमंडित अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रंगो विश्वनाथ देश्याधिकारी व लेखक प्रात कऱ्हाड वर्तमान व भावी गोसावी यासी— श्री पोष्य मोरेश्वर पंडियराउ नमस्कार राज्याभिसेक सके ११ चितामणि च रक्ताक्षीनाम संवछरे फालगुण शुध शष्टी रविवार वेदमुर्ती नरसीभट रण शरण

[†] येथीलहि १० ओळी मजकूर सामान्यतः गळला आहे. [१] आरंभापासून.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शेष्यभट मुज्येमणी वस्ती क(रा)न्हाड ब्राह्मण योग्य वैदिक देखोन धर्मादाय देविले तादूल केली कोठी मापे मण रुजु जोधले देणे मण ·॥· दाहा प्रतीवर्शी नूतन पत्राचा आक्षेप न करणे क्षेम असतील तोवरी देणे प्रती लिहून घेऊन मुष्य पत्र भट गोसावी याजवली देणे रा छ ५ माहे रलिलोवल† . सुा खमस समानीन आलफ पाा हुजूर सदरहु धर्मादाय पेस्तर सालापासून देत जाणे पाा हुजूर *हे विज्ञप्ति सुभं भवतु'

---

१२ शाहू महाराजांची नाटकशाळेला देणगी

(के. द. वि. आपटे)

ले. ३०

श. १६४६ ज्येष्ठ वद्य ६
इ. १७२४ जून १

श्री तालीक

स्वस्ति श्रीराज्याभिषक शके ५१ कोधनिाम सवछरे जेष्ट बहुल शेष्टी इंदुवासरे क्षेत्रिये कुलावतंस श्री राजा शाहु छेत्रपति स्वामी

सिका आहे सिका आहे याणी राजश्रि देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत पनाला यासी आज्ञा केली यैसी जे शामा नाईकीणं वालवेकर इजवर स्वामी कृपाळु होऊन कसबे वालवे प्राां माार येथे पड जमीन दुतर्फा आवल दूम सीम तीन प्रतीची जमीन चावर ·॥· निमे कुल बाब कुलकानु देखील हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार करून नूतन इनाम दिल्हा आहे तर तुम्ही सदरहु जमीन कसबें माार पैकी इचे दुमाला करून इनाम चालवणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न कर्णे या पत्राची प्रति लिहून घेऊन हे पत्र भोग-वटियांस परतोन देणें जाणिजे लेखनालंकार मोर्तब आहे

सुर सुर– साां साा

निवसि मंत्री सरकार+

बार सूद सुर सूद बार बार बार[२]

---

† रबिलोवल आहे तेथें रबिलाखर पाहिजे. १ पा. स. ६।४१

* हीं अक्षरें खुद्द मोरो पंडितांचीं.

+हें पत्र रा. दत्तोपंत पोतदार यांच्या संग्रहातलें आहे. २ पा. स. २।४१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१३ खटावकर पाठक यांस राजेबहादर यांची देणगी

(प्रा. द. वा. पोतदार)

ले. ३१ } श्री { श. १६८५ आश्विन शु. १
इ. १७६३ आक्टो. ७

॥ श्री ०

राजाराम छत्रप
ति कृपानिधि ना
रो शंकर पडित प्र
तिनिधि [अष्टकोनी शिक्का]

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री——— नारो पंडित प्रतिनिधि ताा मोकदमानी मौजे येडे काा वागी सुाा आर्बा सितैन मया आलफ वेदशास्त्रसंपन्न राजश्री बापु पाठक बिन बालकृष्ण पाठक उपनाम खटावकर गोत्र काश्यप सूत्र वाजिसनी वास्तव्य वडगाव काा निमसोड याणी हुजूर क्षेत्र पंढरपूरचे मुकामी श्रीसंनिध येऊन विदित केले की आपण कुटुंबवछल योगक्षेम चालला पाहिजे याजकरितां कृपाळु होऊन काही नूतन इनाम जमीन करून दिलीया योगक्षेम चालेल त्यावरून मनास आणिता हे सत्पात्र भले ब्राह्मण श्नानसंध्यादिक षटकर्मनिरत कुटुंबवछल याचे चालविलिया श्रेयस्कर जाणून मौजे मजकुरी नूतन इनाम पड जमीन बिघे ०१५ पंधरा बिघे आवल दूम सीम तीन प्रतीची जमीन कुलबाब कुलकानु दरोबस्त जलतरुकाष्टपाषाणनिधिनिक्षेपसहित देखील सरदेशमुखी व इनामतिजाई खेरीज हकदार करून इनाम दिल्ही आसे तरी सदरहू पंधरा बिघे जमीन मौजे मजकुरी चतुःसिमापूर्वक याचे दुमाला करून देऊन यास व याचे पुत्रपौत्रादिवौंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्शी नूतन पत्राचा अक्षेप न करणे या पत्राची प्रती लिहून घेऊन असल पत्र परतोन भोगवटियास भटजीपासी देणे जाणिजे छ २९ रविलोवल * निदेश समक्ष ॥ ०

लेखन
सीमा (अष्टकोनी शिका)

बार

जोडगिरीवर दोन छाप " लेखन सीमा " आहेत.

---

* अक्षर खाशांचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नारो शंकर पंडित प्रतिनिधी यांचा शिक्यांत उलेख आहे, तो अर्थात् [१] नारो शंकर राजेबहादर यांचा होय. या वेळीं नारो शंकर[१] यास प्रनिनिधीपदाचीं वस्त्रें मिळालीं होतीं, असा इतिहासांतरीं दाखला आहे.*

---

६ जमीन लावणी व आकारणी—

१४ जमीन लागण व जमाबंदी

(कै. स. मा. दिवेकर)

ह्या कौलनाम्यावरून जमिनीची सरकारकडून मोजणी कशी केली जात असे हें दिसून येतें. या वेळीं वसई भागाकडे जमिनीसंबंधानें पारिभाषिक शब्द कोण -कोणते येत हें हि नवीन च समजून येतात. याहून हि या पत्राचा विशेष हा कीं, बारा इसमांनीं मिळून बांध वगैरे घालून जमीन तयार केली त्यास 'बारभाई' असें नांव दिल्याचा यांत निर्देश आहे. बारभाई कारस्थानानंतर हा शब्द जारी झाला असावा.

ले. ३२ श्रीगजानन { श. १७३६ ज्येष्ठ वद्य २ / इ. १८१४ जून ५ रविवार }

(१) ~ श्री ० (२) श्रीमंत बा (३) जीराव पंत (४) प्रधान चरणी (५) तत्पर परशरा (६) म खंडेराव नी (७) रतर) (बदामी शिक्का ७ ओळी)

कौल स्वांरी राजश्री परशराम खंडेराव सुभेदार प्रांत वसई ता। बालकृष्ण वासुदेव दिवेकर सुा। खमस आशर मया तैन व अलफ तुमचेविसी जमीदार पा। मनोर याणी सुभा बाजीपुरा येऊन विदित केले की मौजे धुकटण या गावाचे दक्षणेस सेत + + + त्यापैकी काही सेते वाहोन गर्क होऊन टेप जाहाले त्यांजमुले जमीन बहुत दिवस वोसीक राहिली त्यापैकी विस्वनाथ नारायेण वगैरे भागी बारा आसामी मिलोन काही जमीन बाधून बाधण बाराभाई नाव ठेऊन केले होते परंतु ते च साली प्रज्यंन्यकालीं पुन्याचे नेटाने फुटोन गेले केला खर्च आगावर

---

१ प्रथम नारो शंकर राजेबहादूर हे. रघुनाथ बाजीराव पेशवे ह्यांचे पुत्र भास्कर-राव (जन्म श. १६८३ फा। व. ८ गुरुवार प्रतिनिधी इति० भाग. २ पृ. ३२८ वर श. १६७३ पडला आहे.) ह्यांचे नांवें प्रतिनिधीपद दिल्यानंतर ह्या भास्करराव रघुनाथ प्रतिनिधींचे मुतालीक झाले; पण हे भास्कर जन्मानंतर दोन तीन महिन्यांतच वारल्यामुळें नारोशंकर हे मुतालिकाचे कांहीं काल प्रतिनिधीच झाले. * पा. स. १९।४१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पडला नाव मात्र बाधण राहिले ऐशास ते सेत जमीन खराब पडित आहे आत वोहोल्या मोठ्या मोठ्या काटवण माल आहे ते जमीन सारखी करावयास व बंदिस्तीस खर्च फार लागेल याजकरिता कारकून पाठऊन खर्चाचा व जमिनीचा अजमास पाहून माफी ईस्ताव्याचा कौल दिल्हीयास सेते बांधून बाधण रबी सेत जमीन करुन लागवड करावयासी उमेदवार आहेत म्हणौन त्याजवरुन सखाराम सदासिव कारकून पाठऊन चौकसी करिता उतरेचा वोहोल गावाकडून दक्षणेस पूर्वेचे दोन वोहोल येकत्र होऊन या सेतातील बाधणाचे सेताचे जाग्यात च्यारी ऐकत्र होऊन पश्चमेस सूर्यनदीत पाणी जाते व पुन्याचे पाणी च्यार हात बसतें याजमुले सेते वोहोलगर्क होऊन जमीन खरावा जाहाली त्याचे देणे गावचे खोतास व कमाविस-दारास तीस पस्तीस च्यांलीस वर्षे निर्माण जाहाले नाही जमीन वाईट जालेली त्यास बाधाचे बंदिस्तीस व काटवण तोडावयासी खाचखलगे नीट करावयासी खर्च आजमासे ४५० रुा साडे च्यारशे पर्यंत लागतील तेंव्हा बंदिस्त होऊन बाधण रबीचे व सेत जमीन निघेल त्यास सेते सापडतील ते जमीन रकम ढेप गोंडे बतिसी मुडे

·॥· सेत सहश्रमुखे	·॥· सेत विठवावा
१। सेत सेलुट बुा	·॥· सेत सेलुट खुर्द
·॥· सेत जावा पेल	·॥· सेत पाळेरी
·॥१० पान सेत बुा	३॥ सेत घर ठण
·।१० सेत पान जोरे	·।· सेत विरीत नाहावियाची

९॥·

सदरहू पावणे दाहा मुडे ढेप यासी खर्च फार जमीन मेहनतीची कोर्दीस येत येत येईल हे जाणोन पुढील मामुरीवर नजर देऊन तुम्हांस बदल बंदिस्त माफी ईा पेस्तर साल सन सीत आशेर ताा सन आर्बैन पंचवीस साले माफी भरलियावर प्राो मजकूरचे सिाा प्राो मुड्याची पाहाणी करून लागवड जमिनीस दर मुडा बाबतीसुध्धा खेरीज मखता नख्त

रुपये

१॥ सन ईहिदे दीड रुपया	२ सन ईसने दोन रुपये
३ सन सलास तीन रुपये	४ सन आर्बा च्यार रुपये
५ सन खमंस आर्बैन भर दस्त	+
+	+ + + + +

भर दस्त दर मुडा + + रुपयेप्रमाणे उगवणी खुभा केली जाईल सेताचे कसलिकेस दिगर माहालची कुले आणाल ती कुले गावचें सिवरात घरे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व गुरास बेडी बाधोन राहातील त्यास घरदेणें व वेठबेगार माफ केली असे सुखरुप बदिस्त बाधोन लागवड करणे कौल असे जाणिजे छ १६ जाखर पां हुजूर

(मोर्तब सुद)

---

१५ छ. संभाजीनंतरची देशस्थिती

(श्री. वा. दा. मुंडले)

संभाजीचा वध झाल्यावर मोगलांनीं महाराष्ट्रांत पुन्हा कांहीं काळ धुमाकूळ माजविला. त्यावेळीं तेथील प्रजा त्रस्त होऊन परागंदा झाली व मुलूख बेचिराख पडला. पुढें चंदीच्या कारस्थानानंतर मराठे सत्ताधीश होऊन फिरून स्थीरस्थावर झालें त्यावेळीं त्यांनीं ठिकठिकाणच्या परागंदा झालेल्या लोकांस अभय देऊन कसे स्वस्थानीं आणिलें त्याची हकीकत या पत्रांतून दिली आहे. त्यावरून संभाजीकालीन धामधुमीची बरीच कल्पना होण्याजोगी असल्यामुळें. सदरहू पत्रें आज मंडळापुढें मांडलीं आहेत.

ले. ३३ } श्री { स. १६१३ आश्विन व. ६
{ इ. १६९१ आक्टो. ३

श्री रामचं
द्र चरण नीलकंठ
सोनदे
व शरण (लंब गोल शिक्का)

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य ताहा मोकदमानी सकराजी तुलाजी पाटील १ बावाजी आपाजी कुलकर्णी १ खलसेट सेटिगा १ भानजी विठल माहाजन १ बजमा बनाऊ १

कसबे सिराले सुबा मलकापूर सुहूर सन इसने तिसैन अलफ तुमचे बाबे सकराजी देशमुख व आणाजी हरी देशकुलकर्णी प्रा मजकूर येंही हुजूर येऊन विनंती केली कीं कसबा मजकूर गनिमाचे धामधुमकरितां कसबे मजकूर खराब पडला आहे तरि स्वामीनी कृपाळू होऊन इरतावियाने कौल व फाळा व घरटका एक साला माफ केलिया उमेद धरून मामुरी करून सुखरूप राहतील म्हणून त्यावरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मनास आणून मामुरीवरी नजर देऊन हे अभयपत्र मन्हामत केले असे तरी जी कुळे मोगलाईत गेली असतील त्यास कौल देऊन आणून कसबे मजकुरी कीर्दी मामुरी व उदीम व्यवसाय करवून सुखरूप राहणें जी नवी रयत येईल त्यास घरटका व मोहतर्फी कुळें जीं येतील त्यास एक साला घरटका व मोहतर्फ माफ केला असे वरकड रयत कीर्दी करील त्यास इस्तावियाने कौल परगणे मजकुरास सादर केला आहे त्याप्रमाणे वसूल देऊन सुखरूप कीर्दी करणे कोण्हेविसीं जलल जाजती होणार नाहीं येविसीं अभय असे जाणिजे छ १९ मोहरम उदमी व बाजेमोहतर्फी रयत जे नवी येईल त्यास एकसाला सारा व घरटका माफ केला असे दुसरे साली सुभाचे कारकून आकार वेवसाइ माफीक करितील व वणी घरटका आकार करतील त्याप्रा वसूल देऊन सुखरूप असणे जाणिजे छ २० मोहरम निदेश समक्ष (लेखनसीमा समुल्लसती)

ले. ३४ श्री { श. १६१९ आषाढ वा ११ / इ. १६९७ जुलै ४ }

(बदामी सिक्का)

अभयेपत्र समस्त राजकार्य धुरधर विश्वासनिधी राजमान्यं राजश्री रामचंद्र पंडित आमात्य ता वाणी बकाल व ढवणी कसबे सिराले प्रांत मजकूर सुा * समान तिसैन आलफ दादे कौलनामा ऐसा जे कसबे मजकुरास कौल दिल्हा आसे आणि खासखीखाले ठेविले आसे तरि तुम्ही गावावेरी येऊन उदीम वेवसाये करून सुखे आसणे कोणे गोस्टीचा अजार तोसीस लागणार नाहीं दरीबाब कौल आसे छ २४ जिल्हेज पाा हुजूर +

राजते
लेखना
वधि (बदामी सिक्का)

ले. ३५ श्री { श. १६२० फाल्गून वद्य १२ / इ. १६९९ मार्च १८ }

(गोल सिक्का)

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री परशरामपंत

---

* हें साल केव्हां संपलें हें सांगणारी खूण खरेजंत्रींत देणेची राहिली. एकाच पृष्ठावर ह्याच्यापुढील सालहि सुरू झालें आहे. म्हणून ही खुण सुहूरसनाचे बाबतींत आवश्यक आहे. हें साल जिल्काद ११ ला सुरू झालें व जिल्काद २४ ला संपलें. तरी अधिक ज्येष्ठ वद्य १२ पुढें नक्षत्राची खूण समजावी.—शं. ना. जोशी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रतिनिधी ता मोकदमानी व रयानी मौजे तुजारपूर पा सिराले सुा तिसा तिसैन अलफ कारणे अभयपत्र येसे जे तुमचा गाऊ मौजे मा खराब पडला होता ये बाबे देसकानी पा मजकूर आर्ज केला की गाऊ पडला आहे कौल जाहालिया लावणी करून म्हणऊनु बराये आर्ज खातिरेस आणऊनु

कौल मन्हामत केला असे तरि पडी जमिनीस दर बिघेस निमे रुपयाप्रमाणे जाजती तसवीस होणार नाही × दरीबाब कौल आसे छ २५ रमजान (गोल सिक्का)

ले. ३६ } श्री { श. १६२३ भाद्र. शु. ७ / इ. १७०१ आगष्ट २९

प्रतिपच्चद्र
लेखेव वर्धिष्णु र्वि
श्व वंदिता ॥ राभसु
नोः शिवस्येषा मुद्रा
भद्राय राजते (अष्टकोनी सिक्का)

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके २८ वृषनाम संवत्सरे भाद्रपद शुध सप्तमी भृगुवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती यांणी फिरगोजी व तुकोजी पाटील मौजे पुनवत पा सिराले यासि दिल्हें

श्री शि	श्री आई आ	अभयपत्र ऐसे जे तुम्ही कित्येक
वनर नृपति	दि पुरुष श्री राजा	हरएक उपसर्गा करिता परगंदा
हर्षनिदान मो	शिव छत्रपती स्वामी	होऊन गेले आहा स्वामीचे अभय
रेश्वर सुतनील	कृपानिधि ॥ तस्यप	जालियाने गावावरी येऊन राहावे
कंट प्रधाम	•रशुराम त्र्यंबक	वसाहात करावी ऐसी उमेद
(बदामी सिक्का)	प्रतिनिधि	धरली आहे म्हणोन मिराजी

(अष्टकोणी सिक्का) देशाई पा मार याणी हुजूर येऊन विनती केली त्यावरून हे अभयपत्र सादर केलें असे तरि तुम्हीं कोण्हेविशीं शक न धरितां मौजे मजकुरी येऊन वसाहत करणें दिवाणची बेरीज विलायतात उगवणी करून देंत जाणें जाजती उपसर्ग लागणार नाहीं अभय असे जाणिजे +लेखनालंकार

मर्या
देयंविरा
जते (षट्कोणी सिक्का)

+ अक्षर वेगळें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ३७ श्री { श. १६३८ आश्विन वद्य १ / इ. १७१६ सप्टं. २१ }

राजश्री तुळाजी निकम देशाख पा सिराळे साहेबाचे शेवेसी

राजीनामा कृष्णाजी बिन रखमाजी पाटील मौजे सिरगाऊ व कोडजी बिन सभाजी व सोनजी बिन सभाजी चौगला मौजे सिगाऊ पा सिराळे सुा सबा असर मया अलफ कारणे लेहून दिला राजीनामा ऐसां जे तुमचा इनाम धुतगवडखोल पैकी नजीक सारणखाले पटिया २ होत्या त्या सालाबांद आपल्या वडिलाचे कारकिर्दीस चालत होता त्यासि राजश्री छत्रपती सभाजी राजे त्यापासून मुलुक वैरान जाहला आपण मोगलाईत गेलां आप्रण नेणता होतो इनामाचा पेडोला ठावका नाही म्हणवून आपणे एक पटी १ दाखविली त्यासी रा तुळाजी देसांई खासा गावास येऊन इनामाचा पेडोला विचारिला आपणास ठावका होता तो दाखविला मग साहेबी चंवघे बलुते व चौगले बोलावून विचारले त्यासि त्यानी सांगितले की सालाबाद पटिया २ दोनी चालत होत्या [त्या]स आपणास ठावके आहे ऐसे त्यानी सांगितले त्यावरून आपणास लटिक वाद आला त्यावरून रा देशमूख इतराग जाहले चवघाचे मते खरे जाहले मग तुमचा इनाम पुरवीपा चालत हो(ता) तो तुमचा तुमचे हवाला आपले राजीपणं दिला त्यासि आपण खलेल व हरामजांगी करून तर वतनाखेरिज होऊन व दिवाणचे गुणेगार होऊन हा आपण राजीनामा लेहून दिला सही छ १५ माहे शौवाल (फारशी शिक्का)

गोही

सिवजी पाटी(ल) मौजे सोवते निा नांगर	सुभानजी पाटील मौजे परसद्ले (निा गांगर)
केदारजी पाटी(ल) वसी पाटील मौजे पेरीड (निा नांगर)	विठोजी पाटील मौजे कोकरूड (निा नांगर)
मुगोजी पाटील मौजे सावडे बु(द्)रुक (निा नांगर)	बाळोजी बिन कोळाजी पाटील मौजे सावडे खुर्द (निा नांगर)

---

७ वनचराई, चोरी व इतर राज्यकारभार—

१६ शक १६१० तील मुसुलमानी जंगलखातें

(श्री. पां. मा. चांदोरकर)

खालील अस्सल कागदावरून, असेर परगण्यांत, मुगल सरकारच्या राजवटींत, जंगलखाते (फॉरेस्ट) कसें असे व त्यांत रयतेचीं जनावरें चारावयाचीं असल्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सरकाराशीं करार कसा करावा लागे आणि त्याबद्दल वनचराई हल्लीपेक्षां किती कमी द्यावी लागत असे, वगैरे बाबींचा बोध होईल. कागद असा—

ले. ३८ } श्री { श. १६०९ आषाढ शु. १०
{ इ. १६८७ जुलै १०

१ मिया सेक जाहान

†वायदेरोखा अज[१] सरकार रफयेत व येकबल पनाह———फौजदार पा आसेर सुा* सन १०९७ कारने चो[२]सुदर[३]पा व मना चौं[४] व समस्त रयेत मौजे घोसीतूर पा मजकूर वायेदा लिहून दिल्हा यैसा जे रुपये २५ पंचवीस आपून कबूल केले असेत की साहेबाचे फौजदारीत आमची ढोरे म्हैसी वगैरे चरतात यास मना केले की तुम्ही आमचे जंगलात ढोरे न चारने यैसीयास आपुन रुपये मां कबूल केले आसेत आपनास थानेदाराचे नावे परवाना होये की याना जंगलात ढोरे चरू देने मो छ ९ माहे रमजान सन ३१ जलूस[५] [पाठी मागें]

जे वेलेस परवाना आम्हा नवल पावे ते वेलेस पैसे बिला[६] उजूर देऊन[७] उजूर न करून[७]

सारांश, असेर परगण्याचा फौजदार जो मिया शेख जहान, यानें सदर परगण्यांतील मौजे घोसीतूर येथील गांवचीं सर्व गुरेंढोरें सरकारी–फौजदारी गायरानांत पूर्वापार चरत असतां, त्यांना मनाई केली; पुढें घोसीतूरच्या पाटील चौधरी व समस्त रयतेनें, शेख जहान यास वायदेरोखा करून दिला कीं, सर्व रयतेचीं गुरें–ढोरें सरकारि जंगलांत सरकारानें चरूं द्यावी व ह्याबद्दल रयत वनचराई म्हणून (दर वर्षी) सरकारास पंचवीस रुपये देत जाईल ती घ्यावी. यावरून त्या वेळचें सरकार, सरकारी जंगल किती स्वस्त दरानें रयतेच्या हवालीं गुरचरणीस देत असे, याचा बोध होतो +

एवढें च नव्हे तर, त्या काळची प्रजा, करार करणारा व करून घेणारा यांचें परस्पर नातें.कराराच्या अटी पाळण्यांत समतोल कसें असतें हें ओळखून त्याप्रमाणें वागण्यांत, म्हणजे एकप्रकारें स्वतःच्या हक्काची जाणीव जाणण्यांत, कशी तरबेज असे याचा हि प्रत्यय याच कागदांत सांपडेल.

---

† पा. स. १७।४० १ आलीफ * फसली २ पाटील ३ चौधरी ४ औरंगझेबाचा. ५ बिन ६ हरकत ७ अनुस्वारार्थी आनुनासिक वैकल्यानें.
+ हलीं दर मुरा मागें वर्षास १०८ वनचराई आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रजा, सरकारास निक्षून सांगते कीं " जे वेळेस परवाना (गुरें, सरकारी जंगलांत चरूं देंण्याबद्दलचा) आम्हा जवळ पावे, ते वेळेस (वनचराईचे) पैसे बिला उजूर देऊन उजूर न करुन" म्हणजे परवान्याच्या आधीं पैसे-फी-भरणार नाहीं. असा करार, ज्याचें चरित्र परकीय इतिहासकारांनी जुलुमाच्या भडक रंगांत रंगविलें आहे, त्या औरंगझेबाच्या कारकीर्दीतील च आहे, हें येथें लक्ष्यांत ठेवावें.

मुगल रियासती मधें, सुभ्याच्या किंवा परगण्याच्या फौजदाराकडे असलेल्या अनेक लष्करी व मुलकीं कामा प्रमाणें सरकारी जंगलखातें हि होतें, हें या रोख्यावरुन दिसून येईल. फौजदार हाच त्या त्या भागाचा संरक्षक Conservator असे.

---

१७ शाहू महाराजांच्या दरबारांतील पत्र

(कै. द. वि. आपटे)

*हें पत्र सातारचे रा. जोशी यांच्या संग्रहांतलें आहे. हें बहुतकरून पुरंदऱ्यांनीं लिहिलें असावें. शाहू महाराजांच्या दरबारांतील रोजची हकीकत बाजीराव व चिमाजी आपा यांना कळविण्याचें काम पुरंदऱ्यांचें होतें. एका चोरीच्या प्रकरणाची हकीकत यांत आली आहे.

ले. ३९ श्री १/२ { श. १६६२ पूर्वी / इ. १७४०

छ २४ रजब

पुरवणी तीर्थरूप राजश्रि राउ तथा राजश्रि आपा स्वामीचे सेवेसी विनंति उपरि जिवाजी कडु पहिले राजश्रि स्वामीजवळ होता त्याचा भाउ बहिरजी कडु का पुणे येथे सुक्रवार पेठेत राहात होता यैशास विठोजी आत्फागीऱ्या म्हणोन स्वामीकडे आहे त्याचे बाइकोने याचे बाइकोची मूद चोरून नेली होती यामुले त्याचा याचा कजिया होऊन स्वामीपासी फिर्याद आला स्वामींनी मनास आणून आत्फागिरास ताकीद केली की याची मूद यास देणे त्यास आत्फागिऱ्या बहिरजीस मूद द + + + + + + + + कडे घेऊन आला + + + + + + + + तां पडिला सिपणीन मूद काही आपले आंगी. लागूं दिल्ही नाही मग. आत्फ्यागिऱ्यानें सुक्रवार पेठेचा सोमसेट + + व + काजी बेरड याचे स्वाधीन बहिरजीस केला आणि आत्फागिऱ्या निघोन गेला त्यावर से याने बेरडाने व जिवाजीपंताकडील

---

* पा. स. ९१४१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बिचु + + याणी मिलोन बहिरजीची वस्तभाव येणे प्रा गा ठून घेतली कडे मोहरा २० यका भगीरथ तेली याजकडे

+ रुा होते ते व्याजसमेत उगवून घेतले
परतु मुदल रुो २०

कुडक्या दोन मोहराच्या जोड्या येका
मोते चौकडां समेत सोने जोड्या २

लोखडी
२ पांसा
२ गोलव्या जोडे
४

स + + + नेले याखेरीज दाणा गला चिरगुल्या धरून + + + भावे देखील भरले घर जमून वाइकोची + + + + + सदरहु प्रो वर्तमान सांगितले राजश्री + + + फिर्यादीस उभा (अपूर्ण)

---

१८ फत्तेसिंग भोसल्याचें चित्राव-इनामाबद्दल पत्र

(कै. द. वि. आपटे)

* हें पत्र रा. पां. न. पटवर्धन यांच्या संग्रहांतलें आहे. वीरेश्वरभट व मोरेश्वरभट चित्राव यांना मौजे वेरवडे येथील जमीन कदीम इनाम होती. त्यांत जाधवगीर निमे वाटा मागत होता. पण कदीम इनामास निमे वाटा मागण्याचा अधिकार जाधवगिरास नाहीं असें भोसल्यानें ठरवून राजपत्राप्रमाणें चित्रावांचें इनाम चालविण्याविषयीं बजावलें आहे.

ले. ४० } श्री { श. १६५० पूर्वी / इ. १७२८

तपोनिधी जाधवगीर गोसांवी यांसि

श्रीां फतेसिग भोसले नमो नारायेण उपरी तुम्हांस मौजे वेरवडे प्रां पुणें हा गाव ईनाम दिल्हा आहे आगोधर वेदशास्त्रसंपन्न वीरेश्वरभट व मोरेस्वरभट यास इनाम मौजे मजकुरी कदीम जमीन आहे त्यास तुम्हीं इनामाचे जमीनीचा निमे वाटा मागता तरी कदीम इनामास तुम्हीं वाटा मागावा यैसें नांही त्या ब्राह्मणांच्या

---

* पा. स. ११।४१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेतास तगादा न लावणें राजपत्राप्रमाणे इनाम चालेल तुम्ही कथला न करणे जाणिजे छ २६ मोहरम पाा हुजुर लेखना

वधिमुद्रा

---

१९ माधवराव बल्लाळ पेशवे यांचीं दमाजी व गोविंदराव गायकवाड यांस पत्रें

(कै. कृ. वि. आचार्य कालगावकर)

†हीं पत्रें वाण्याच्या दुकानीं मिळालीं. त्यानें, असले सहीशिक्याचे पुष्कळ कागद मजकडे आले; परंतु मीं ते पुड्या बांधण्याकडे खर्चून टाकले. सांप्रत रद्दीस तेजी असल्यामुळें बायाबापड्या आपल्या घरचे जुने कागद आणून विकतात वगैरे हकीकत सांगितली. न जाणों अशा प्रकारें किती कागदांचा नाश झाला असेल ! असो. त्याच्या जवळ असलेल्या शिल्लक रद्दींतून घेण्यासारखे दहावसि कागद घेऊन त्याच्या बदला वर्तमानपत्राचे कांहीं अंक त्यास दिले. हे कागद कोठून त्याजकडे आले तें त्यास सांगतां आलें नाहीं. असो. सदरहु पत्रें असलच आहेत. तीन पत्रांत असलेल्या शिक्यांत दोन प्रकारचे शिक्के आहेत. माधवराव यांचे सावकार भिडे व वीरकर असल्याचें सदर पत्रांवरून दिसतें.

ले. ४१ } श्री { श. १६८५ माघ व. ३ / इ. १७६४ फेब्रु. २०

(१) राजश्री दमाजी गाईकवाड सेना खासखेल समसेर बहादर गोसांवी यांसि

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य (कोरीजागा टाकून) श्वो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणौन स्वकीयें कुशल लिहीत जाणें विशेष बदल देणे ताा धोंडो विस्वनाथ यांस ब्यादे म्हसके दिमत थटी यांस नेवदाचे वाटणीबदल रुाये ५९०० पाच हजार नऊसें रुाये देविले असेत तरि तुम्हाकडे साल मजकूरचा यैवज येणे त्यापैकीं क्षेप निक्षेप पावते करून पावलियाचे कबज घेणे* जाणिजे छ १७ साबान सुाा आर्बा शीतैन मया व अलफ *बहुत काय लिहिणे हे विनंती

लेखन

सीमा

---

† पा. स. १९।४०

* अक्षर निरनिराळें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कागद उलटून पाठीवर शिक्का आहे तो असा)

श्री राजाराम नरपति हर्ष नीधान माधव राव बल्लाळ प्रधान

(त्रिवलयी कोयरी आकार बदामी सिक्का)

शिक्याच्या खालीं लांब अंतरावर " बार " अशीं अक्षरें आहेत.

बार

ले. ४२ } श्री { श. १६८८ अ. चैत्र शु. ४ / इ. १७६६ मार्च १४

(२) राजश्री दमाजी गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादर गोसांवी यांसि

छ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें विशेष तुम्हांकडे पेस्तर सालचा अैवज येणे त्यापैकीं बदल देणे रद कर्ज गुा वाघोजी बगाडे यांसी रुाये २५००० पंचवीस हजार रुाये देविले असेत पेस्तर सालचे रुपये पावते करून पावलियाचें कबज घेणें जाणिजे छ २ सवाल सुा सीत सीतैन मयां व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती लेखन

सिमा .

श्री ०
राजाराम नर प
ती हर्ष निधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान उलटा 'न' (त्रिवलयी लांबट गोल सिक्का)

बार

ले. ४३ } श्री { श. १६८८ वैशाख वद्य १ / इ. १७६६ में २५

(३) राजश्री दमाजी गायकवाड सेनाखासखेल समसेर बाहादर गोसांवी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य--स्नों माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष तुम्हाकडे सरकारचा अैव्रज सालमजकूरचा येणे त्यापैकीं देणे रद कर्ज गुा नारो बापूजी भिडे यास रुाये ३०००० तीस हजार देविले असेत पावते करून पावलियाचे कबज घेणे जाणिजे छ १५ जिल्हेज सुा सीत सीतैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

लेखन

सिमा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री ०.
राजाराम नर प
ती हर्ष निधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान (त्रिवलयी गोल, सिक्का)
(उलटा न) बार

ले. ४४ } श्री {श. १६९१ चैत्र वद्य ३०
{इ. १७६९ एप्रिल ७

(४) राजश्री नारो बाबाजी व नारो आपाजी गो यांसि

सुा तिसा सितैन मया व अलफ राजश्री गोविंदराव गाइकवाड सेनाखासखेल समसेर बहादर याजकडील यैवजी तुम्हाकडे हवाला येणे त्या यैवजी वैशाख अखेरचे हापत्यापैकीं बाा देणे रदकर्ज गुाा सिदापा सेट विरकर यास पेशजी गाईकवाडावर वरात जाहली आहे त्यापैकीं बाकी राहिले ते रुपये ७७५५ सात हजार सातसे पंचावन रुा देविले असेत तरी पावते करून कबज घेणे जाणिजे छ २८ जिल्हेज

(पाठीवर)

बार

लिखित सिदापा सेट वीरकर सदरहू वरातेप्रमाणे रुा भरून पावलो विाा राजश्री गोपाळ नाईक ताबेकर याजकडून भरून पावलो,

---

७ धार्मिक—

२० श्री त्र्यंबकेश्वर संस्थानचे वर्तुणकीची माहिती

(कै. रा. ब. का. ना. साने)

श्री त्र्यंबकेश्वरीं व कुशावर्ततीर्थी लोकांनीं कसें वर्तावें याविषयी.

ले. ४५ } श्री { श. १६८० चैत्र व. ३
{ इ. १७५८ एप्रिल २६

(शिक्का
इनाम कमिशनर
गोल शिक्का)

श्री
राजा शाहु नर पति
हर्ष निधान बाळाजी
बाजीराव प्रधान (गोल शिक्का)

---

† पा. स. ११३८

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यादी श्री त्र्यंबकेश्वरीं व कुशावर्तीं सर्व जनांनीं [कसें] वर्तावें त्याचा करार बितपशील कलमें शके १६८० बहुधान्य संवत्छरे चैत्र वद्य ३ सुा समान खमसैन मया व अलफ

श्रीत्र्यंबकेश्वर

१ ब्राह्मणांनीं झगा मुंडासें पोशाकासमेत वोवल्यांनीं देवाजवळ जाऊं नये. दरवाज्याबाहिरून नमस्कार करावा. आंत जाणें तर पाय धुवोन जावें. परंतु देवास प्रत्यक्ष सिवों नये. स्नान करून देवास स्पर्श करावा. ब्राह्मणांनीं मात्र आंत जावें. अन्यत्र कोणी आंत जाऊं नये कलम १

१ जटील गोसावी यांणीं आंत जाऊं नये तसेच जंगम बैरागी व इतर कोणी ब्राह्मणांखेरीज आंत न जावें. कलम १

१ शूद्र लोकांनीं परिछिन देवालयांत जाऊं नये. दरवाज्यांतूनच दर्शन घ्यावें कलम १

१ दरवाज्याबाहेरून कोणी सुपारी पैसा हरजिनस उदकादिकरून देवावर टाकितात ते सहसा टाकूं नये. दरवाज्याचे पाइरीवर ठेवीत जावे कलम १

१ तुंगार पुजारी यांणीं येकेरी धोत्र नेसूं नये. दुपद्री नेसत जावें. स्नान करून विभूत लावून, निर्मळ धोत्रें दुहेरी नेसून देवळाजवळ राहात जावे पोरेंबाळें बाइको अस्नात पुजारा यांची आंत गेलीया पारपत्य करावें. येणेप्रो कलम १

५——येकूण कलमे पाच रास

श्री कुशावर्ताचीं कलमें.

१ मुसलमान, म्हार, चांभार, बेरड, मांग यांणीं तीर्थांत जाऊं नये याप्रमाणें चालावे. कलम (या खो अन्यत्र जात तीर्थांत जावयास अयुक्त असेल त्यांणीं तीर्थांत जाऊं नये) *

१ तीर्थावर क्षौरें करितात ते केश तेथेंच टाकितात, ते टाकू नये. न्हाव्यापासूनच केश दूर नेऊन टाकवावे. तीर्थावर केश आढळलीयावर न्हाव्याचें पारिपत्य करावें— कलम १

१ त्रिसंधेश्वर व गौतमाले हनुमंत अहिल्या तीर्थ यामध्यें देवाच्या असपास निर्मळ असावें. हगूं नये. याचा बंदोबस्त नारो भगवंत यांणीं करावा. झाडून निर्मळ राखावें. कलम १

१ तीर्थांत कोणी बुड्या मारून आंतील कांहीं काढूं नये. काढील त्याचे पारपत्य करावे. पाणी उपसून आंत जें निघेल ते सरकारांत जमा करून ठेवावें.... कलम १

* कौंसांतील मजकूर बारीक अक्षरांनीं लिहिलेला आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ कुशावर्तापासून हनुमानपयत गंगेंत कोणीं केर पत्रावळी उकीरडा टाकूं नये. गंगा स्वच्छ असावी. ज्याच घराजवळ गंगेंत केर निघेल त्याच पारिपत्य करावें... कलम १

——कलमें ५ पाचरास

येणेंप्रमाणें दाहा कलमे पैकीं श्रीत्र्यंबकेश्वरचीं पांच व श्री कुशावर्ताचीं पांच करार करून याचे खबरदारीस हुजुरून अपाजी अनंत कारकून व दाहा माणूस हशमाकडील पाठविले असे त्यास सदरहू लिहिल्याप्रमाणे सर्वांनीं वर्तावें व सरकारेच कारकुनानें व * नारो दामोदर यांणीं रखवाली बंदोबस्त राखावा. जाणीजे छ २८ शाबान आज्ञा प्रमाण लेखन

सीमा

ले. ४६ } श्री { श. १६८२ श्रावण वद्य १०
{ इ. १७६० सप्टें. ४

(सिक्का इनाम कमिशनर) त्र्यंबक

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो दामोदर* गोसांवी यांसि.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा इहिदे सितैन मया व अलफ श्री [त्र्यंबकेश्वर] येथें देवाचे नित्य पुजेस नेहमी ब्राह्मण किती असामी आहेत कोठील ब्राह्मण पुजा कोणत्या प्रकारें करितात, देवाचे नैवेद्याची सोय कसकसी केली आहे, अचार्य ब्राह्मण शागीर्द व खटपटे किती जण आहेत ब्राह्मणास राहावयाची जागा चांगली आहे किंवा नाहीं तेथील नेमणूकेचा ऐवज कोण्हीकडून पावतो सालीना नेमणूक काय आहे हें तपसीलवार लेहून पाठविणें तेथें ब्राह्मण आहेत त्यांचे मुबादला येथून ब्राह्मण पाठवावयाचे आहेत तरी तेथें देवाची पूजा उर्जा कसी चालते तें सत्वर लेहून पाठविणें जाणीजे छ २३ मोहरम आज्ञाप्रमाण व मुख्य देवळाचे असपास शंभर शंभर हात जमिनींत काय काय आहे चौतर्फा नकशा पाठवणें मुख्य देपळापासून गंगेचा ओघ किती हात आहे तेंही मोजून लेहून सविस्तर पाठवणें.

छ मजकूर लेखन

सीमा

---

* नारो दामोदर जोगळेकर. यांनीं त्रिंबक किल्ला काबीज करण्यांत मोठी मदत केली म्हणून पेशव्यांनीं श्री त्र्यंबकेश्वर संस्थानाचा कारभार त्यांस सांगितला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ४७ श्री
शं. १७०३ पौष वद्य ७
इ. १७८२ जाने. ६

वेदशास्त्रसंपन्न राजश्री हरभट पिंगळे स्वामींचे सेवेसी

विद्यार्थी माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें विशेष श्रीत्र्यंबकेश्वर येथील काम काज तुम्हांकडे होतें तें दूर करून रा। आबाजी महादेव मोडक यांजकडे साल मजकुरापासून सांगितलें असे तरि हे कामकाज करतील श्रीकडील शिल्लक नक्त व दागिने व कापड व गल्ला वगैरे जिनस असेल त्याची मोजदाद यांजकडे करून देऊन कबज घेणे व तुमचे कारकिर्दी-पासून रुजुवात मशारनिलेस करावयास सांगितली असे तरि रूजुवाती संमंधी कागदपत्र मागतील ते देऊन रुजुवात कची करून देणे जाणिजे छ २१ मोहरम सु॥ इसने समानीन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती

श्री
राजाराम नरपती
हर्ष निधान
माधवराव नारायण
प्रधान
(गोल सिक्का)

ले. ४८ श्री
श. १७२३ अधिक ज्येष्ठ शु. १२
इ. १८०१ मे २५

(सीक्का इनामकमिशनर). (गोल सिक्का)

राजमान्य राजश्री विसाजी त्र्यंबक* गोसावी यांसि

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार. सु॥ इहिदे मयातैन व अलफ संस्थान श्री त्रिंबकेश्वर येथील कामकाज आबाजी माहादेव यांजकडे होतें दूर करून साल मारीं तुम्हांकडे सांगितले तरी इमानें इतबारें वर्तोन संस्थानाचें कामकाज करीत जाणे संस्थानाकडील सिलकेची मोजदाद त्याजपासून करून घेणें व आबाजी माहादेव यास नेमणूक संस्थानाकडील रुपये ४०० च्यारशे पावत होते त्याप्रो तुम्ही घेऊन हिसेबी खर्च लिहीत जाणे जाणिजे छ ११ मोहरम[1] आज्ञा प्रमाण

लेखन
सीमा

---

* विसाजी त्रिंबक जोगळेकर, नारो दामोदरच्या चुलत भावाचा मुलगा, मृ. १८२४.

१. मोहरम ११ ही तारीख ह्या सुहुर सालांत आरंभीं व शेवटीं अशी दोनदां येते. शेवटची धरून ही मिती व तारीख दिली आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ४९ } श्री { श. १७२३ ज्येष्ठ व. ११
{ इ. १८०१ जुलै ६

(सीक्का इनाम कमीशनर) (गोल सिक्का)

राजमान्य राजश्री विसाजी त्र्यंबक+ गोा सि

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुाा इसने मयातैन व अलफ संस्थान श्री त्रिंबकेश्वर येथील कामकाज सालमजकुरीं तुम्हांकडे सांगितले आहे त्यास संस्थानाकडील सालाबादी नेमणुकेचा ऐवज रुाा

११५०० प्राो नासीकपैकीं

७३० तालुके त्रिंबकपैकीं श्री ब्रह्मगिरीचे प्रदक्षणेस दोन ब्राह्मण आहेत त्यास दररोज दर असामीस रुपया १ येक प्राो रुपये

१२२३०

ऐकूण बारा हजार दोनसे तीस रुपये साल मजकुरापासून व मागील बाकी नेमणुकेपैकीं राहिली असेल ती तुम्हाकडे यावयाविसी हरदु माहालचे मामलेदार यांस अलाहिदा सनदा सादर करून हें सनद तुम्हांस सादर केली असे सरि सदरहूप्रमाणे ऐवज घेणें आणि संस्थानाकडील नेमणुके पैकीं देणें कोणाचें राहिलें असेल तें हुजूर समजाऊन आज्ञा होईल त्याप्रमाणे करणें जाणिजे छ २४ सफर आज्ञाप्रमाण लेखन सीमा

ले. ५० } श्री { श. १७८२ माघ शु. ९
{ इ. १८६१ फेब्रु. १९

(इनाम कमिशन शिक्का)

पोलिटिक्याल व देवस्थान वर्षासन वगैरे याजबदल सन १२६० फसलीसि नेमणुकी खर्च पडल्याबाा यादी

मेहेरबान कलेक्टरसाहेब बहादूर जिाा नगर यांजकडून नंबर ४०६ तारीख २६ अगटंबर सन १८५२ चे यादीसोबत आल्यात देवस्थान सदरांत नासीक तालुक्याचे पोटीं श्रीत्रिंबकेश्वर संस्थान त्रिंबक दरमहा ९५९८८ प्रमाणे दाखल ११५१४ रुप्ये असोन ते कोणास मिळतात ते लिहिण्याविषयीं महालकरी पेटा त्र्यंबक तालुके नासीक यांस नंबर १२३ तारीख ११ जानेवारी सन १८६० चा हुकूम गेल्या लगत वहिवाटदार नारायण कासिनाथ जोगळेकर यांस पावत असल्याचें महालकरी रुजू मामलेदार यांजकडून लिहून गेल्यावरून इसम मजकूर यांस कैफियत देण्याकरितां कागदपत्रसह हजर होणेविषयीं महालकरी यांस लिहून आलेवरून कैफियत तारीख १९ सपटंबर सन १८६० इसवी लिहून दिल्ही त्यांतील सारांश खाली लिहिलेप्रमाणे—

[फक्त रकमेपुरती माहिती पाठविली आहे.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

माजी अमलांत सदरहू नेमणुकीचा ऐवज तुरू व पटका या नाण्यांचा मिळत होता व हाल अमलांतही कंपणी सिक्का चालू होईपर्यंत त्याचप्रमाणे मिळत येऊन पुढें कंपणी रुपये मिळों लागले तुरयाची व पटक्या चलण बराबर होती कंपणी रुपये मिळों लागले ते चार रुपये शेंकडा बटा वजा होऊन मिळूं लागले

सदरहू नेमणूक तेव्हा आजमासे सत्रा अठरा हजार मिळोन त्याप्रमाणें कांहीं वर्षे मिळकत येऊन पुढें माधवराव नारायण यांचे कारकीर्दीत अजमासे तेरा चौदा हजार मिळूं लागले. ते बाजीराव रघुनाथ यांचे कारकीर्दीत कांहीं वर्षे मिळोन पुढे त्यांचेच कारकीर्दीत १२२३० बारा हजार दोनशे तीस रुपये मिळों लागले. ते पेशवाई अखेरपर्यंत सदरी लिहिले नाण्याचे रुपये मिळोन पुढें हाल अमलांत सन १२२८ फसली अखेर सदरहू प्रोंच रुपये १२२३० मिळोन सन १२२९ फसली सालीं मे. पाटंजर साहेब यांणीं सदरहू पैकीं २३० रुपये कमी करून बाकी बारा हजार रुपये कायम केले त्याप्रमाणें कंपणी नाणें सुरू होईपर्यंत दरसाल मिळोन कंपणी सुरू झालेपासून च्यार रुपये शेकडाप्रमाणें बट्टा व ग्याझीट म्हणोन दर हजारीं ४८ प्रमाणें वजा होऊन ११५१४ रुपये कंपणी आजपर्यंत मिळत आहे. कोणते सालीं नेमणुकेंत कमी केले ते साल माहीत नाहीं.

सदरहू नेमणूक मिळाले दिवसापासोन प्रथम कांहीं वर्षे हुजूर म्हणजे मुकाम पुणें येथें मिळत होती इतकें ऐकून माहीत आहे. पुढें कांहीं वर्षांनीं नासीक व त्रिंबक ह्या दोन तालुक्याचे कामाविसदार यांजकडून व कांहीं वर्षे नासीक व दिंडोरी या महालांपैकीं सोळा गाव लावून दिले वरून गांवचा वसूल करून खर्च होत होता कोणते महालांपैकीं किती गांव कोणते सालापासोन कोणते सालापर्यंत ते माहीत नाहीं. पेशवे अखेरचे शेवटीं कांहीं वर्षे गांव सरकारांत घेऊन पुढें पोत्यांतून पैसा पावूं लागला. तो कोठून व ते साल कोणतें मुकरर माहीत नाहीं. अजमासें नासीक त्रिंबक ह्याच तालुक्यांतून पावत असेल असें वाटतें. हाल अमल झालेवर प्रथम खानदेश जिल्ह्यांतून सुमारें एक वर्ष नंतर कांहीं वर्षे नगर जिल्ह्याचे हुजुर खजिन्यांतून पुढें नासिक तालुक्याचे तिजोरींतून आजपर्यंत पावत आहे कैफीयत पुरी ता. २२ सपटंबर १८६० कैफियत दिल्यानंतर आलेले उत्तर यांतील पुरवणी जावक बारानिसी बुक नंबर ११ विद्यमान ग्रीफीत साहेब बहादूर इनाम कमिशनर उत्तर भाग यांत नंबर ३८७ तारीख १९ फेब्रुआरी सन १८६१ इसवीचे पत्र नारायणराव कासिनाथ जोगळेकर यांचे नावें आलेलें

श्रीत्र्यंबकेश्वर देवाचे नेमणुकीबद्दल	नगर जिल्ह्याबद्दल १२६० फसलीचे हिशेबावरून देवस्थान वर्षासन वगैरे बद्दल यादी आलेली आहे त्यांत

देवस्थान सदरांत नासीक तालुक्याचे पोटीं श्री त्रिंबकेश्वर संस्थान त्रिंबक दरमहा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

९५९८८ प्रो बारमाही रुपये ११५१४ दाखल आहेत. सदरहू नेमणूक श्रीत्रिंबकेश्वर महादेव कसबे त्रिंबक येथील देवाचे पुजा नैवेद्य नंदादीप व उत्छाह्य वगैरे खर्चाकरितां नासीक तालुक्याचे तिजोरींतून आम्हांस पावतात म्हणून तुम्ही कैफियत लिहून दिल्यावरून सर्व चौकसी होऊन इंग्रजींत रिपोर्ट होता. हल्ली मेहेरबान् दुमाल्याचे रिव्हिन्यु कमिशनर साहेब बहादूर यांचा ठराव नंबर ४३२ तारीख १ फेब्रुवारी सन १८६१ चा इकडे तारीख २ मिनहू रोजीं येऊन दाखल झाल्यावरून तुम्हास कळविणेंत येतें कीं, सदरहू देवास निरंतर नेमणूक चालण्याविषयीं पेशवे सरकारचे सनदपत्र हजर केले नसोन भोगवट्याविषयीं माजी अमलचे हिसेब पाहातां माजी अमल अखेर सुमारे ६० वर्षे पर्यंत सदरहू देवास नेमणूक पावत येण्याचा दाखला मिळतो. त्यांत सन १८०५ तागाइत सन १८१३ पावतों हल्ली जी नेमणूक पावते त्यापेक्षां कमी पावत असून सन १८१३ सालीं पुन्हा रुपये १२००० बारा हजार सरकार तिजोरींतून पावूं लागले. कारण सन १८०५ तागाईत सन १८१३ सालापर्यंत सदरहू नेमणुकेस नेमून दिलेले गांवांकडून कमी रुपये पावत होते सबब सरकार तिजोरींतून रुपये १२००० पावूं लागले या कारणावरून सालीना चांदवड रुपये बारा हजार म्हणजे त्याचा बट्टा वजा जातां कंपणी रुपये ११४६२८८ अक्रा हजार चारसें बासष्ट रुपये आठ आणे नासीक नजीक त्रिंबक येथील श्रीत्रिंबकेश्वर महादेव याचे नांवानें निरंतर म्हणोन दाखल केले जाऊन अशा प्रकारचे देहेनग्याचे वहिवाटीबाबद जे नियम चालू असतील त्याप्रमाणे याचा आदा केला जाईल म्हणोन लिहून आलें तो मार आपल्यास कळवयाकरितां लिहिला आहे कळावे.

त्यानंतर सन १८७५ तारीख १७ आगष्ट स्टेटसेक्रेटरी यांची सनद.

माजी राज्याचे वेळेपासोन सालीना नक्त नेमणूक त्रिंबकेश्वर महादेव कसबे त्रिंबक तालुके नासीक जिल्हा नासिक या देवस्थानाबद्दल पावत आहे. ऐसियांस असें ठरविलें आहे कीं सरकारी रुपये ११४६२ अकरा हजार चारशें बासष्ट रुपयांची नेमणूक सदर देवस्थानाचे वहिवाटदार जोंपर्यंत इंग्रेज सरकारसी इमानें इतबारें वागतील तोंपर्यंत इंडियाचे सरकारी खजिन्यांतून निरंतर चालून आदा करण्यांत येईल.

खुलासापत्र

श्री

१. आपाजी अनंत ह्याचें आडनांव ओक असोन त्याचे वंशाकडे संस्थानांत अद्याप पावेतो कारकुनीची असामी आहे.

२।३. छ २३ आज्ञाप्रमाण ह्याचें पुढील अक्षरें स्वहस्तें असतील किंवा नाहीं हें समजणेस त्यावेळचे कांहीं कागदपत्र बंडांत गहाळ झालेनी समजणेस मार्ग नाहीं. आम्ही कमिशनर ऑफिस मधून छापील नक्कल घेतली आहे....

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

४. ...नारो दामोदर मयत झालेवर असावें असें वाटतें. हरभट बापाजी पिंगळे यांनीं कांहीं दिवस नंतर आबाजी महादेव मोडक ह्यांनीं काम केले.... त्यावेळेस माधवराव नारायण प्रधान होते आलाहिदा हुकुमाची नक्कल पाठविली आहे.

---

८ राजकीय—

२१ रघूजी भोसले यांची जवाहीर खरेदी

(प्रा. द. वा. पोतदार, बी.ए.)

एका वाण्याकडून खजूर गुंडाळून मिळालेला कागद पाहतां तो एका पेशवाई व्यापाऱ्याचें वहीचें पान आहे असें आढळलें. दुसरे रघूजी भोसले यांची रु. १४४३५६ ची एक जवाहीर खरेदी नोंदली आहे. ही शक १७१७ आश्विन (सन १२०५ फसली) म्ह. इ. स. १७९५ मधील आहे. त्यांत

ले. ५१ } { श. १७१७ / इ. १७९५

" १५००० चौकडा १ — ८००० जोडी १
१४३०० कंठी — ४२००० सिरपेच व पोहुची मिळोन दिली. "

अशी नोंद आहे व या व्यवहारांत रु. ४९५६ नफा नोंदला आहे. इतरहि कांहीं नोंदी आहेत. उ. धोत्रजोडा १, पैठणी रेशीमकांठी १ रु. ५०, शेला पैठणी हिरवा रु. ४०, शालू रु. ५३॥, पातळ पांढरें रु. ७७८-. लुगडें, पैठणी रु. ६१ अशा किंमती आहेत. या सर्व नोंदी वैय्यापारिकसंशोधनाचे दृष्टीनें उपयोगी आहेत.*

---

२२ पेशव्यांच्या स्वारीची सरबराई

(कै. श्री. सर. ना. य. मिरीकर)

१ पुढील कागद पांडेपेडगांव परगण्याचे देशपांडे यांच्या दप्तरांतील आहे. तेथें असलें तीन कागद आढळले. प्रत्येकांत दोन दोन गांवांस हुकूम दिलेला आहे. गांवास हुकूम देशपांड्यांच्या मार्फत जावयाचे असल्यामुळें त्यांच्या दप्तरीं हे हुकूम सांपडणें

* पा. स. १३।४१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

साहजीक आहे. पेशव्यांची स्वारी परगण्यांत आली असतां स्वारीकरतां लागणारा सरंजाम त्या परगण्यांतील प्रत्येक गांवांतून जमा करण्याची वहिवाट होती असें या कागदावरून दिसतें.

२ शक १६९३ मध्यें श्रीमंत नारायणराव पेशवे स्वारीस निघून नगरप्रांतीं आले होते. त्यावेळीं त्यांचा तळ पिंपळगांव माळवी या गांवीं पडला होता. हे गांव अहमदनगरच्या उत्तरेस तीन कोसांवर आहे.

ले. ५२ } श्री { श. १६९३ / इ. १७७१

अज स्वारी राजश्री *माधवराव नारायेण सुभेदार ता। किले अमदानगर ता। मोकदम देहाये ता। कडे प्रो पांडिये पेडगाव सु॥ इसने सबेन मया व अलफ श्रीमंत——याची खासा स्वारी मौजे पीपलगाव मालवी येथे आली आहे तर देहाये मजकूर पो। स्वारी सरमजाम येणे प्रो देह वि ता।

मौजे माणीक दौंडी	मौजे देवलाली
१० लाकडे खंडी	१० लाकडे खंडी
१० मेकचो	१० मेख ×
× गोवऱ्या गाडे	१० गोवऱ्या गाडे
३००० पत्रावली सुमार	२००० पत्रावली सुमार
१००० मेखा सुमार	९०० मेखा सुमार
·।· शाकभाजी हरजीनसं खासी	८४ शाकभाजी हरजीनस खासी
२०० कुंभार काम	२०० कुंभार काम
२५ रांजण	२५ रांजण
५० डेरे	५० डेरे
५० घागरी	५० घागरी
५० मडकी	५० मडकीं
२५ कोलंबी	२५ कोलंबी
२५ बेगारी आ।	२० बेगारी आ।

सदरहू प्रो संरमजाम देहाये मजकूरचा जलद किले मारी घेऊन येणे.†

---

* नारो बाबाजी (इ. १७२०–७५ अभ्यंकर–नगरकर) यांचे हे थोरले पुत्र हे, वडील अधिकारावर असतांनाच सरकार कामगिरीवर होते (इ. १७५०–१८०९).

† पा. स. ९१३८

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

२३ राव प्रधान यांस पत्र

(के. वा. वि. जोशी-सातारा)

ले. ५.३ } ॥ श्रीमंगळमूर्ती ॥ { श. इ.

श्रीरमामंडित राजमान्यविराजित धर्मपरायण गौब्राह्मण प्रतिपाळक श्रीराव प्रधान स्वामीचे सेवेशी

नारायणराव सास्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ जाणोन आपलें स्वानंद लेखन करणें रुपापत्र रा शामराया बराबर पावलें आपले आज्ञेप्रमाणें शामरायास मुख्यांचे सनमुख केलें मुख्याचा वेव्हार व प्रसंग व रीत परस्परें स्वामींनी अयकिली असेल यांजला लटके कदापी आवडत नाही जो प्रसंग करणारांनी महाराजापाशीं केला त्याची येथें गंधवार्ता नाही अवघे मिथ्या आरंभापासून सेवट पावेतों लटकें राजमान्याविराजित मल्हारराव होळकरांनी मुख्यांस अर्जी लिहिली होती त्याचें उत्तर शामरायाचे हवाला केलें आहे. त्यावरून आदी अंताचे विदित होईल. जर कांहीं प्रसंग असता तर सेवकाचे विचारेच होता व रा मल्हाररायानी थोडीशी वस्त्रे आमचे मुख्यांस पाठविली होती तें दाखणे उतम न देखलें फिराऊन पाठविलीं असेत व मीर खुदायार खानासही वस्त्रें पाठविली होती तें त्यानेंही न घेतली व वस्त्रें शामराया जवळ आहेत. मीं शुभचिंतक असे मजयोग्यसे असतां आज्ञा करीत नाहीं कोणेविशई दुसरा वेव्हार न जाणावा विनंती

विनंती

२४ सांप्रदायांचा पेच

(श्री. कृ. वा. पुरंदरे-पूर, सासवड)

सदर पत्र बाजिराव रघुनाथाचे कारकीर्दीतील आहे. हें त्र्यंबकराव महिपत उर्फ नाना पुरंदऱ्यानें पुण्यांतील बाळोजी कुंजिराजवळील आपल्या एका कारकुनास लिहिलें आहे. बाजिरावाची किल्ली म्हणजे बाळोजी कुंजीर. त्या करवीं जाधवरावावर आलेला प्रसंग निभाऊन त्याचा 'आब' राखावा अशी व्यवस्था करण्यास नानांनीं लिहिलें आहे. 'फजीती न व्हावी बेत चांगला उतरावा' अशी कळकळ मराठशाहींत थेटपर्यंत एक दुसऱ्याविषयीं दाखवितां तर मराठ्यांच्या शत्रूंस मराठशाही पचविण्यास बरेंच जड गेलें असतें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५४ श्री (अस्सल मोडी)

विनति उपर श्रीमताची स्वारी सिंद्याचे लस्करांत जाणार त्यास च्यार सरदार व मुछदी आज जातील त्या समारभासुधा राजश्री जाधवराव याचे डेन्यास आले आसता जाधवराव यांचा साम्प्रदाय की स्वारी समागमे येतील त्यास वस्त्रे द्यावी त्या प्रमाणे करावे तर इतकी आवाका तूर्तचे काली नाही याजकरिता आजचा बेत राहून उद्याचा व्हावा म्हणजे उदईक नेमणुकेप्रो घडेल ते बहूत संकटात पडले जरकरिता समारभाने आले आसता मग फजीतीस जोडा नाही त्यास येविसी बालोजीबावासी बोलोन आजचा बेत राहू द्यावा कदाचित आजच जावयाचे आसे जाल्यास आगोदर बालोजी बावानी यावे श्रीमत येतील तेव्हा वस्त्रे देते समई वरकडास द्यावयाचे प्रयोजन नाही असे श्रीमतानी आज्ञा करावी म्हणजे त्याचा आबताब राहून मोठेपणा– सारखे उतरेल सारोश आगोदर याप्रो बा(बो)लोन ठेवावे आणि बावानी आगोदर यावे आसे ठराऊन निश्चयपूर्वक आधी यावे आसे जरूर करावे ग्रहस्त बहूत संकटात पडोन येकाकी आपण बोलण्यांत आसता फाजील न व्हावी बेत चागला उतरावा हे विनंति.

(उत्तर)

सदरहू अन्वयेच बावास बोलोन ठेविले आहेत अद्यापि श्रीमंताकडे बावां गेले नाहीत गेल्यानंतर बातमी कलेल सारोष याची काळजी आसो नये लिहिल्या अन्वयेच घडेल हे विज्ञापना*

छ २७ जाखर

---

२५ चिमाजीआप्पा पेशवे

(कै. द. वि. आपटे)

[हें पत्र कै. पां. न. पटवर्धन यांचे संग्रहांतील आहे.]

ले. ५५ श्री { श. १७१८ ज्येष्ठ शु. १४ / इ. १७९६ जून १९ }

पौ छ २८ मोहरम

सुाा सबा तिसैन शके १७१८

आपत्य हरीने दोनी कर जोडून साष्टाग नमस्कार विज्ञापना ताा छ १३ जिल्हेज पावेतो सुखरूप असो विशेष वडीलाकडून बहुत दिवस पत्र येऊन साभाल होतं नाहीं

---

* पा. स. १४७४

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यास सदैव पत्र पाठऊन साभाल करीत असिले पाहिजे हिकडील मजकूर श्रीमत राजश्री चिमाजी आप्पा साहेब याचे दतविधान होऊन पेशव्याईची वस्त्रे वैशाख वा। पचमसि जहाली जवल कारभारी राजश्री +परशराम भाऊ पटवरधन व रा। बाबा फडके व गोविंदराव पिगले व बहिरोपंत मेहदले व नारोपंत चक्रदेव आहेत मुख्यत्वे परशरामभाउं तासगावंकर आहेत देवावे ते च करितातं सरकार वाड्यातील झाडून बदोबस्त भाऊचा आहे आपासाहेबाजवल परशरामभाऊचे चिरजीव बाबा जवलं नेहेमी असतातं श्रीमतं राजश्री नाना साताऱ्याहून वाईस आले होते ते येथून भाऊचे चिरजीव दोन हजार फऊज घेऊन सिरोलास गेले व सिदे याचा कंपू जेजुरीहून मोरेस्वरास गेला हे वर्तमान आइकून नाना कोकणात रायगडाजवल माहांडास गेले तेथे राहिले आहेत फऊज जवल होती ती दूर केली पाइचे माणूस तीन च्यार हजार ठेविले आहे जवलं रा। राघोपंत गोडबोले व आबा शेलूकर व दादा गद्रे व बच्याबा सिरोलकर आहेत रा। आपा बलवंत वाईहून कांहीं बोलावयास म्हणूनं पुणेयास आले तें येथेच राहिले भाऊनी सागितले की तुम्ही जाऊ नये येणेप्रा। जाले श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब सिदे याचे लस्करात कवडीचे मुकामी आहेत श्रीमतं राजश्री अमृतरांव साहेब यास आणावयासं यांजकडून गेले आहेत जुनरास आहेत अद्यावत आले नाही आल्यावर काय हो[ई]ल ते पाहावे नाना कोकणात गेल्यावर रा। त्रिंबकराव परचुरे व याचा भाऊं बापु उभयेता पुणे-यातून गेले ते पुरदरांस गेले नंतर रा। सखोपत सान्ये याणी भाऊस पत्र पाठविले की परचुरे येथे आले आहेत तेव्हा भाऊंनी पत्र पाठवीले की तेथून कोठे जाऊ देऊ नये म्हणून त्याजवरून उभयता भाऊं किलेयांत आहेत त्याचे बधु विठलराव व अन्याबा व बाइका व मुंले कोकणात होती ती सामगावासं आली होती त्रिंबकराव गेलयाचे वर्तमान आइकून माघारी तोरण्यां किल्ल्याखाली गेली कोकणात जांत होती ती सिदे याजकडील राऊत जांऊन आणिली ती पुणियांतं वाड्यातं त्याचेंच आहेत चवकी सिदे याजकडील आहे नाना फडणीस याचे वाड्यात चवंकी सिदे याजकडील गारदी आहेत व आणंखी नाना नीसबत राघोपंत गोडबोले व बापू लेले व खंडोपतं वर्तक व बच्याबा सिरालकरं व आबा सेलूकर वगैरे यांचे घरी सिदे याजकडील चवकी आहे आणखी चवक्या बसत च आहेत सिदे याचे च प्राबल्यं आहे येणेप्रा। वर्तमान आजपर्यंत आहे या उपरांत काय हो [ई]ल ते पाहावे होलकर येथे च आहेंत आपले यजमानाचे गाव केदुर व लोणी व पाबलं येथून वैरण सिदे याजकडील कही पाच सात वेला येऊन लुटून नेली गढीतील वैरणं नेली पहिली खेप नेली आणि बाकी वैरण राहिली त्याजवर सिदे याची चवकी गाडदी बसले आणि च्यार पाच दिवसं नित्य

+ या ठिकाणीं 'र' हें अक्षर मोडी 'रा' नेहमी काढतात तसें काढून काना न देतां काढलें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गाडे व उंटे येथून झाडून वैरण घेऊंन गेले वाड्याची कुलपे जबरदस्तीने तोडिली आणि आतं सिरून कोठड्या व जामदारखाना व फडताले यांस कुलपे होती ती तोडून आंत वैरणी पाहाल्यां व वाड्यावर चढून वाड्यांची तसनस केली साल मजकुरी गावची लावणी होत नाही अद्याप कहीचा उपद्रव होत आहे परशराम भाऊंच्याने बदोबस्तं होत नाही सिंदे याजकडे जाऊनं त्याचे स्वार वं जासूद वगैरे रखवालीस नेले सिंदे याजकडे बोभाट सागावयास गेले असतां ताकीददार देतात परंतु कही जात्ये ताकीददाऱ्याच्यां मुसक्यां बाधावयास काढून गांव लुटितातं येणे प्रो वर्तमान जाले यदां गावचा पैसा आला नाही व संरकारांतून यैवज आला नाही पनासं हजार रुाये आज तां बाकी येणें राहिली आहे खर्चाची ताराबल बहुतं जाली आहे लोकाचे कर्ज पाच हंजारपर्यंत आजपर्यंतं देणे व उदम्यांचे तीन हजारपर्यंत देणे आहे पुढे खर्चास नाही गल्यांची बेगमी नाही वैरणीची बेगमी होती ती गेली आता वैरण नाहीं याजकरितां झाडून गुरे पिंपलगावासं होती तेथील वैरण कंहीने नेली म्हणून पावलास आणिली तेथील वैरण गेली आतां झाडून पुण्यातील गुरासुधां खलीस पाठविली व घोडी पागेची व घरची तामसवाडीसं पाठविली परंतु ससांराची ताराबल आहे शागीर्दपेशास रोजमरां या उंपरातं मिलावयाचां नाही व मुदपाकातं अन्न मिलावयाचे नाही परशैरामभाऊस पुसिले व दाहा हजाराची याद देवावे जाली आहे तो यैवज मागितला त्याणी उतर केले की येव्हा रुपया मिलावयाचा नाही याप्रो येथील मजकूरं जाला आहे श्रीमतं मांतुश्री बाईसाहेब बहुतं घोरात आहेत व शरीरी हि समाधान नाही पुढे अवस्था कठिणं आहे त्यास हे वर्तमान यजमानाच्या कानावर घालून कांही बदोबस्तं केल्यास ठीक पडेल नाही तरं लवकीक राहात नाही सारांशं काही खर्चासं पांठवावे येथे कर्ज देखील मिलत नांही येणे प्रो वर्तमान आहे लवकर बदोबस्त जाल्यास उतम आहे आपणं परगंणेयातून जाऊन यजमानासं सागून खर्चाची बेगमी केली पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना[1]

२६ तोतया प्रकरणी पत्र

(कै. गो. वि. आपटे)

बरवे घराण्याचा इतिहास लिहिण्याचे वेळीं संशोधन करीत असतां, जिल्हा रत्नागिरीपैकीं कर्यात नेवरें येथील मोकदम बरवे यांचे दप्तरांत पुढील कागद मिळाला. यांत धोंडोबा आपा व कृष्णराव, बाबूजी नाईक हीं नांवें आलीं आहेत. व रा. हरिपंतांनीं डेरा देऊन फडशा करावा असेंहि आहे.

---

१ ह्या पत्रांत लेखकानें अनुस्वाराचीं टिंबें शब्दांतील कोठल्या तरी अक्षरावर दिलेलीं आहेत. पा. स. ११।४१.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५६ } श्री (असल) { श. इ.

विनंती उपरी तोतयाची चौकशी लौकर करून फडशा करावा लांबवू नये म्हणोन लिहिले ते कळलें त्यास चौकशीचे पर्याय कसे करावे ही गोष्ट वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री व आम्ही बसून ठरविले की भिक्षुक ब्राह्मण सामान्य गृहस्थ यांणीं जाऊन पाहाणे ही गोष्ट ठीक नाहीं. कोणी कांहीं म्हणेल संशयास कारण. याचकरतां पांच सात दाहाजण मातबर रामशास्त्री आदिकरून जावें पहावें म्हणजे गुंता उरकला फार लांबवू नये याप्रों सिद्धांत जाहाला त्यांत दोन चार ग्रहस्थ येथें आहेत राजश्री धोंडोबा आपा व रुष्णराव यांस बलावून पाा आहे रुष्णराव सासवडासच आले असतील त्यास लौकर पाठवून द्यावे [तोतया] आंगरे याजकडे ते समई इंग्रजाचा [निरोप कु]लाब्यास आला की आमचे हवाली करणे तेव्हां आंगरे [बोल]ले कीं आम्ही पुण्यास घेऊन जातो खरा खोंटा करणे तो तेथें तुम्हाकडील आपटेन[१] आहेत त्यांचे गुजारतीनें करून तुम्हास लिहून पाठवूं असें बोलणे जाले ते खरे होऊन इंग्रजास कागद गेला पाहिजे म्हणजे आंगरे याचा पेच वारतो ही गोष्ट येथून दहा पांचजण पाहावयास जातील ते समई इंग्रजांनीं तेथें जावे याजदेखत खोटा असे जाले म्हणजे गुंता उरकला याप्रो येथें बेत केला आहे आपल्यास कलावें म्हणून लिा असे धोंडोबा आपा व रुष्णराव येण्यास एकदोन रोज लागतील आले म्हणजे उशीर लावीत नाहीं राजश्री बाबुजी नाइकास आणावे असे सिंध्यांचे मानस होते आतां म्हणता[त] की न आले तरी कार्यास येईल त्यास नाइकास आपली आमची पत्रे गेली आहेत फार करून येणार नाहींत कदाचित आले तर तेही पाहातील †भिक्षुक वगैरे मंडली भ्रांतिकर नेली असतां वाईट पडेल. याजकरतां मातबर पोक्त मात्र व कर्नेल नेऊन फडशा राजश्री हरिपंतानी डेरा देऊन तेथें करावा असे केले आहे रा छ १८ सवाल हे विनंती*

---

२७ परशुरामभाऊंचें एक पत्र.

(पै. शिकंदर लाल आतार)

हें पत्र माझें बालमित्र रा. रा. सदाशिव वासुदेव गुणे कालेकर, इनामदार, भिलवडी, यांचें दप्तरांतून मिळालें. पत्र खाजगी व्यवहारासंबंधीं असून सर्व एकाच वळणाचें आहे. यावरून तें परशुरामभाऊंचें स्वदस्तुरचें असावें; असें वाटतें.

---

१ कर्नेल अपटन. † येथून अक्षर निराळें तें खुद्द नानांचें आहे.

* पा. स. १६१३९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लें. ५७ } श्री गणपती अस्सल { श. १७०१ भाद्र. व. ११ इ. १७७९ आक्टो. ५

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री लक्ष्मण धोंडदेव को. भिलवडी स्वामी गोसावी यांसि

सेवक परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी येथिल कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष राजश्री सदासिव राम गुणे कालेकर यास को मजकुरी येकसे वीस बिघे जमीन सातसे रुपयेची इनाम आहे त्याजपैकी वीस बिघे जमिनीची लावणी शंभर रुपयाची* मारनिल्हे आपलें मारफतीने करीत आसतात बाकी शंभर बिघे जमीन साहासे रुपयेची राहिली ती आवल दुम सीम मिरज प्रातातील धान्या-प्रमाणे नेमून देणे जाणिजे छ २४ रमजान सु।। समानीन मया व आल्फ बहुत काय लिहिणे हे विनंती[१]

---

२८ पेशवे सरकारच्या हुजूरपागेकडील घोड्यांच्या नेमणुकी

(श्री. पां. मा. चांदोरकर)

रावबाजी यांचे कारकीर्दीत सरकारच्या हुजरातीच्या पागेचा खर्च कसा चालवीत त्याचें निदर्शक असें खालील पत्र आहे. प्रत्येक मामलतीच्या मामलेदारा-कडून त्याच्या उत्पन्नांतून 'सरकारची रसद व खाजगी अंतस्थाचे ऐवजाचे ठरावा-खेरीज' एक ठराविक रक्कम नेमून दिली जाई, ती 'सरकार नुकसान न होतां व रयतेवर जलेल न करितां' वसूल करण्यांत येत असे. दर घोड्यास दरमाहा साधारण ४० रुमये नेमणूक असे, तिच्यांत दाणा, वैरण, रतीब, औषधें, लागलासवड, मोतद्दार वगैरे सर्वांचा खर्च येई. म्हणजे वर्षाला ४८० रुपये लागत; शिवाय प्रत्येक वर्षी दस-ऱ्याच्या सुमारास दर घोड्यामागें सामान नवीन करीत असत, त्याला १५० रु. लागत, मिळून प्रत्येक घोड्या पाठीमागें एकंदर ६३० रु. खर्च येई. ही रक्कम मामलतदारानें खाजगी खात्याकडे भरावी अशी रीत होती. याप्रमाणें हुजरातचा खर्च खास सरकारी तिजोरींतून न देतां परभारें माहालाच्या वसुलांतून भागविला जात असे. पत्र असें:—

---

* यावरून ५।६ रुपयांत एक बिघ्याची लावणी त्याकाळीं होत असे हल्लीं पांच सहापट रुपये १ बिघा लावण्यास खर्च येतो.

१ पा. स. १२।३९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५८ } अस्सल श्री { श. १७३८ / इ. १८१६

राजश्री रामचंद्र भिकाजी गोसावी यांसि

सु॥ सबा अशर मया तैन व अलफ तुम्हांकडे माहालानिहाय तालुके रायगड येथील मामलत आहे त्या मामलतीकडे सरकारचे हुजूरपागे कडील घोडी चंदी व वैरण व रतीब चारावयास वगैरे नेमून दिल्हीं आहेत त्यास मामलतचीं सरकारची रसद व खासगी अंतस्ताचे ऐवजाचे टरावा खेरीज सरकार नुकसान न होतां व रयतेवर जलेल न करितां, वाजबी रीतीनें उत्पन्न होईल त्या ऐवजापों दररोज चंदी व वैरण व रतीब व औषधे व लाग लागवड व पोग्यांची तैनात मिलोन नख्त दरमाहां दर घोड्यास रु॥ ४० चालीस प्रमाणे व घोड्या वरील सामान दुसरे यास सर सालांत ऐक वेल नवे करून द्यावयाबद्दल दर घोड्यास रु॥ १५० येकशे पनास प्रमाणे तुम्हीं सरकारांत द्यावयाचे कबूल केले आहेत त्या प्रमाणे साल मजकूर सन सबा अशर मया तैनचा ऐवज तुम्हांपासून घ्यावयाचा त्यास घोड्यास चंदी वैरणी बा॥ व सामाना बा॥ वगैरे खर्चास ऐवज खाशा कडील खासगी कडून पावतो ते ——रुपये

१२०० चंदी वैरण व रतीब व औषधे व लाग लागवड व पोग्यांची तैनात मिलोन दर घोड्यास रुपये ४० प्रमाणे दर माहा रु॥ १०० ई॥ माहे रजब ऊर्फ ज्येष्ठ मास ता॥ माहे जमादिलाखर ऊर्फ वैशाख मास पावेतो बार माही घोडी रास २॥ यो॥———— ————रुपये

३७५ सरंजामा बा॥ दर घोड्यास रुपये १५० प्रमाणे घोडी रास २॥.

१५७५

ऐकूण एक हजार पाचसे पंच्याहातर रुपये बा॥ देणे खासगत खर्चाबदल खाशां कडील खासगीकडे गोविंद केशव बेडेकर याचे गुजारतीने सदरहू येक हजार पाचसे पंच्याहातर रुपयाचा चादवडीचा भरणा करणे[1]

---

२९ मातुश्री ताराबाईसाहेब व रामभट शेषाद्रिभट त्रिपुरारी

(श्री. पां. मा. चांदोरकर)

पुढील सनद रामभटजीचे वंशज रा. महादेव भट बिन भाऊभट त्रिपुरारी, मौजे सोनवडें, पेटा शिराळें येथील रहिवासी यांच्याकडून माझ्या हातीं आली. या

[1] पा. स. ९१४१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सनदेप्रमाणेंच साधारणतः आणिक दुसऱ्या सनदा रामभटजींच्या मिठंभट नांवाच्या मुलास श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधींनीं दिल्याचें ऐकण्यांत आहे. मूल सनद येणेंप्रमाणेः—

ले. ५९ } श्री { श. १६७८ ज्येष्ठ वद्य १४
इ. १७५६ जून २६

श्रीमन्माहाराज मातोश्री आईसाहेब याणी ता मोकदमानी मौजे खेड तर्फ वंदन प्रांत सातारा यासी आज्ञा केली. ऐसी जे वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामभट बिन शेशाद्री भट उपनाम त्रिपुरारी गोत्र कौंडण्य सूत्र आपस्तंभ हे बहुत थोर ब्राह्मण सत्पात्र तपस्वी आणि यासी श्री साक्षात्कार जाणोन किले सातारियाचे मुक्कामी साहेबांनी कित्येक पुढील भविष्याच्या गोष्टी पुसिल्या त्याचीं उत्तरें सांगितली त्याप्रमाणे सर्व प्रत्ययासी आले यामुळें साहेबाची निष्टा यांचे ठाई बैसली असे ब्राह्मण साहेबाचे राज्यांत असावे असे मानस होऊन यासी पुसिले जे तुमचा मनोदय काय आहे तो सांगावा त्यावरून त्याणी सांगितले की सातारा संनीध पाटस्थळ बागाईत जमीन इनाम करून दिल्हियां श्रीचे पूजेस पुष्पे होतील आणि ब्राह्मणसंतर्पणास भाजीपाला उपयोगी पडेल त्याजवरून आशा ब्राह्मणाची कामना पूर्ण केलिया साहेबास श्रयस्कर जाणोन मौजे मार पैकी जमीन —————————— बि॥

गाव पैकी जमीन चावर १ — ॥- बाग चिरंजीव फतेसिंग भोसले याजबाबद चावर अर्धा

येकूण दीड चावर जमीन स्वराज्य व खालसा व मुकासा व बाबती व चवथाई व देशमुखी व सरदेशमुखी व धारकरी व साहोत्रा व नाडगौडी हक्कदार सुध्धा याखेरीज सरकारच्या हावदापैकी॰पाणी दोन मोटा बागास कुलबाब व कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी देखील इनाम तिजाई जलतरुतृणकाष्ठपाषाणनिधिनिक्षेप आदिकरून सर्वमान्य यासी धारादत्त करून दिल्ही असे तरी पूर्व मर्यादेप्रो जमीन याचे चतुःसीमा करून याचे रजातलब वर्तणूक करून यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने जमीन चालवणे प्रति वर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे यां पत्राची प्रति लिहून घेऊन असल पत्र वेदमूर्ती जवळ भोगवटीयासी परतोन देणे हावदाचे पाणी बागास दररोज दोन मोटाचे दिल्हे आणिजे छ २७ रमजान सुहुर संन सबा खमसैन मया व अलफ धाता नाम संवछरे लेखनावधि

---

* या रामभटजीची वंशावळ अशीः—शेशाद्रि भट त्रिपुरारी—मिठंभट—भवानीशंकर भट—कृष्णंभट—भाऊभट—१ राजाराम भट व २ महादेवभट

आज या इनामापैकीं अगदीं थोडें इनाम शिल्लक असून बाकीचे नाहींसें झालेलें आहे.*

---

* पा. स. १४१४०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

३० नाईक पोतदार यास ताराबाईचें वतन पत्र

(कै. वा. वि. जोशी)

कृष्णाजी नाईक जोशी याना शाहू छत्रपतीनी पोतदारी दिल्याचे कागद अजून उपलब्ध झाले नाहींत. तथापि खाली नमूद केले वतनपत्रांत 'नानाजी बिन कृष्णाजी नाईक पोतदार' असा नामनिर्देश आहे त्या वरून शाहू छत्रपतीनी कृष्णाजी नाईकास पोतदारी दिली होत्ती ही गोष्ट स्पष्ट होते. पोतदारीचे हकाशिवाय चौधरी-पणाचा व मोकमीचा हक्क कृष्णाजी नाईकास शाहूनें दिला होता याहि गोष्टी खाली नमूद केलेले पत्रावरून कळून येतात.

ले. ६० } नक्कल श्री { श. १६७४ आश्विन व. १ / इ. १७५२ आक्टोबर २९

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याणी राजश्री नानाजी बिन कृष्णाजी नाईक पोतदार उपनाम जोशी चवधरी व मोकीम पेटा शाहुनगर याशी दिल्हे वतनपत्र ऐशी जे तुम्ही हुजूर येऊन विनंती केली जे पेटा शाहुनगर व हुजूर बाजार नजीक किले सातारा येथील चवधरकी व मोकिमी पूर्वी कैलासवासी माहाराज स्वामी याणी आपले बाप कृष्णाजी नाईक जोशी याशी वतन करून देऊन पत्रें करून दिल्ही आहेत सदरहू वतनास गुमस्ता माणको माहादेव यासी ठेऊन वतन अनभवीत होते त्यास मुकुंदजी साळोखी याशी पेटा मजकुरी धडवाईचा अमल सांगि(त)ला त्यास चौधरकीचा हक वसूल सुरलीत न होय याबदल माणको माहादेव याणे मुकुंदजी सालोखी यास साहित्यास घेऊन चौधरकीचा हक वसूल करून घेऊ लागला. एक दो वर्षानंतर चौधरकीचा हक मुकुंदजी बळेच आनभवू लागला मोकिमीचा हक कापडाच्या छापाचे हशील पैकी दर (सदे) रुा १० पैकी पानसारा तिजाई देऊन दोन तकशीमा आम्ही मोकीम याप्रमाणे वसि वरषेपर्यंत आनभवीत आसता त्यापैकी निमे ऐवज मुकुंदजी बळेच वसूल घेतो त्यास आपले बाप कृष्णाजी नाईक जोशी चितात विषाद मानून माहाराज स्वामीस विनंती केली नाहीं त्या उपरी नाईक मा। माहायात्रेस गेले आपण नेणते होतो त्यामुळे हा कालपर्यंत मुकुंदजी सालोखी व त्याचा पुत्र बहिरजी सालोखी चवधरकीचा हक व मोकीमीचा हक कांही एक दिवस कांही नेत आहे त्यास साहेबी पूर्वील पत्रें आपणापाशी आहेत ती मनास आणून सदरहु वतन चौधरकी व मोकिमी दरोबस्त वतन आमचे दुमाले करून वंशपरंपरेनें चालविले पाहिजे म्हणून विनंती करून पूर्वील पत्रें चिरंजीव यानी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करून दिली होती ती आणून हुजूर दाखविली ती पत्रे व पूर्वील भोगवटा मनास आणून तुम्ही पुरातन साहेबाच्या राज्यातील सेवक तुमच्या बामानें निष्ठेनें सेवा केली व तुम्हीही निष्ठेनें सेवा करीत आहां तुमचें वंशपरंपरेनें चालवणें आवशक जाणोन साहेब तुम्हावरि कृपालु होऊन पूर्वी चिरंजीव कैलासवासी यानी पेटा शाहूनगर समीप किले सातारा येथील चौधरकी व मोकिमी दरोबस्त वतन तुमचे बाप कृष्णाजी नाईक जोशी यांशी वंशपरंपरेनें करून दिल्हे आहे त्याप्रमाणें तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन करार करून दिल्हे असे तरि तुम्ही पेटा शाहूनगर येथील चौधरकी व मोकिमी दरोबस्त आपले दुमाले करून घेऊन शिरस्ते प्रा सेवा करून वतन संमधें हक पुरातन शिरस्ताप्रमाणे घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें वतन आनुभऊन सुखरूप राहणें बहिरजी बिन मुकुंदजी साळोखी याशी ताकीद करून आज्ञापत्र सादर केले असे त्यास तुमच्या वतनास दखलगिरी करावयाशी समंध नाहीं जाणिजे छ २१ माहे जिल्हेज सुाा सलास खमसैन मया आलफ आंगिरा नाम संवछरे लेखनालंकार मोर्तब.

बार सूद सुरू सूद बार.*

---

३१ विरमाडेकर सोनवणे पाटील यांची तकरीर

(श्री. शं. ना. जोशी)

+सातारा जिल्ह्यांतील वांई तालुक्यांत विरमाडें हें खेडेंगांव हल्लीं देवस्थान इनाम म्हणून धांवडशी येथील ब्रह्मेंद्र स्वामी ह्यांकडे आहे. विरमाड्यास सोनवण्यांचीं घराणीं ५०।६० आहेत. ता. जावलींतील प्रतापगडचे गडकरी सोनवणे आहेत. तेंव्हां विरमाडें येथील सोनवण्यांच्या घराण्यांत तपास करून तसा उल्लेख आढळल्यास पहावा म्हणून सदर खेडेंगांवीं गेलों. तेथील मारुती बाबाजी सोनवणे वय सुमारें ६०।७०. यांचेपासीं कागद आहेत. त्यांनीं हा एक सध्यां दाखविला. आणखी दुसरेही एकदोन दाखविले. पण त्यांत तसा उल्लेख सांपडला नाहीं. सोन–ना–वणे असे दोन्ही उल्लेख सांपडतात.

हल्लींच्या विरमाड्याचें मूळ गांवठाण पूर्वी पूर्वेस कृष्णानदी कांठीं होतें. पूर्वीं म्हणजे सुमारें २५०।३०० वर्षांपूर्वी, कृष्णानदी कांठीं पिंपळटेंक नांवाच्या पांढरीवर कांहीं घर होतीं. पुढें नदीच्या प्रवाहाचा वस्तीला फार त्रास होऊं लागला म्हणून नदी-पासून दोन मैलांवर मागें म्हणजे सांप्रतच्या जागीं विरमाडें हें गांव वसलें.

---

* पा. स. १५।३९. + पा. स. १२।४१.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथील मूळची पाटिलकी माळ्याची. विजापूरच्या पादशहाचे सरदार अशेखान व बोरखान यांच्यामार्फत विरमाडें व आणीक ३ गांवें अशा ४ गांवांची कमाविसी करून सोनावणे असत. पुढें पाटील माळी नातवान झाला. म्हणजे पाटिलकीला असमर्थ झाला. गांवची बाकीहि थकत चालली. पोटीं पुत्रहि नाहीं. तेव्हां सोनावणे यांनीं तो पैका विजापूरच्या दिवाणांत भरून पाटिलकी घेतली.

सोबत तकरीर–नकल जोडिली आहे. अस्सल मालकाकडून मिळालें नाहीं. नकल बरोबर रुजू घातली आहे.

ले. ६१ } श्री { श. १६८२ / इ. १७६०.

नकल

राजेश्री गोत गंगा समाकुल्ल मौंवरगांव सोचे सेवेसी–तकरीद कर्दे खंडोजी चिन कृष्णाजी सोनवणी पाटील मौजे विरमाडें प्रांत कऱ्हाड सुा इहिदे सितैन मया अलफ गोताचे सेवेसी लेहून दिल्ही तकरीद ऐसी जे आपला मूल्ल पुरुष रामजी नाईक यानी सोनवणी नायकवाडा कसबे सित्लवल्ल फड नाईक यानी मौजे सायगांव व मौजे मोरघर व मौजे मोरावल्लें व मौजे विरमाडें येैसे च्यार गांव यांची कमावीश अशेखान व बोरखान विज्यापूरच्या पादशाचे चाकर यांचे तरफेने चऊ गांवची कमावीश करीत होते आणि मौजे विरमाडें येथील पाटील की मानाजी खीरसागर माल्ली पुरातन पाटील यांचे घरीं राहात होते ते समयी गांवावरी बाकी राहिली होती त्याज यैवज नाही दिवाणचा पैका रवला यास्तव मानाजी माली याने रामजी नाइका आपल्या वडीला पासोन होन ३२५ सवातीनशे कर्ज घेऊन गांवची बाकी वारिली पुढें रामजी नाईक आपला पैका मागों लागले परंतु माली नातवान व पोटीं पुत्र नाही व पैका फेडावयासी यैवज नाही तेव्हां माल्याने विचार केला की अपिले वृधपण व पोटी पुत्र नाही पैका फेडावयासी उपाय नाही या उपरी आपले वतन मौजे मारचे आहे ते रामजी नाईकास देऊन आपला गल्ला मोकल्ला करावा यैसा निश्चय करून रामजी नाईकास कर्जाच्या यैवजांत मौजे मारचे आपले वतन खूष खरेदी करून दिल्हे परंतु यैसियासी रामजी नाईक यासी चाकरीच्या गुंत्यामुळे वतनावरी नेहमी राहातां न ये यास्तव शिरवलास जाऊन आपले भाऊबंद मेल्लऊन त्यांस आपले जातभाऊ भराडजी पाटील मौजे भांबेडे त्यांस जाऊन भेटले वतनाचा मजकूर सांगितला परंतु भाऊबंद यासी मौजे मजकूरचे वतन अनभावयासीं ... कीं मौजे विरमाडें येथील पाटीलकीचे वतन आपण माल्यापासून विकत घेतले आहे तेथील वतनाच्या भारास नेहमी कोण्ही पाहिजे यास्तव तुम्हाकडे अलों आहे जातभाऊ एकच आहों तरी मौजे मजकूरचे निमे वतन तुम्ही खाऊन गावचा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कारभार करणे यैसा करार करून भराडजी पाटिलास मौजे मारास आणिलें तेव्हा गांवची पाटीलकीचा कारभार भराडजी पा करुं लागले मग रामजी नाईक आपले चाकरीवरी होते त्यावरी आपल्या मुलामाणसांचे खबरीस शिरवल्लास गेले ते तिकडे-च मृत्यु पावले भराडजी पाटील मौजे विरमाडे येथील पाटीलकीचा कारभार करीत असतां त्यांसही देवज्ञा जाली त्यावेळीं भराडजीचे पोटीं पुत्र चवघे होते परंतु मुले नेणती पाटिलकीचा कारभार करावयासी कोणी नाही तेव्हां पूर्वी मात्ल्याची पाटीलकी होती ते समईचा सरपा कुणबी मौजे मजकुरी होता तो बोलू लागला की येथील पाटीलकी पुरातन आपली आहे असे बोलोन जबरदस्तीनें गांवचा कारभार करुं लागला तेव्हां भराडजी पाटिलाची बायको बयाबाई शिरवल्लास जाऊन रामजी नाईकाचा पुत्र बाबाजी नाईक सोनवणी यासी भेटली आणि आपले वर्तमान सांगितले जे तुमचे तीर्थरूप रामजी नाईक शिरवलास जातो म्हणोन अले ते इकडेच समावले माघे आपले धनी भराडजी पाटील गांवचा कारभार करीत होते तेही समावले आपली मुले नेणती गांवचा कारभार करावयासी कोण्ही नाही यैसें पाहून सरपा कुणबी गावांत आहे तो जबरदस्तीनें पाटीलकीचा कारभार करीन म्हणतो यास्तव आपण तुम्हाकडे आलें तुम्ही येऊन सरप्याचे पारपत्य केले तरी उतम नाही तरी वडिलाचे वतन जाते यैसे बोलली त्यावरून बाबाजी नाईक सोनवणी व बयाबाई मौजे मजकुरास आली मग बाबाजी सोनवणी सरप्यास बोलिले की तूं मौजे मज-कूरची पाटीलकी आपली म्हणतोस याचा विचार काय तेव्हां सरपा कुणबी बोलिला कीं वतन दरोबस्त माझे तुम्हास बोलावयासी प्रयोजन नाहीं त्यावरून बाबाजीचा व सरप्याचा कजीया होऊन हरदुजण विजापुरास दिवाणात गेले आणि दिवाणापासी उभयतानी आपला मजकूर जाहीर केला त्यावरून बाबाजी सोनवणी यासी दिवाण बोलिले कीं तू मौजे वीरमांडे येथील पाटीलकीचें वतन आपले म्हणतोस तरी रवा काढणे खरा जाहालास तरी वतन तुझें खोटा जाहालास तरी वतन खालसा करून गुन्हेगारी घेऊं त्यावरून बाबाजी सोनावणी यानी रवा काढितों म्हणोन मान्य केले मग दिवाणानें रवे पत्र करून दिल्हे व हुजूरचे लोक बरोबरी घेऊन मौजे उडतरे येथें येऊन श्रीचे संनीध बाबाजी सोनावणी यानें रवा काढिला सरप्या कुणब्यानें सावली धरिली बाबाजी रव्यास खरा जाहला मग सरप्याचे घर दिवाणानें कैद करून सरप्यास गांवांतून देशधडी केला त्यावरी दिवाणानें बाबाजीस विज्यापुरास नेऊन हरकी होनें १२५ सवासे घेऊन मौजे मजकूरच्या मोकदमीच्या वतनाचे कागद करून दिल्हे मग बाबाजी सोनवणी मौजे मजकुरास येऊन भराडजी पाटलाचा वडील पुत्र मालजी व आपण यैसे उभयतां येकचित होऊन देशमूख व देशपांडे व भोवर गांवचे गोत व समाकुल्ल पांढर व बाराबलुते जमा करून त्यांचे विद्यमाने काली व पांढर निमे प्रमाणे धडे पेंडवल्ले करार करून घेतले याप्रमाणें काली व पांढरीचा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भोगवटा निमे प्रमाणें होत असा त्यावरी वडीलपणासाठीं बाबाजी व मालजी भांडो लागले त्यास मालजीचे पोटीं पुत्र नव्हता त्याचा धाकटा भाऊ सोनजी व तिसरा भाऊ येल्होजी व चवथा भाऊ कान्होजी त्यास मालजीनें तिसरा भाऊ येल्होजी याचा पुत्र दसजी यास आपल्या वोड्यांत घेतला तो कुसूर सोनजीनीं चितांत धरून बाबाजीस मिलोन सोनजीनें मालजीचा मारा केला त्यावरी मालजीची बायको बरवाबाई तिनें पदर टाकिला आणि सती निघाली त्यावरी बाबाजी निघोन हकिमापासी गेला तेथे हकिमापासी सालजाब केला की गावांत मारा जाहाला तुम्ही हकीम आहां ये गोष्टीची चवकसी मनास आणिली पाहिजे त्यावरून हकिमानी चवकसी मनास आणितां वाजपुसीमुळें मारा मालजीच्या घरभावांत जाला ये गोष्टीचा अन्या(च) बाबाजीकडे कांहीं नाहीं येसे हकिमाचे मते जाले त्यांवरि बाबाजी सा चौ महिन्या मृत्यु पावला त्यावरी बाबाजीचा पुत्र गोंदजी यांसी व येल्होजीचे पुत्र सावजी मावजी व दसजी यासी मागुती वडीलपणासाठीं कजीया लागला यामुळें गोंदजी व त्याचे बापभाऊ हरजी व सूर्याजी येसे त्रिवर्ग गावांतून बाहेर पडिले दावा करावयासी नवलाईच्या टेकावरी असे तों गांवांतून धावणें निघालें आणि हारजी व सूर्याजी यासी सापडऊन मारिले त्यावरी वरसां दों वरसां गोंदजी सोनवणी पाटील मौजे मजकूर यासी व त्याचे बापभाऊ सोंडकर यांसी दसाजी व सांवजी व मावजी यानी क्रियाप्रमाण करून गांवावरी आणिले निमे तर्क्षमप्रमाणें आपले वतन अनभऊं लागले गोंदजी समावल्यावरी त्याचा पुत्र बाबाजी यांनीं निमेप्रमाणें वतन अनभविले त्यावरी बाबाजीचे पोटीं येमाजी व दादजी व दादजीचा पुत्र खंडोजी खंडोजीचे पुत्र ३ वडील सिवजी दुसरा कृष्णाजी व तिसरा संकराजी याप्रमाणें आपली वंशपरंपरा—त्याची बायको संताई इनें आपले कारकीर्दीस पाटीलकींचा कारभार केला निमेप्रमाणें वतन अनभवीत असे आहेत ते कारकीर्दीस धारोजी राजे मोहिते यांसी आपला गांव मुकासा होता ते समई तांबरा पडोन गहू अगदी गेले त्यामुलें गांवातील कुलडाल्ल परागंदा जाले गांव चमीदार (?) जाहला तेव्हां दिवाणानें तलवा करून निमेच्या भावास व आपल्या वडिलास हुजूर घेऊन गेले हाणमार करून गांवची खंडणी होन ६५ पांसेष्ट करार केले त्यापैकीं निमेच्या भावानी होन साडेबतीस दिल्हे निमे आपल्या वडिलानी दिल्हे त्यामुळें आपल्या निमे तर्फेच्या भावाभावांत कजिया होऊन तपे तारत्यांच्या थलास जाऊन उभे राहिले थलनायकी हारदूजणाचे करिने मनास आणून कजिया विल्हेस लावून हादू जणास गोतानी महजर करून दिल्हा अणी उभयताची समजाविश केली ते समई दिवाणचा कमाविशदार धारोजी राजे मोहिते यांचे तरफेनें होता त्यानें महजर आपणापासी घेतला आणि कमाविशदार बोलिला कीं दिवाणाचा सेला दिल्यावाचून महजर देत नाही येसें बोलोन तो महजर घेऊन धारोजी राजे मोहिते यांकडे गेला आपल्या वडिलास सेला द्यावयासी ताकत नाही

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यामुले उठोन आपल्या गावास अले महजर दिवाणाचे घरी राहिला तेव्हा जानोजी बिन इंद्रोजी सोनावणी नाईकवाडी कसबे सिरवल फडनाईक हे धारोजी राजे मोहिते यांजकडे चाकरीस होते त्यानी आपले तैनातेचे येवजी होन पंनास सेल्याचे अैवजी देऊन महजर सोडविला तो महजर जानोजी नाइकाचे पुत्र सिवजी बिन जानोजी पाटील मौजे मिरजें तरफ निरथडी प्रांत पुणे याजपासीं होता त्यावर तुळाजी पाटील व सेट्याजी पाा सोनावणी मौजे मजकूर उभयेता तेथे जाऊन सिवजी बिन जानोजी पाटील यासी बोलिले की आपल्या वडिलांचा महजर तुम्हापासी आहे तो देणे तुम्हास रुपये ३०० व घोडी १ व जमीन बिघे ०१० व वाडा येक येैसें देतों म्हणोन कबूल करून महजर घेऊन अले ते समई सिवजी बिन जानोजी पाटील तुळाजी पाटिलासी बोलिले की तुम्ही महजर घेऊन जातां परंतु गावात जाऊन मह आश्रया-वरी कलह कराल तेव्हां सध्या आम्हास गोही यावयासी यावे लागेल म्हणोन सिवजी पाटील बोलिले त्यास तुळाजी पाटिलानी उतर दिल्हे की महजर आमचाच आहे कलह कोण्हासांगाते करणार नाही म्हणोन इमान करून महजर घेऊन आले तो महजर आमच्या वडिलांचा आहे अैसियासी आपण गोतगंगा आहा तो महजर अणऊन त्याची चवकसी मनास आणावी ज्यापासून महजर आणिला ते सिवजी पाटील मौजे मिरजे हेहि गोताचे सेवेसी हजीर आहेत त्यांस आज्ञा केली तरी आपले मुखे बोल-तील त्यावरून विदित होईल याखेरीज माल्याचे खरेदीपत्र व विज्यापुरचे माहाजर व अणी कागदपत्र होते ते राजक्रांतामुळें गेले येक दुसरें चिटोरे आहे साहेब हुकूम करितील तेव्हा हाजीर करूं वडिलावडिलापासून आपले निमे तरफेचा चौगुला व माली व माहार आहे त्यांत हाली माली नातवानी मुले हजीर नाही आपला निमेचा धुरा पेंडवला काली व पांढर याची पुरवणी करून देऊं हे तकरीद लेहून दिल्ही सही

---

३२ सरकार व इनामदार यांमधील तहनामा

(कै. कृ. वि. आचार्य)

ले. ६२ } श्री { श. १६८५ कार्तिक शु. १२
{ इ. १७६३ नोवें. १७

तहनामा मौजे मांगले काा सातवे हा गाव दुरोबस्त इनाम दुतर्फा राजपत्री वेदशास्त्रसंपन्न राजश्री मांधवाचार्ये व रंगाचार्ये याजकडे आहे तेथील सरकारात जिल्हेकडे घेणे व आचार्य याजकडे द्यावयाची कलमे याची करारी सुहुर सन आर्बा सितैन मया व अलफ तपशील

श्री ०
शा श्री
तस जी
भोसले नी
रंतर
(अष्टकोनी सिक्का)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जिल्हेकडे सरकारात घ्यावयाची कलमे

१ मौजे मजकूर पैकी सालदरसाल जिल्हेकडे रुपये ३२५ सवातीनशे घ्यावे वरकड सर्व गाव दरोबस्त कुलबाब कुलकानू व वतनदार मौजेकडील इनाम तिजाई देखील आचार्येबावाकडे दिल्ही आसे कलम

१ सदरहू सवातीनसे प्रो वतनी वेव्हार होऊन जिल्हेकडील कागदपत्र करून घेणे लागेल त्यास आचार्येबावाचे मते जीवन पाहून हरकी गुन्हेगारी रुा जे घेणे त्याजपैकी निमे सरकारात निमे आचार्येबावाकडे घ्यावे कलम

१ मौजे मजकूरच्या डोंगरपैकी सरकारात हाली कुरण चालत आहे तेणे प्रमाणे सरकारात घ्यावे वरकड आचार्येबावाकडे चालत आहे त्याप्रो घ्यावे कलम

१ मौजे मारी नदीस ठोकरा आहे तेथील हासील सरकारात चालत आहे त्याप्रो घ्यावा आच्यार्येचा निातीने कोणी ब्राह्मण इष्टमित्र याची चिटी आचार्येबावाची आली तरी पार करून यावा हासील न घ्यावा कलम

राजश्री आच्यार्ये बावाकडे घ्यावयाची कलमे येणेप्रो

१ मौजे माारचे खंड गुनेगारी खटनट कजिया खोकला याची कमावीसबाब होईल ती रुपये आच्यार्ये बावानी घ्यावे कलम सरकारात कोणी फिर्याद आले तरी आयकू नये रुा घेऊ नये कलम

१ वेठ बिगार फडफर्मास राबता माहार जो कानू काइदा दिवाणबाब सर्व आचार्येबावानी घ्यावी सरकारात घेऊ नये कलम

१ मौजे माारच्या ठोकरा जमायेतपैकी आहे त्याचा मक्ता आच्यार्येबावाकडे करार साल दरसाल रुा २५ पंचवीस सरकारातून घ्यावे परभारे गावात आच्यार्येबावानी ठोकडा न घ्यावा कलम

१ मौजे भाट शिरगावच्या मौजे माारच्या सिवेचा कजिया आहे त्यास भोरगाव व उभयेपक्षीचे देशक याचे मते सिवेचा निवाडा होईल त्यास खरे खोटे होतील त्याजकडून हरकी अगर गुनेगारी रुा २०० दोनसे मौजे मार पैकी घ्यावे त्यापैकी निमे सरकारात घ्यावे निमे आच्यार्ये याणी घ्यावे

१ स्वारीपटी व घासदाणा व हरएक बाब दिवाण नििा व खासगत घातली तरी मौजे माारास मागू नये कलम सदरहू माहाली घातलेली तरी न घ्यावी कलम

१ मौजे मारी वाणी उदमी राहतात त्याणी माहालाह्न माल भरून जातील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येतील त्याणी जकात वारून द्यावी मौजे मारी माल खरेदी करून सरकारचा माहाल न लागता परभारे गेले तरी त्यास जकात न मागावी गावात उदीम वेवसाव केला तरी जकात मागू नये कलम

६

येकून सरकार नि॥ च्यार कलमे व आच्यार्ये बावाकडील साहा कलमे येकून दाहा कलमे सदरहू लिहिले आहे त्याप्रो दुतर्फा चालावे छ ११ जमादिलावल मोर्तब सूद

मथळ्यावरचा शिका शिराळेकर भोसले जिल्हेदार यांचा आहे.†

३३ पूर्णपात्रे

(श्री. कृ. वा. पुरंदरे)

ले. ६३ } श्री { श. १७२२ इ. १८००

याद्री रामचंद्र आमात्य पूर्णपात्रे नि॥ श्री स्वामी मठ श्रीगीरी वास्तव्य क्षेत्र त्राई कृष्णातीर सु॥ इहिदे मयातैन व अलफ स्वामींनी आपले आमात्यपण देऊन सनदा करून दिल्या त्या पूर्वी वो शास्त्र संपन्न राजश्री विनायेकभट मैत्रायणी वास्तव्य क्षेत्र कासी यांस कासी क्षेत्री क्षेत्रस्त ब्राह्मण सर्व मिलोन पूर्ण पात्र दर घरास येक पात्र भरोन धान्य व येक आणा दक्षणा दरसाल देत जावा या प्रो ठराऊन तांब्रपात्र करून दिल्हे त्याप्रो माहादजी सिंदे याणी माहालो महाली आपली पत्रे करून दिल्ही त्या अन्वये होलकर याणीही पत्रे करून देऊन चालविले ते वीस बेवीस वर्षे चालले नंतर भटजी पुणियास आले त्याची सुश्रुषा करावयास आम्ही राहिलो दोन + + + वर्षे शेवा केली नंतर कृपावंत होऊन अनुग्रह देऊन पूर्णपात्र आमचे स्वाधिन केले आहे त्यास आपले राज्यात दर घरास दरसाल येक पूर्णपात्र भरून धान्य व येक आणा दक्षणा करार करून देऊन सदरहु प्रो चालवावयासी माहालो माहालचे कमादर वर्तमान भोवी यास व जमीनदार यास पत्रे भोगवटीयास द्यावयाविसी आज्ञा जाली पाहिजे

† पा. स. ३१४०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

३४ खटावकर यांचा गृहकलह

(कै. कृ. वि. आचार्य कालगांवकर)

कृष्णराव खटावकर ह्यांच्या वंशजाकडे खटाव हा गांव इनाम आहे. त्याबद्दल त्यांच्या वंशजामध्यें आपसांत कलह लागला होता तो पंचांनीं तोडिला ही हकीकत ह्यांत आहे.

ह्या कागदांत कांहीं प्रसिद्ध व्यक्ति पंचांत असल्याचें आपणास समजतें व व इनामगांवच्या वहिवाटी पूर्वी पेशवाईत कशा चालत असत ह्याचेंहि ज्ञान होतें.

ले. ६४ } श्री { श. १७०२ वैशाख व. ७
{ इ. १७८० मे २५

असल बरहुकूम नकलेची नक्कल

यादी नारायणराव रामचंद्र व रंगराव व भिमराव पुरुषोत्तम व रघोत्तमराव व्यंकटेश खटावकर या त्रिवर्गांचा कसबे खटाव हा गाव इनाम येथील वाटणीचा खटला पडून त्रिवर्ग भांडत आले त्याजवरून तिराइतानी वाजवी कयास करून ठराव केला सुरसन समानीन मया व अलफ शके १७०२ शार्वरी नाम संवत्छरे वैशाख वा ७

१ रामशास्त्री बावा	१ देवराव हिंगणे
१ विठलराव गोल[ले ?]	१ सिवरामपंत थते
१ विठलराव शिवदेव	१ बाळाजीपंत ढेकणे
१ यशवंतराव पानसे	१ काग्रस सावकार
१ माधवराव जाधवराव	१ भोकरे सावकार
१ भवानी सिवराम	६*
६	

या विद्यमाने ठराव जाहाले बे तपसील

कसबे खटाव हा गाव इनाम आहे तो नारायणराव रामचंद्र याचे म्हणणे आमचे आजे याचे नावच्या सनदा आहेत म्हणोन येक जेष्ट भाग काहाडोन वाटून तीन ठिकाणी घ्यावे याजवरून चौकसी पाहाता ब्राह्मणास बहुत गाव इनाम

कसबे मजकूर तेथे राबते महार दोन आहेत ते भिवराव पुरुषोतम व रघोतराव व्यंकटेश याचे म्हणणे पडले जे तीन ठिकाणी बरोबर राहावे परंतु चौघाचे विचारास आले जे नारायणराव रामचंद्र यास येक देऊन बाकी येक माहार

* सहाचा आकडा आहे नावें पांचच आहेत मूळ नकल करणाचे हातून एक नाव गळलें ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत यास वडिलास काही नाही व याचे वडिलाचे पत्रे ही आहेत जे तीन ठिकाणी वाडून खावे व शास्त्रीबावा यानी शास्त्रार्थ पाहून सांगितले जे ब्राह्मणास जेष्ट विभाग नाही त्याजवरून ठरले जे यथाविभागे तीन जागा करून घ्यावे जेष्टविभाग मागू नये कलम १

कसबे मजकूर येथील जे उत्पन होईल ते यथा विभागे तीन ठिकाणी वाडून घ्यावे कलम १

काा मजकुरी वेठ बिगार फड फडमास खांडपुरई वगैरे कमावीस जमा जे उत्पन होईल ते यथाविभागे ती ठिकाणी घ्यावे कलम १

गावचा कामकारभार वडिलानी धाकटे बंधू उभयतास घेऊन करीत जावे गाव निसबतचे काम पटी वगैरे करणे ते कचेरीस किंवा चावडीस करीत जावे त्रिवर्गाचे घरी होऊ नये कलम १

४

राहिला तो उभयता बंधूनी साहा साहा महिने राबऊन घ्यावा कलम १

काा मजकुरी पाटील कुळकर्णी कोळी चौगला वगैरे चाकरमाने यानी त्रिवर्गाचे हुकुमाने जे करणे ते करीत जावे हुकुमा शिवाय करीत जाऊ नये कलम १

वडिलोपार्जित पोथ्या पुस्तके वगैरे कागद वडिलाचे घरी असावे ते कारण लागले असता उभयतानी घेऊन मागती मूळचे ठिकाणी ठेवावेत कलम १

मौजे रामेश्वर प्राा खटाव हा गाव इनाम आहे परगावी सात चाऊर जमीन इनाम आहे ती साधल्यावर तीन ठिकाणी वाटून घ्यावे व खर्च पडेल तो तिघानी द्यावे कलम १

